वर्षाची अगाऊ रु० ५ डाकं हाशील ०।३
सहामाही ॥ ३ ॥ ०।८
सालअखेर ॥ ७ ॥ १।८
किरकोळ अंकास .......................... ०।४

Annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,, 1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy.......................................4as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०।

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10...4 as
Repetition per line3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXVI — AKOLA MONDAY 1 FEBRUARY 1892 — NO 5

वर्ष २६ — अकोला सोमवार तारीख १ माहे फेब्रुवारी सन १८९२ इ० — अंक ५

Notice.

The open land lying within Municipal limits out side the Railway Fencing near the goods--shed will be auctioned for being used for storing goods during the current season, on the 3rd. February 1892 at 4 P. M. No goods will be allowed to be kept on this Municipal ground after the 3rd. of February 1892, other than of those who have purchased the plot in auction.

Vyankatesh R. Mudholkar
Secretary
Municipal Committee Akola.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध ३ शके १८१३

मुंबई मध्यें 'हिंदु युनियन क्लब' नावाचें तेथील कांहीं चांगल्या शिष्ट मंडळींचें विश्रांतिगृह आहे. इतर विश्रांतिगृहाप्रमाणें येथेंही चार चौघे जमून चेंडु फळी, पत्ते वगैरे खेळतात, परस्पर संभाषणामध्यें गंमतीनें वेळ घालवितात, व मनोरंजन व करमणूक ज्या ज्या विहित मार्गांनीं होतील त्या त्या मार्गांनीं तीं करून घेण्याचा या क्लबांत हा संप्रदाय आहे. विलायतेंत अशा क्लबांची रूढी विशेष आहे आणि इंग्रजी संस्थेचें आम्ही हिंदुस्थानांत अनुकरण करित आहों. शेक्सपियर, प्रभृति विद्वान विद्वान लोकांच्या क्लबांस त्यांच्याच नांवावरून कांहीं संज्ञेनें निरनिराळीं नांवें पडल्याचें आम्हांस ठाऊक आहे त्या प्रमाणें या हिंदु युनियन क्लबास तेलंग ( नामदार काशिनाथ त्रिम्बक तेलंग ) चा क्लब असी व्यक्तिवाचक कांहींजण संज्ञा देतात. सुधारकपक्ष म्हणून अलीकडे नाणवला आहे त्यांतील मुंबईचे बरेच प्रमुख गृहस्थ या क्लबाचे सभासद आहेत. क्लबाच्या आख्यायिके प्रमाणें संमती बिलाच्या वेळीं जव्हेरीबागच्या सभेस या क्लबानें बहुतक सर्व आधार दिला होता. अलिकडे पांच चार वर्षां पासून प्रत्येक हेमंतऋतूमध्यें मुंबई सारख्या शहरीं प्रसिद्धीस आलेल्या निबंधकारांचे निबंध वाचले जात असतात हें दर वर्षीं ते निबंध प्रसिद्ध होत असतात ते वाचल्या वरून लक्षांत येईल. हेमंतोत्सवव्याख्यानमाला उत्तरोत्तर लोकांस फार उपयोगी पडत आहे. आणि अनेक विषयांचें उद्‌घाटण समर्पक रितीनें होत असल्यामुळें इतर क्लबापेक्षां या क्लबाचा उपयोग लोकांस विशेष होत असतो.

आमच्या वऱ्हाडांत हो वरील धर्तीवर स्थापेलेलीं पुष्कळ विश्रांतिगृहें आहेत परंतु त्या ठिकाणीं अवांतर लोकांचें लक्ष्य वेधेल आणि चार सुविचार कानीं पडतील अशी योजना फार क्वचितच प्रसंगीं घडून येते. ही गोष्ट दरसाल त्या त्या क्लबाच्या दहा दहा बारा बारा वर्षांच्या अस्तित्वाच्या मानानें फार कमीपणाची आहे हें निराळें लिहून कळविण्याचें प्रयोजन नाहीं. निरनिराळ्या विचारांचे खल होतात त्या मानानें लोकांचीं मतें ठाम होत असतात. प्रतिष्ठित, अधिकारी, सन्मान्य, व सुखवस्तु अशाच गृहस्थांचें वऱ्हाडांतील क्लब आहेत असें त्यांतील सभासदांच्या नामावळी वरून कोणी ही म्हणूं शकेल. तर या क्लबांतल्या सभासदांस आमची शिफारस आहे कीं त्यांनीं मुंबईच्या हिंदु युनियन क्लबाचा कित्ता उचलावा.

———>∞<———

मुंबईच्या या हिंदु युनियन क्लबांतील चालूं हेमंतोत्सव व्याख्यानमालेमध्यें रा० ब० चिं० वि० वैद्य एम्. ए. एल्. एल्. बी. पांत–जज्ज उज्जनी यांचा 'बालविवाह शास्त्र संमत नाहीं' या विषयावरील निबंध वाचण्यांत आला. 'अवलोकितलेखमाला' या पैकीं जे तीन लेख केसरी पत्राच्या द्वारें मराठी भाषाभिज्ञांस मिळाले आहेत त्या मालेचे ग्रंथकर्तृत्व याच रावबहादुराकडे आहे. यांचे सामाजिक विचार सुधारणेच्या सुपथाचे असून चांगले पोक्तपणानें जगासमोर आले आहेत. मागील चालीरितींशी ज्या नव्या चालींचा नीट मेळ बसतो त्या लवकर रूढींत येतात कांकीं आपल्या पूर्वजांच्या गोष्टींस मान देण्यास लोक तत्पर असतात. या तात्पर्यावर दृष्टी देऊन अलिकडे सुधारक जुन्या शास्त्रग्रंथाची ओढाताण करून ते आपल्या ठाम विचारांशी जुळते करण्यामध्यें लेखनपटु बनले आहेत. तेव्हां खरे खरे पण्डित आहेत यांस या शास्त्रावरील लठ्ठापटीचे कोटिक्रम आवडत नाहींत आणि अशा पण्डिता पैकीं सुप्रसिद्ध माजी प्रोफेसर श्रीधर गणेश जिन्सिवाले हे आहेत. हे गृहस्थ कांहीं वर्षांपूर्वी अकोल्यास आले होते त्या समयीं यांच्या अनुपम वाक्चातुर्याचा व पण्डितागिरीचा थोडा बहुत स्वाद आमच्या पैकीं पुष्कळांस मिळाला आहे. त्यांनीं मुंबईस बालविवाहा वरील निबंध आटोपल्या नंतर समर्पक रितीनें डाक्टर रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर, रा० रा० यशवंत वासुदेव आठल्ये आणि रावबहादूर महादेव गोविंद रानडे वैद्य यांच्या लेखांतील वकिलीच्या धर्तीची धरसोड व अर्थाची ताणाताण हीं शास्त्रांतील वचनांचा अर्थ करितांना कसकशीं केलीं आहेत तें संक्षेपानें कळविलें. प्रोफेसर जिन्सीवाले यांनीं दर्शविलेला प्रकार फार गर्हणीय आहे आणि तो तसा नाहीं अशी ज्या पण्डितंमन्ये सद्‌गृहस्थांची खातरी असेल त्यांनीं आपले लेख साधार सिद्ध करून दाखवावे. तसें झालें नाहीं तर सुरू झालेल्या खऱ्या खोट्याच्या वादामध्यें सुधारणेच्या प्रगमनचक्रास मोठा व्यत्यय येण्याचा संभव आहे असें आम्हांस वाटतें.

——————

बंगालचे लेफ्टनंट गव्हरनर सर चार्लस इलियट यांचा त्या इलाख्यांतील मुनसिपालिट्यांच्या कामा विषयी असा अभिप्राय पडला आहे कीं सभासद होऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांस मतें देण्यास लोक जमतात त्यांचा समूह एवढा छोटा असतो कीं सभासदांची निवड करण्याचा अधिकार लोकांस जो मिळाला आहे त्याची मातब्बरी कळून येत असावी असें दिसत नाहीं. आणि जेथे जेथें मताधिकारी लोक निवडानिवडीच्या धांदलींत पुष्कळ जमतात तेथें तेथें बहुतवेळां सभासदांची निवड शहाणपणानें व सार्वजनिक उद्योगाचें स्वरूप लक्षांत आणून अशी होत नसेत पण व्यक्तीविशेषा संबंधानें पक्षपात बुद्धी प्रगट होऊन लोक आपापलीं मतें देत असतात. बहुत करून हे निवडणूकीचे अधिकार समाजांतील समान्य सामान्य लोक तत्परतेनें व स्वार्थाच्या दृष्टीनें चालवितात आणि वरिष्ठ व प्रतिष्ठित गृहस्थ निवडणुकीच्या भानगडींत शिरत नाहींत म्हणून मतें मिळविण्याच्या खटपटी पुष्कळ सुसाध्य आहेत सामान्य दर्जाच्या मत देणाऱ्यां कडून मतसंख्या वाटेल तेव्हां भल्या बुऱ्या मार्गांनीं व आपलें वजन व शब्द खर्च करून मुबलक वाढवितां येते. या अनिष्ट परिणामाच्या परिहारार्थ लेफ्टनंट गव्हरनर साहेबांनीं असें सूचविलें आहे कीं मत देण्याची लायकी येण्यास जे गुण आवश्यक लागतात त्यांची ईयत्ता अधिक महत्वदर्शक ठेवावी म्हणजे लोकमत प्रबुद्ध व सुविचारानें मंडित असें बाहेर कळत जाईल. पण लोकांच्या बहुमताला अनुसरून किंवा त्याला नियामक असें हें शिष्टमत असेलच असें नाहीं तेव्हां लोकांच्या गरजा साक्षात्पणें कळण्यास वरील सूचनेपासून बहुत अडथळे उत्पन्न होतील असा एक निराळा अपवाद आहे.

सदहूं अभिप्रायावरून आपणांस राजकीय प्रकरणांत हक्क व अधिकार मिळावे व लोकसत्तात्मक संस्था आमच्या देशांत चालू कराव्या असा बुद्धिवाद सरकारपाशीं करण्यास कोणी प्रवृत्त होणार नाहीं इतकेंच नव्हे तर वरील अभिप्राय आपल्या राष्ट्रीय सभेच्या मूळ सिद्धान्तास फार बाधक होत आहे. स्थानिक स्वराज्य आपणास चालवितां येत नाहीं तर आम्ही कायदे कौंसिलांत लोकनियुक्त सभासद नेमण्या विषयीं सरकारपाशीं मागणी करीत आहों ती आम्हांस कशी काय मिळेल अशा बद्दल पुष्कळजण सशंक आहेत. बंगाल्या प्रमाणें मुंबई व मद्रास या हो इलाख्यांतील कांहीं मुनसिपालिटींच्या दुर्व्यवस्थे बद्दल डंका वाजत आहे आणि निदान त्याप्रमाणें मुनसिपालिट्या पैकीं कित्येकांचे लोकनियुक्त सभासद घाडण्याचे हक्क बंद ही करण्यांत आले. अशी जरी वाईट स्थिती आहे तरी स्थानिक स्वराज्याचा परवाना हिंदुस्थानाला लार्ड रिपन साहेबांनीं उदार बुद्धीनें दिला आहे तो काढून घेतला पाहिजे असा कांहीं पर्याय नाहीं. या देशात लोकमताला हा अधिकार मिळून अवघी सहासात वर्षें झालीं आहेत एवढ्या स्वल्प काळांत मुनसिपालिटींत सुज्ञ, हुशार, निरपेक्ष बुद्धीचे, देशाभिमानी, मतस्वातंत्र्यासाठीं निकरानें लढणारे असे सर्वजण सभासद सांपडतील असा सुदीन अद्याप प्राप्त झाला नाहीं. लोकसत्तात्मक संस्थेच्या शाळांतून नुकते आम्ही व्यासंग करूं लागलो आहों इतक्यात आम्ही सार्वजनिक कृत्यांत निष्णात व निपूण व्हावें हें वस्तुदृष्ट्या संभवनीय नाहीं. तरी गोळा बेरजेनें पाहतां आपल्या लोकांनीं स्थानिक स्वराज्यें उत्कृष्ठ रितीनें संभाळलीं आहेत व त्यांनीं आपली स्वाभाविक कर्तृत्वशक्ति व्यापारबाहुल्यानें फार वाढविली आहे आणि स्वल्प कालान्तरानें योग्य अधिकार व सवडी मिळाल्या तर आपले लोक राजकर्त्यांच्या बरोबरीनें तोलास तोल देऊन राज्य कारभार चालवितील असें इतिहासज्ञ अनुभवी लोकांचें अनुमान आहे. प्राचीन काळीं या देशांत खेड्यापाड्यांतून पंच पंचायती सारख्या संस्था होत्या परंतु त्या सांप्रत स्थितीस अगदीं निरुपयोगी आहेत. या पंचायतीच्या हकीकती वरून प्रजासत्तात्मक गोष्टी आम्हांस नव्या आहेत असें मात्र कोणी म्हणणार नाहीं. पाश्चिमात्य राष्ट्रां मधून लोकसत्तात्मक राज्यें व स्थानिक स्वराज्यें हीं बहुत बहुत आहेत व शेंकडो वर्षां पासून चालत आलीं आहेत तरी देखील हिंदुस्थानच्या मुनसिपालिट्या प्रमाणें तिकडे ही अव्यवस्था, कर देणाऱ्या प्रजाजनांच्या हक्का विषयीं अनास्था, कर्तव्यशून्यता इत्यादि दोष प्रबल आहेत असें वर वर पाहणाऱ्यांस ही कळून येईल. तेव्हां आपल्या मुनसिपालिट्या संबंधानें आपणास उदासीन होण्याला कांहीं विशेष कारणें नाहींत. कायदे कौंसिलांतील सभासदांच्या लोकनियुक्ते संबंधानें वास्तविक कांहीं एक अपवाद नाहींत. स्थानिक मुनसिपल मर्यादेंत चुका, पक्षपात, अन्यायाच्या मार्गीं गमन इत्यादि सहजी घडतात तसा प्रकार राजकीय कौंसिलद्वारा संबंधानें नाहीं. त्या ठिकाणीं स्थानिक मोठेपणाच्या लाभहानीच्या, दुष्टविकारोत्पादक मात्सर्याच्या गोष्टींचा सर्वथैव लोप होतो आणि सर्वथैव लोप होतो म्हणून जेव्हां राष्ट्रीय प्रकरणा संबंधानें विचार करावयाचा असतो तेव्हां विकाररहित, प्रफुल्ल व उदार मनानें प्रत्येक गोष्टीचें बलाबल पाहून यथान्याय वादविवाद करण्यास प्रत्येक विद्याविभूषित व विवेकसंपन्न कोटिबाज मुत्सद्दी तत्पर राहील. आणि मुनसिपालिटींतल्या अनावर गोष्टी बाधक असल्या तरी देखील कायदे कौंसिलद्वारा

काम आमच्या पैकीं समाजाचे नायक लोक सोळा आणे बजावतील अशी आमची पूर्ण खातरी आहे आणि तदनुसार लोक कल्याणकारी कौंसिलदार सरकारांतून नेमतात तेव्हां अनुभव ही येऊन चुकला आहे.

वऱ्हाड प्रांतांतील मुनसिपाल्टी संबधानें आनंदाची गोष्ट अशी कीं त्यांच्या बद्दल वरील प्रकारची कांहीं कुरकुर सरकारी कागदोपत्रीं आढळत नाहीं. तथापि त्या मुनसिपालिट्यास अधिकार माफक आहेत आणि सरकारी युरोपियन अधिकाऱ्यांची ही सल्ला मसलत नेहमी मिळत असते तेव्हां नेटिवा संबधानें ओरड करण्याचा व मुनसिपालिटींचा रड गाण्याचा फार करून प्रसंग येत नाहीं. लोकमत ही या प्रांतांत चांगलें प्रज्वलित नाहीं ह्मणून वादविवाद होत नाहींत आणि त्या मुळें आपसांतील दुही व पक्षप्रतिपक्षांच्या फाटाफुटी वगैरे दृष्टोत्पत्तीस पडत नाहींत. ही स्थिति चांगली नाहीं. दिवसें दिवस ती र्‍हास ही पावत आहे. येत्या आठवड्यांत आकोला मुनसिपालिटी साठीं सहा सभासदांची निवड लोकांनीं करावयाची आहे ह्मणून आह्मी वरील अपवादक गोष्टी मुद्दाम नमूद केल्या आहेत तेव्हां कशी काय व्यवस्था पाहिजे हें तपशिलवार कथन करण्याचें प्रयोजन नाहीं कांकीं शहाण्यास इषारा पुरा असतो. मत देण्याचा ज्यांना ज्यांना अधिकार पोचतो त्यांनीं त्यांनीं स्वार्थाचे आपमतलबी कोते विचार बाजूस ठेवावे, खरोखरी सार्वजनिक कार्यांत उत्सुक शहाणे, धोरणी, दूरविचारी असे श्रीमान व विद्वान लोक आपापल्या समजा प्रमाणें निवडून काढावे, पक्षपात होऊं देऊं नये, कार्यसाधु उमेदवारांची व मताधिकाऱ्यांची भलती भीड पडूं देऊं नये, गुदस्त सालच्या कामाचा आढावा काढून कोणी कोणी कामगिरी उत्कृष्ट बजावली तें पाहून दुबार ज्यांस निवडण्याची जरूरी वाटेल त्यांस गमावूं नका, खरेपणा विषयीं नामांकेत वर्तन नित्याचें ज्यांचें असेल त्यांस अगोदर सभासदाच्या जागे साठीं उमेदवार होण्या साठीं हरप्रयत्नानें उद्युक्त करा, कांकीं अशा प्रतीचे लोक आपण होऊन सहसा सार्वजनिक भानगडींत पडत नसतात इत्यादि सामान्य गोष्टी मोघमांत सांगण्या पलिकडे वर्तमानपत्रांतून अधीक खुलासेवार लिहिण्यास सवड नसते. ह्मणून अकोलेकर मंडळीस आह्मी विनंती करितो कीं दर वार्षिक या निवडनिवडीच्या चळवळीच्या इतिहासावरून प्रांतांतील अन्यस्थळांचे आपलें अनुयायी लोक काय काय अनुमानें बांधतील तीं पूर्णपणें मनांत वागवून दुसऱ्यास शहाणपणानें प्रबुद्ध लोकमताचें प्राबल्य कसें वाढवावें हें नीटपणें शिकावा आणि अल्प स्थानिक अधिकारांच्या विहित अंमलबारीनें अधीक महत्वाच्या अधिकारांला आपली योग्यता आहे असें निश्चयात्मकपणें प्रेक्षक व सरकार यांस सिद्ध करून दाखवा.

पंडित अयोध्यानाथ वारले आणि त्यामुळें राष्ट्रीय सभेचा एक खंबीर पाठिम्बा नाहींसा झाला. त्यांच्या मरणानिमित्त अजून ही मोठमोठ्या सभा भरून दुःखवठ्याचीं पत्रें त्यांच्या कुटुंबाकडे रवाना होत आहेत. गेल्या मंगळवारीं पंडित अयोध्यानाथ यांजवरील आपलें प्रेम व त्यांच्या वियोगाचें परम दुःख हीं व्यक्त करण्यासाठीं मि० नार्टनच्या अध्यक्षतेखालीं मद्रासेस सभा भरली होती. बहुतेक सर्व हिंदुस्थानभर अशा प्रकारच्या लोकप्रियतेचा मासला पंडितजी संबधानें लोक जाहीरपणें दाखवीत आहेत. वायव्य प्रांताचे हायकोर्टांतील सर्व नामदार न्यायाधीश एकत्र जमून त्यांनीं आपलें दुःख मुख्य न्यायाधीशाद्वारें कळविलें. ते ह्मणाले कीं कायदे कानूंच्या मसलतींत पंडित अयोध्यानाथ यांच्या भाषणापासून आम्हाला पुष्कळ गोष्टी घेण्यास रूखा सापडत. भानगडींचा वाद असला ह्मणजे त्याची फोड व स्पष्टता यांच्या भाषणानें सुलभतेनें होत असे. आपल्या आशिलाच्या वतीनें हे सात्विकपणानें व प्रामाणिकवृत्तीनें बहादराची कामें बजावीत असत. आपला पक्ष सबळ व न्याय्य आहे हें दाखविण्यांना यांचें भाषण फार मोहक, मनोरम व गोड वाटे. यांच्या गोड बोलानें व विचार सरणीनें आमच्या मनालाही भूलचूक पडल्यासारखी होई. वृथा व खोटा गोष्ट कोंडता समोर न आणण्याविषयीं यांची शैली विशेष दिसून येई. यांचे विचार अगदीं स्वतंत्र व वर्तनही आदरास पात्र असें असे. होतकरूं वकील, आडव्होकेट व बारिस्टर यांनीं त्यांच्या चरित्रावरून पुष्कळ गोष्टी शिकण्या सारख्या आहेत. अलाहाबादचे 'इंडियन युनियन' पत्रानें ह्मटलें आहे कीं मेरुपर्वतापासून जसा एखादा भव्य व उंच कडा कडाडून पडावा त्याप्रमाणें हिंदुस्थानचा एक अचाट व राजवैभवशाली मनुष्य मृत्युमुखीं पडला. मद्रासच्या 'हिंदु' पत्रानें लिहिलें आहे कीं लार्ड डफरिन, कालव्हिन, सय्यद अहमद सारख्या तुमुळ शत्रूंना अलहाबादेस पूर्ण भरतीचा पूर आला होता त्याच्या भोंवऱ्याच्या चक्रामध्यें राष्ट्रीय सभा वाहवली होतीच परंतु त्यावेळीं पंडित अयोध्यानाथ यांच्या बाणीदार, उदार, वजनदारीच्या, लोकानुवर्ती, समयोचित, कुशलगिरीच्या व कर्तबगारीच्या वागणुकीनें राष्ट्रीय सभेची बैठक निर्विघ्नपणें पार पडली इतकेंच नव्हे तर तेव्हां जयश्रीनें वरदहस्त हिंदुस्थान राष्ट्रावर ठेवला आहे तो त्यांच्याच प्रभावानें कायम आहे. असो. मेलेल्या बद्दल दुःख करित बसण्यांत हाशील नाहीं तरी पंडितजीच्या गुणश्रवणानें, त्यांच्या चरित्रपठणानें व त्यांचें वर्तन कित्ता ह्मणून गिरविल्यानें आमची खातरी आहे कीं देशाभिमानी, पोक्त विचारी मुत्सद्दी त्यांनीं आरंभलेलें कार्य मोठ्या हिंमतीनें व आणि बाणीनें सिद्धीस नेतील.

राष्ट्रीय सभेची येती बैठक अलाहाबादेस भरविणें साध्य नसेल तर आह्मी पुणें शहरीं भरविण्यास सिद्ध आहों असें आश्वासन पुणेकर मंडळीनीं आमच्या खिन्न व उदासीन स्थितींत दिलें त्यापासून सर्व राष्ट्रास मोठा धीर आला आणि हतवीर्य व गळीत चित्तवृत्तींत ही संतोषकारक अभिवचनानें मोठा विसांवा वाटला. परंतु पुण्याकडील कांहीं वर्तमानपत्रांतील ताजे लेख वाचून आमचें मन शंकीत व निराश झालें आहे. पुण्याकडे सामाजिक प्रकरणांत दुही, फाटाफूट, खाजगी खडाजंगीचे मतभेद, स्नेहविपर्यास, किंबहुना अंतस्थ वैमनस्यें यांना फार ऊत आला आहे, जो तो एकमेकाचें उट्टें काढण्याविषयीं तत्पर असतो. क्षुद्रबुद्धीनें पगडा बसविल्यामुळें राष्ट्रीय सभेस अनेक विघ्नें येतील, लोकांचा आश्रय धनानें व अंगमेहनतीनें मिळणार नाहीं, इत्यादि प्रकारचें रडगाणें व दीनावाणी प्रगट करून राष्ट्रीय सभेची बैठक पुण्यास न भरेल तर बरें असाही अभिप्राय तिकडील पत्रांतून ऐकूं येत आहे. राष्ट्रीय सभेच्या सभासदांस कै० पंडित अयोध्यानाथ यांनीं येत्या बैठकीला अलहाबादेस निमंत्रण केलें त्यापूर्वीं वरील प्रकारची पुष्कळ वाटाघाट व भवतिनभवति नागपूर मुक्कामीं होऊन पुण्यास भरविण्याचा बेत तहकूब ठेविला गेला असें ही आम्ही कर्णोपकर्णीं ऐकिलें होतें. कांहींही असो, बाहेर गोष्टी निघाल्या आहेत त्या पुणेकरांस कमीपणाच्या व लांछनाच्या आहेत. राष्ट्रीय चळवळींत परस्परांमधील मानापमानाचें गाठोडें गुंडाळून पुणेकरांस ठेवितां येत नाहीं, मराठेशाहीच्या एका भागव्या झेंड्याखालीं पुण्याकडील लोक राजकीय प्रकरणांत एकदिलानें गोळा होत नाहींत, सामाजिक वादाचें घोडें व वरचीं नानाविध लचांडें हीं बाजूस सारितां येत नाहींत तर त्यांनीं पेशव्यांच्या गादीच्या शहराला काळीमा आणिला आणि शहाणपणा, शौर्य, एकवाक्यतेचे व एकदिलाचे राजकीय सद्विचार, राष्ट्रीय बंधुत्व या सर्वांना एकदम तिळांजली दिली असें आम्ही मानतों.

पुण्यास बैठक होवो अगर न होवो तरी आह्मास बळकट आशा आहे कीं वायव्य प्रांतांतच पंडित अयोध्यानाथचे अनुयायी व स्नेही त्या उदारचरित पुरुषाची प्रतिज्ञा तीच आपलीच असें मानून ती त्यांच्याच नामसंकीर्तनाच्या बळावर पूर्णतेस नेऊन पोचवितील. कट्टा देशाभिमानी पुरुष वेळ बेतली ह्मणजे उदयास येतो तेव्हां पंडितजींच्या पश्चात् अल्हाबादेस बैठक भरविण्याचा संकल्प पुरा करण्यासाठीं तिकडील लोक पुढें सरसावतील व अभिनंदनीय व उदाहरणीय गुणसामर्थ्यानें व कार्यदक्षतेनें वायव्य प्रांताचा नांवलौकिक ते अजरामर ठेवतील असा सूज्ञ लोकांचा तर्क आहे. पंडितजीच्या दुःखानें ते सध्यां शाकग्रस्त व क्रियाशून्य झाले आहेत तरी कांहीं दिवस लोटले ह्मणजे त्यांचा मानस व बेत आह्मांस कळविण्यास ठीक पडेल ह्मणून तूर्त त्या प्रश्नाचा विशेष विचार करण्याची जरूरी नाहीं.

राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी मि० ह्यूम हे विलायतेस जाणार आहेत आणि त्यांचे दुय्यम सेक्रेटरी पंडित अयोध्यानाथ तर कैलासवासी झाले आहेत तेव्हा हिंदुस्थानांतील त्या सभेची कामें कोणाच्या स्वाधीन करावीं हा मोठाच प्रश्न सर्व राष्ट्रापुढें येऊन पडला आहे. मोठी विवंचना ती अशी कीं ह्यूम साहेब हिंदुस्थानांत कांहीं कालपर्यंत येणार नसल्याकारणानें प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें या देशांतील राष्ट्रीय सभेची हरएक प्रकारची जबाबदारी व अवाढव्य कार्यें जाइंट सेक्रेटरीलाच यापुढें करावी लागणार आहेत तेव्हां ही माळ कोणाच्या गळ्यांत घालावी हा ह्मणजे काळजी राहणार नाहीं प्रांताप्रांतांतल्या सर्व कांग्रेस कमिट्यांचा मनोदय असा दिसतो कीं बाबू डब्ल्यू. सी. बानरजी यांना जाइंट सेक्रेटरी नेमण्यांत यावें. सन १८८५त पहिली राष्ट्रीय सभा भरली होती तेव्हां तिचे अध्यक्ष सदरहु बाबू गृहस्थच होते. त्यावेळेपासून इंडियामध्यें व इंग्लंडमध्यें त राष्ट्रीय सभेची कामगिरी उत्कृष्ट रितीनें बजावीत आहेत. त्यांचाच विचार मि० ह्यूम साहेब अगोदर कोणत्याही प्रकरणांत घेत असतात. त्यांच्या धीम्या व सरळ स्वभावाला जोडगोळी बहुश्रुतपणा, विद्वता, रसाळवाणी व लोकोत्तर कर्तृत्व इत्यादिकांची असल्या कारणानें त्यांना सर्वांची फार आग्रह पूर्वक जाइंट-सेक्रेटरी होण्याविषयीं विज्ञप्ती आहे आणि राष्ट्राची बहुमानदर्शक व राजमान्य ही पदवी त्यांनीं स्वीकारली तर राष्ट्रीय सभेचें मोठें भाग्य समजलें पाहिजे. सध्यां सर्व देशाचे डोळे त्यांच्या होकाराकडे लागले आहेत आणि ईश्वरकृपेनें त्यांनीं लोकांचें ह्मणणें कबूल करावें असें आह्मी मनापासून इच्छित आहों.

'देशसेवक' नांवाचें वर्तमानपत्र दर आठवड्यांस नागपुरास निघूं लागून त्याचा पहिला अंक आह्मांस वाचण्यास मिळाला. भाषा सरळ व गोड असून विचार हो पोक्तपणाच आहेत. पत्राचे प्रकाशक राजश्री हरी माधव पंडित व चिंतामण रामचंद्र कळकर हे उभयता आहेत. सालिना वर्गणी चार रुपये आहे.

मुंबईस नवीन निघालेल्या 'कामगार' पत्राचा दुसरा अंक मिळाला. बारा आण्याच्या वर्गणींत लिहितां वाचतां येणाऱ्या कामकरी लोकांस फार चांगलें पत्र मिळूं लागलें आहे. या पत्राच्या प्रकाशकांनीं 'ज्ञानदीप' नावाचें मासिक पुस्तक बंद पडलें होतें तें हा पूर्ववत् सरूं केलें आहे.

## The Berar Samachar

MONDAY, FEBRUARY 1, 1892

The Educational report that is lying with us among other things clearly shows how efficiently a department prospers under native management. Fortunately Berar has got a native at the head of a department and the progress that the department has made under native supervision as contrasted with the progress in other departments has signally proved that European headship is not the only guarantee of proper administration and efficient management. Our thanks are due therefore to the hard and patient work of both Rao Bahadurs— Narayan Bhai Dandekar and Shriram Bhicaji Jathar. They have shown that the natives when entrusted with high responsibilities can compete successfully with their European brethren. The golden opinions that they have won from their superiors speak volumes for them. Rao Bahadur Dandekar was sent here all of a sudden as if to try an experiment and he by his resolution and energy has proved that the experiment should be the rule. And happily it has been followed in the appointment of Rao Bahadur Jathar and the exemplary success with which he has carried the administration shows the judiciousness of adopting the rule.

Thus we see that the National Congress is right in calling upon Govt. to infuse native blood in the circle of civil or military service of higher grades in

the Empire. It is cheap and efficient. People are pleased and the rulers are benefitted. But it is not possible in the probability of events that such a proposal would ever succeed with those who have the power to move this sort of reform. If rightly interpreted so as not to miss the interests of those who hold the helm of Indian affairs the proposal in fact invites them to sign their own death-warrant or at least the death-warrant of those who hope to get rich in India to find a haven of rest and retirement in England. We grant that a wholesale delegation of authority into the hands of the sons of India means a farewell to their long-cherished principles and a departure on the part of the rulers from 'their land of exile'—, but a moderate modicum of native administration under proper and qualified persons with a due sprinkling of the lion's share of the Conquering English nation would go a great way to ameliorate the wretched lot & miseries of the millions of people. The Finance Commission had never thought it advisable to reduce the scale of high salaries from the Governor General in Council down to the European officers who do not draw per month less than 500 Rs. at least. We are sure that a ten per cent reduction would defray the annual costs of a dozen of big provincial civil or military departments. The London Council, which is the ruling Government for India acts like a drone upon the hardly earned livelihood of the millions of the subject people hovering in the vast ant-hill of the whole Empire. It spends annually crores of Rupees. If so much extra expenditure be saved India will hold its ground against a dire famine of a couple of years' standing. The Christian doctrines of sympathy, philanthropy and humanity are parched up as soon as they are planted in the scorching sun of the East. 'Say one thing and do the opposite' is in plain terms the policy of the aristocracy that reigns supreme in India. It is not loyal perhaps to attack the benign and benevolent Government so virulently. But benign it was in so far as it secured its dominions with the yielding good-will of the people and benevolent it was in so far as the interests of the Government did not clash with those of the ruled. Now a problem hangs over their head in all departments of life. Whereever he goes an Englishman meets a native in order to fight out his merits as a good pass-port to higher grades of employments and professions. Might is the last merit which has enabled and will continue to enable an Englishman to assert his right and that too of a physical victory.

---

We are obliged to our local contemporary the Vaidarbha for adverting ably to the mysteries of the Akola Jail. The fact that a convict by name Girnari was tried for attempting to commit suicide —being condemned for the continious duration of some months together to atone for his crimes in the solitary cells of the jail, is a horrible reflection upon the management of the jail. If the story of the suicide be true— and there is no good reason why it should be other wise— we hope and earnestly entreat that Colonel K. J. L. Mackenzie should hold a departmental enquiry to set the matter right. Demands of justice and right policy require an immediate mending of the breach of discipline in the jail. The condemned of all the condemned must be those who practise such a horrifying and inhuman treatment to the wretched lives that are entrusted to their wise care for the discontinuance of crimes if not for reformation.

---

It is amusing to read a graphic and succinct description of the symbolical administration in India in the columns of the 'Hindu' of Madras. We cull a short para below:—

*Bureaucracy Red Tape, and Sealing Wax.*

Bureaucracy was defined by Balzac as "a gigantic power set in motion by dwarfs" creating "a power of inertia" in the "Report" of officials, of whom he says, "No one comes or stays in the Government offices but idlers, incapables, or fools." Bureaucracy is as paramount in India as in France or Russia; the Report reigns without a rival, and the inevitable evils of administration by documents therefore appear on every hand. Red tape is king, and sealing wax its high priest.

---

Reverend Mr. Thomas Evans has lately sent two valuable letters to public prints. He is a man of strong convictions and an advocate of hard and fast rules. He is a deadly opponent of the Excise department in India. Of the national Congress he is one of the big organs from the missionery institutions in India. His knowledge of facts coupled with experience does not allow him to side with those who hold that the sittings of the National Congress should not be henceforward held from one year to the other until a campaign in England is undertaken to arouse the English nation to grant their wise demands. He is afraid that the bustle and the movement of thought and action that is set to work through the Congress will come to a stage of lethargy and inaction if we stop our work of the Congress in India. He rejoiced with satisfaction over the resolution of the Congress to assemble this year at Allahabad. In his second letter he has called upon the rich millionaires of India to afford a liberal support so as to enable the Congress leaders to hold their sittings in London. Towards the close of the letter he has ardently requested our people to let the people of England know:—

"First, that you have *real grievances*, which should in justice be redressed and next you must show that you are in *real earnest* to get them redressed. This you can never do effectually by correspondence — never effectually, by proxies, however good such may be. But if an influential body of the people of India *themselves* will go over and speak for themselves and for the dumb millions of their countrymen giving sound reason for, and reliable proof of the *goodness* of their cause, claiming the same political privileges as other subjects of Her Majesty, and no more— and claiming them as true and loyal subjects—claiming them not only for the good of the country, but also for the firmer establishment of the British power in India, then, I say, there is no doubt whatever but that public opinion in England would so far sway members of the British Parliament as to bring the just claims of the millions of India before the bar of that Paladium of Justice and Honour, from which alone is the *hope of India*. Yes, gentlemen—if you really *believe* in the justness of your cause —go— go, I say if like pilgrims to Jagannath, you have to beg your way. Go, and show that you are in red hot earnest and that you simply claim that which will if granted, abundantly redound to the good of India and to the strength and stability of the British Government in that mighty nation."

---

## वऱ्हाड.

हसुल तालुके दारव्हे येथिल गंगा नांवाच्या विववेस कन्या झाल्यावर पापकर्म लपविण्या सार्ठी वाल्हत्या करण्यांत आली. आरोपी गंगाधर नांवाचा पटवारी असून शिवाय रा. रा. रामचंद्र व बाजीराव असे शाळा मास्तर होते. पुरावा दुर्बळ व विसंगत होता ह्मणून सर्व आरोपींस सेशन कोडतानें दोषमुक्त केलें.

---

शंकरलाल नावाच्या इसमानें उमरावतीच्या सराफा कडून ११ तोळे सोने पारखण्या सार्ठी ह्मणून नेऊन पलायन केलें. आरोपीवर अपराधाची शाबिती होऊन मागें दोन तीन वेळां तुरुंगशिक्षा भोगली असल्या मुळें ७ वर्षांची ठेप देण्यांत आली.

---

बेडनऱ्याच्या शेख हुसेन मनुष्यानें खिसा कापून रुपयांचे पाकिट चोरलें होतें. त्यानें अपराव बहुत वेळा केले होतें म्हणून जन्मभर काळ्या पाण्यावर त्यास धाडाण्याविषयीं सेशनात हुकूम झाला.

---

एका शिकारी मनुष्यानें पाण्याचा गुंड चोरला होता परंतु योग्य पुरावा नसल्या मुळें तो दोषमुक्त झाला.

---

बनी नांवच्या औरतनें नणंदेच्या पोरीस सोमल देऊन मारलें म्हणून तिला जन्मठेपची शिक्षा झाली.

---

उमरावतीचे के० रामचद्र त्रिंबक वकील यांच्या सूनेनें आत्महत्या केल्या विषयीं प्रमोदसिंधू वरून कळतें.

---

रा. रा. चिंतामण मोरेश्वर आपटे हे आपल्या इनस्पेक्टर आफ रजिस्ट्रेशनच्या कामावर माघारे येत असल्या मुळें त्यांच्या डायरेक्टर आफ लांड रिकार्डसचे हेड क्लार्कीचे जागीं मि. स्मिथ यांस नेमणार आहेत असें समजतें.

---

येथें एक विलंद चोर रा. रा. पांडुरंग बापुजी राजंदेकर यांच्या घरीं सत्या पगारावर नोकरीस राहिला आणि मालक बाजारांत उभे असून रेवजाची पेटी मागत आहेत असा बहाणा करून घरच्या मंडळी कडून ९०० रुपये घेऊन पळून गेला

---

अकोट रस्त्यावर कांहीं मारवाडी रात्रीं कांहीं रोकड घेऊन चालले असतां गाडीवाला व चोर यांच्या मिलाफानें रहाजनी झाली व बरीच दुःखांपत ही झाली असें कळतें. अपराधी सांपडून त्यांची चौकशी चालूं आहे.

---

येथील आक्टींग तहशीलदार मि० आबदुल कुदूस हे तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जात आहेत.

---

नागपूर– भुसावळ रेलवेवर पार्सलच्या चोऱ्या हातात असा बोभाट ऐकूं येतो. करन्सी नोटांचें पारसल चोरीस गेल्या वरून त्या बद्दलचा वहिम गार्डावर आला आहे.

---

रा. रा. भास्कर लक्ष्मण अभ्यंकर फर्स्ट आसिस्टंट, ट्रेनिंग कालेज अकोला हे पेनशनदार आज पासून झाल्या मुळें त्यांच्या जागीं अकोल्याचे सबडेपुटी इन्स्पेक्टर रा० रा० बळवंत विष्णु वैद्य यांस नेमून रा० रा० दामोदर कृष्ण टिळक यांस सब डेपुटी नेमणार असल्याचें कळतें.

---

येथील मि. अजीजुद्दीन फर्स्ट क्लास माजिस्ट्रेट यांच्या पुढें गिरनारी नांवाच्या एका कैद्यावर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्या वरून खटला चालला होता त्या वरून अकोल्याच्या तुरुंगांत मोंगलाई चालली असते असें दिसतें. कैदी दहा वर्षांची शिक्षा भोगीत आहे परंतु त्या कारागृहवासांत महिनो गणती त्यांत अंधार कोठडींत राहावें लागे म्हणून त्यानें गळफांस लावण्याचा प्रयत्न केला असावा. दुर्धर व भयंकर क्रूरपणाच मासलाच होय कीं अंधार कोठडीची शिक्षा देण्या विषयीं एक ही नियम पाळला नाहीं.

---

करुणेश प्रासादिक संगीत कंपनी, वाशीम ही मंडळी येत्या ६ तारखेस येथील कादर भाईच्या थेटरांत मृच्छकटिक नाटकाचा प्रयोग करून दाखविणार आहे.

---

रा. रा. बळवंत नरसिंह मुधोळकर यांनीं दोन महिन्यांची रजा घेतल्या वरून रा. रा. श्रीधर रामचंद्र पिंपळखरे यांस बुलढाण्यास डेपूटी इनस्पेक्टर नेमलें.

---

आज डिपुटी कमिशनर साहेब समक्ष अकोला जिल्ह्याचे अपकारीचा हरास होणार आहे.

---

### नोटीस.

रा० रा० रावबाहादुर. बाळकृष्णराव मुकुंदराव बुटी राहाणार सिताबरडी, नागपूर यांस नोटीस देणार यशवंत विठ्ठल लंके राहाणार अकोट. नोटिशीनें असें कळवितो कीं आपलें दुकान अकोट येथें आहे. त्याचे शेजारची जागा आपण बाळकृष्ण जयकृष्ण जती मयत यान पासून घेतली व त्यावर इमारत बांधण्याचें काम चालू होणार आहे करितां या नोटिशीनें असें कळवितो की ज्या जागेवर आपण इमारत बांधणार त्या जागेच्या चतुःसीमेच्या जवळची पुष्कळ जागा आमची आपण घेऊन इमारतीचें कामचालू आहे तर असें कळवितो कीं आमच्या जागेवर कोणच्या ही प्रकारची इमारत वगैरे बांधूनये कारण आपण जी जागा विकत घेतली त्याच जागेत इमारतीचें काम करावें. माझे जाग्यावर केल्यास इमारतीचा पैसा वगैरे कांहीं मिळणार नाहीं व जागा आमची घेतल्या बद्दल रिती प्रमाणें काम चालऊन नुकसान वगैरे बद्दलची सर्व जबाबदारी आपलेवर आहे. व या पुरवी आपल्यास टपाल मारफत नोटीस दिली परंतु तुम्हीं कांहीं येक तजविज केली नाहीं म्हणुन ही नोटीस देणें भाग जाहालें. व विनाकारण खरचाची बाब मजवर बसली. तर नोटीस पावल्या बरोबर आमची जागा व जाहालेलें सर्व नुकसान व ह्या नोटीसिचा खर्च असे सर्व भरून द्याव. असें जाहालें नाहींतर काम चालऊन अखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान वगैरे होईल तें सर्व भरून घेतलें जाईल म्हणुन दिल्ही नोटिस सही ता. ३१ माहे ज्यानेवारी सन १८९२ ईसवी.

(सही) यशवंत विठ्ठल लंके दस्तुर खुद्द राहणार अकोट.

---

## वर्तमानसार.

annum in advance 0 Postage 13 as



मुंबई इलाख्याकरतां एक सानिटरी बोर्ड होणार असून त्याबद्दलची कांहीं व्यवस्था गेल्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाली आहे इंजनेर खात्याकडून जी सानिटरी कामें व्हावयाची तींही या बोर्डानें पसंत केल्यावर व्हावयाचीं असें ठरविलें आहे.

६,१०० रुपयांचा एक चेक अकौन्टन्ट जनरलाच्या आफिसांतल्या सराफानें ब्यांकेतून वटवून आणण्याकरतां पेस्तमजी जमशेटजी दावर नवाच्या पार्शीजवळ दिला व तो त्यांतील ९,००० रुपये घेऊन फरारी झाला. आतां त्यास पुणें पोलिसांतल्या इस्मायल शिपायानें माळशिरस तालुक्यांतल्या एका खेड्यांत पकडून पुढें मुबइस आणला व जास्त तपास चालविला. फरारी झाल्यावर त्यानें आपला पार्शी पोषाक बदलून डोक्यास पगडी नेसावयास धोतर अशा तऱ्हेचा बंगाली हिंदु बाबूचा पोषाक केला होता व आपण भाट आहों असें दर्शवुन फिरत होता. कोर्टापुढें अपराध कबूल केल्यावरून त्यांस सक्त मजुरीची शिक्षाही देण्यांत आली.

सातारा जिल्ह्याकरतां सरकारानें एक नवें शेतकीखातें (अग्रीकलचरल) मंजूर केलें असून तें येत्या एप्रिलपासून अमलांत यावयाचें आहे अशी एक तार प्रसिद्ध झाली आहे. हें नवें शेतकी खातें ह्मणजे काय हें समजत नाहीं.

पर्शियातल्या बिथरलेल्या लोकांनीं सरकारी फौजेशी एक लढाईही केली व त्यांत १०० लोक मेले असें समजतें. याचें नांव देशाभिमान.

श्रीनगरपासून गिल्जीतपर्यंत तारायंत्र सुरूं करण्याचा अंदाज चालूं आहे.

ठा० अ०

धारवाड जिल्ह्यांत १॥ लक्ष रुपये दुष्काळ पीडित लोकांच्या साह्यार्थ खर्चण्याची परवानगी मुंबई सरकारानें दिली.

ब्रह्मदेशांत एकंदर ८० लक्ष लोकवस्ती आहे.

चीनच्या बादशहानें इंग्रजी भाषेचा अभ्यास सुरु केला आहे.

दुसरा एक हिऱ्याचा खटला निजाम साहेबासंबंधीं मद्रासेस चालला आहे.

सु० प०

"काबूलचा अमीर आपली चूक सुवारण्याकरितां आतां निःसंशय रशियाकडे वळला आहे, आणि ह्मणूनच रशियाशी व्यापारासंबंधी तह करण्यासाठीं त्यानें आपले वकील त्याजकडे पाठविले आहेत. अमिराचें व इंग्रजांचे घोडे हल्लीं एके ठिकाणी पाणी पीत नाहीं हें रशियाला माहीत असल्यामुळें तो यावेळीं मोठ्या उत्कंठेनें अमिराला खांद्यावर घेईल! व्हैसरायानीं अमिराला हिंदुस्थानांत येण्याबद्दल निमंत्रण पाठविलें होतें, परंतु आजारीपणाचा बहाणा करून त्यानें तें नाकारलें. अमिराचें पाय ८० सालांत इंग्रजांमुळेंच काबूलच्या गादीस लागलेले आहेत, आणि तेव्हांपासून त्याला उलटा सालीना १२ लाखाचा खुराक चालविला आहे, पण हे उपकार न स्मरतां काबूलच्या अमिरानें इंग्रजी रेल्वे काबूल कंदाहारास नेण्याचें व काबुलांत तारायन्त्र खेळविण्याचें इंग्रज सरकारचे सर्व प्रयत्न धाब्यावर बसविले ! ! ह्यावरून आपली तुंबडी भरेपर्यंत अमीर वरकांती मित्राचे सोंग घेऊन आहे, तो भरतांच तो 'दुल्ला' करणार व रशियाच्या बगलेंत शिरून हिंदुस्थान सरकारानें पुरविलेली शस्त्रें च हिंदुस्थानावर चालविण्याचा निमक हरामी तो करणार. या संबंधानें हिंदुस्थान सरकार काय उपाय करणार हे अजून निश्चित कळलें नाहीं; पण त्यानें चालविलेल्या तयाऱ्यांवरून अमिराचा समाचार सरकार घेणार हेंच अनुमान कोणीही करणार आहे. येत्या हिंवाळ्यांत फक्त पेशावर येथेंच ४०,००० फौज जमाविण्यांत येणार, क्वेटा जिल्ह्यात उंटें जमाविणार व सरहद्दीवरील सर्व स्टेशनावरील तयाऱ्या ताबडतोब पुऱ्या करण्याचे हुकूम सुटले आहेत, ते दुसरे कशाकरितां असणार?" असें लोक प्रसिद्धपणें बोलतात तेव्हां खरें काय निघेल तें निघो.

धमकीचा जाहिरनामा– काठेवाडांतील गधका गावच्या दिंडी दरवाजावर कोणी असा जाहिरनामा चाविलेला सापडला कीं, "श्री ब्रिटिश सरकारच्या एजन्सी अधिकाऱ्यांपैकीं एक युरोपियन आफिसर ठार मारल्याशिवाय आमचे समाधान होणार नाहीं." हा जाहिरनामा गधका दरबाराकडुन तिकडे फिरण्यास गेलेले सर्वे सुपरिंटेंडेन्ट मि० फेटन यांचे हातीं नुकताच आला असें 'काठेवाड टाइम्स' वरून कळतें.

पिंपळाखालीं मोहरा– दिल्ली येथील काबूल दरवाजा जवळून हल्लीं रेल्वेची सडक चालली आहे. त्या लायनींत एक अश्वत्थ वृक्ष आडवा आला होता, तो कटाक्टर तांडेलाः ह्मणून शेजारच्या हलक्या जातीचे लोकांस तो वृक्ष तोडण्यास अधिकाऱ्यानीं सांगितलें. त्याचें बुंध खणींत असतां तेथें एक मोहर सापडल्याची खबर पोलिसास कळतांच पोलिसानें खणून पाहतां तेथें २५० मोहरा सांपडल्या.

सरहद्दीवर रशियानें जे पामिर प्रकर्ण नवीन उपस्थित केलें आहे, त्या संबंधानें विचार करण्यासाठीं सेंटपीटर्सबर्ग येथें इंग्लंड रशिया, चीन व काबूल यांचे प्रतिनिधींचें कान्फरन्स लौकरच भरणार आहे. पामीर प्रांत आपणास मिळाला नाहींच तर तो रशियास मिळूं न देतां इंग्लंडच्या तरी गळ्यांत पडावा अशी चीन सरकारची बुद्धि आहे.

कलकत्ता येथें अर्धापैसा किंमतीचें एक देशी प्रत्याहिक वर्तमानपत्र सुरू झालें आहे.

सुरतेच्या पूर्व बाजूस तापी तीरानें आगगाडी नेण्याचा विचार जी. आय. पी. रेल्वे कंपनीनें केला असून त्या रस्त्याची सर्वे ही सुरू होणार आहे.

स० शो०

इंडियन स्टांप अक्टांतील ८ व्या चाप्टर प्रमाणें आरोपीस केलेल्या दंडापैकीं माहिती देणारास दंडाच्या निम्मे रकमेपर्यंत इनाम देण्याचा माजिस्त्रेटास अधिकार आहे असें सरकारानें फर्माविलें आहे.

आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक कामांत ८८ प्रमाणें राष्ट्रीय सभेच्या फंडाकारतां घेण्याचें सोलापूरच्या वकिलांनीं सुरू केलें आहे असें समजतें. ही व्यवस्था फार उत्तम आहे व सर्व ठिकाणीं सुरू होईल तर बराच मोठा फंड जमेल यांत कांहीं शंका नाहीं.

मीठ व अपकारी बद्दल गोवें सरकाराबरोबरचा तह रहित झाल्यामुळें त्या हद्दींतला जकतीचा माल जाण्यायेण्याचा रस्ता सरकारानें कायम करून तो गेल्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध केला आहे. व त्याच प्रमाणें त्या बंदोबस्ताच्या बाबतींत कित्येक कामदारांच्या नेमणुकाही केल्या आहेत.

शेतकरी लोकांस तगाई देण्याच्या बाबतींत सरकारानें नवे नियम करण्याचें योजून ते गेल्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाले आहेत व त्याबद्दल कोणाची कांहीं हरकत असल्यास त्यांणी ती येत्या फेब्रुवारीच्या २१ व्या तारखेच्या आंत सरकारास कळवावी असें फर्माविलें आहे. याचा घाटावरील लोकांनीं विचार करावा.

काश्मीरांत ९,४९,०४१ वस्ती असून त्यांत ५,०२,३४१ पुरुष व ४,४६,६९६ स्त्रिया आहेत. यांत हिंदु पुरुष ३४,०७६ व स्त्रिया २६,१०५; मुसलमान पुरुष ४६५१७४ व स्त्रिया ४,२७,९२५ शिक पु. ६,९३७ व स्त्रिया २,५३६; ख्रिस्ती ७५ व ६८; झाडु ७५ व ६० आणि पार्शी ६ व २ असे आहेत.

मध्य एशियामध्यें आमुडॅरिगा नदीच्या उजव्या किनाऱ्यावर डोंगरी प्रदेशांत एक जमिनींत कोरून तयार केलेलें सुंदर शहर आढळलें आहे. यांत मजल्याची घरें, रस्ते, चौक, भांडीं कुंडीं व डागदागिने त्याच प्रमाणें नाणीं वगैरे सांपडलीं आहेत. त्यावरून हें शहर ख्रिस्तिशकाच्या दोनशें वर्षांपूर्वी तयार केलेलें असावें असा अजमास आहे.

सगळ्या युरोपांत ३७,५६,८५० मैल चौरस जमीन असून ३५,७३,७९,००० लोकवस्ती आहे, ह्मणजे सरासरी दरमैलीं ९२ माणसें प्रमाणें आहेत. एशियांत १७०४४१८२ एकर व ८२५९५४००० लोक असून दरमैली ४८ प्रमाणें आहेत. आफ्रिकेंत १.१२,७७,३२१ मैल व १६,३९,५३,००० लोक असून मैलीं १४ आहेत. अमेरिकेंत १४,८०,११,४०० मैल व १२,१७,१३,००० वस्ती असून दर मैली ८ प्रमाणें आहेत. आस्ट्रेलियांत २९,७१,४४० मैल जमीन असून ३२,३०,००० वस्ती असून मैलीं १ आहे. ओसनिबेटांत ७,३३,१२० मैल व १७,३०,८३० वस्ती असून मैलीं १० आहेत. पोलर हद्दींत १७,३०,८३० मैल व ४०४०० वस्ती असुन मैलीं ३ आहेत. मिळून एकंदर ५,२३१५१४७ मैल जमीन असून लोक १,४७,९७,२९,४०० आहेत व मैलीं २८ व आहेत असा एकानें शोध काढला आहे.

ठा० अ०

सावणाची विहीरः—युनायटेड स्टेट्स सच्छ्या डाकोटा संस्थानांत एक विहिर आहे, त्या विहिरींतून चिकणमाती सारखा पदार्थ काढतात, त्याची वडी करून वाळविली कीं, साबनाची वडी बनते त्यांत साबणाची द्रव्यें असतात साबणाच्या कारखानें वाल्यांच्या पोटावर पायच आले म्हणावयाचे!

चिनी समजुतः– चिनी लोकांची अशी समजुत आहे कीं, एखाद्या बाईला जर एकदम तीन मुलगे झाले, तर त्यांना ताबडतोब ठार मारावें; कारण त्या पैकींच एक सर्व राज्यावर स्वारी करून तें नाश करणारा असतो. तीन मुली झाल्या तर कांहीं नाहीं.

कलकत्या पासून मुंबई पर्यंत हवेंतून प्रवास—प्रो. जान वसल व मिस टहेल यांनीं दोन महिन्यापूर्वी जाहीर केल्या प्रमाणें ते पुढील पंधरवाराड्यांत वळूनच्या साह्यानें कलकत्याहून मुंबईस येण्याचा अपूर्व प्रयोग करून दाखविणार आहेत.

न्या० सिं०

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं आकोलें रेल्वे स्टेशनच्या गुडस् शडच्या फाटका बाहेर दोहीं बाजूस असलेली मुनिसिपालिटीच्या हद्दींतील जागा माल ठेवण्या कारितां ह्मणून हंगामा पुरती हरासानें देण्यांत येईल. व हा हरास तारीख ३ माहे फेब्रुवारी सन १८९१ बुधवार रोजी दुपारीं ४ वाजतां त्या ठिकाणीं होईल. ज्यानें जागा हरासांत घेतली नसेल त्यास तारीख ३ फेब्रुवारी सन १८९२ नंतर सदर्हू म्युनिसिपालिटीच्या जागेवर माल ठेवूं दिला जाणार नाही. तारीख २७ ज्यानेवारी सन १८९२ इसवी.

Vyaukatesh R. Mudholkar.

सेक्रेटरी, म्युनिसिपालिटी, आकोलें.

नोटीस.

मुकताई मर्द माहादु बुंढे राहणार पाहुरजिरं ता० खामगांव इस नोटीस देणार सदाशिव वल्लद रामजी डिगडे राहणार पिंपळ गांवकाळे तालुके जळगांव नोटिसीनें असें कळाविते कीं तुमची मुलगी नामे तानकी ही माझी लग्नाची बायको असून तुम्ही मनला व माझे बायकोस गेल्या दिपवाळींत दिवाळसणाकरितां चार दिवस उभयतास आम्हांस घरी घेऊन गेलां. दिपवाळी जाहालेवर आम्ही उभयतां गावीं परत येऊं लागलो त्यावेळीं तुह्मी माझे हातांतून माझे बायकोस हिसकावून घेऊन पाठविली नाहीं. नंतर मी तपाव वरीं येऊन पुढें बायकोस आणणेकरितां आलो तर तुम्ही सांगितलें कीं मी कांहीं तुमचे बायकोस आतां तुमचेकडे कधींही पाठविणार नाहीं; तुह्मी काय पाहिजे तें करा तर तुह्मांस असें कळविलें जातें कीं नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत बायकोस आणुन घालवावा नाहींतर तुमचेवर रीतीप्रमाणें फिर्याद करून बायको ताब्यांत घेतली जाईल व अखेर निकाल होईपर्यंत जो खर्च वगैरे माझा नुकसान होईल त्याजबद्दल व या नोटिसीचे खर्चाबद्दल सर्व रुपये भरून घेतले जातील ह्मणून दिली नोटीस सही ता० २७ जानेवारी सन १८९२ इसवी.

(सही)

सदाशिव वल्लद रामजी डिगडे दस्तुरखुद

## अकोलें बाजारभाव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हुंडे मुंबईची दर्शनी | | | | | ९९॥ |
| ,, ६१ दिवसाच्या मुदताची | | | | | ९९॥– |
| सुवर्ण | २३ | रुपे | १०८ | आळशी | ९५ |
| गहू काठे | ७७॥ | बनशी | | | ९० |
| जवारी | ४४ | चणे | ७० | सर्की | ५॥। |
| कापुस | ३६ | | | रुई | ४९ |
| मीठ | ३॥। | तूप | ८ | तेल | ५॥ |

सद्याचे भाव. (मोगलाई)

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | बसंत | १९४८ | ४४ |
| गहू | वैशाख शुद्ध | १९४८ | ६८॥ ≡ |
| आळशी | चैत्र शुद्ध | १९४८ | ८५॥ ≡ |
| रुई | फाल्गून | १९४८ | ५२॥= |
| सर्की | वैशाख नवे साळची | १९४८ | ५॥≡॥ |

शु० व०

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांणीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ८१२
सहामाही " ३ " ८८
सालअखेर " ७ " १८८
किरकोळ अंकास ........................ ८४

annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy.....................................1as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस ........८१

Advertisements
Below 10 lines...2 as
per line over10...4Rs
Repetition per line 2 a 1

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXVI AKOLA MONDAY 8 FEBRUARY 1892 NO 6

वर्ष २६ . अकोला सोमवार तारीख ८ माहे फेब्रुवारी सन १८९२ इ० अंक ६


नोटीस.

रा. रा. सूर्यभान धनाजी पाटील राहणार तरोडे तालुके अकोट जिल्हे अकोले यांस नोटीस देणार वलीआमद वल्लद गुलआमद मुसलमान राहणार कावसा ता० अकोट जिल्हा अकोले नोटिसीनें असें कळवितो कीं माझे खात्याच्या खरेदीचा सवदा रुपये५२५ पांचशेपंचवीस रुपयांस तुह्मी करून आज समारें तीन हप्ते होत आले. सवदा खरेदीचा झाला व त्याप्रमाणें तुह्मी पांच रुपये इसारा दिला व हा सवदा झाला व याजबद्दल मी तुम्हास रुपये आज पावेतो मागतो आहे परंतु तुम्ही रुपये देत नाहीं व मजला थापा मारितां. ह्या सर्व गोष्टास कावसा गावचे पुष्कळ साक्षीदार आहेत. त्यापैकीं तूर्त दोनच साक्षीदारांची नांवें कळवितो व पुढे कारण पडल्यास ज्यास्त देईन. साक्षीदाराची नांवें. सूर्यभान कोळी व दुसऱ्या वल्लद बाबू धनगर राहणार कावसा हे आहेत. ह्यांच्या समक्ष सर्व सवदा झाला आहे. आतां नोटिसीनें असें कळवितो कीं नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत सदरहू ठरल्याप्रमाणें रुपये ५२० आणून द्यावें व नावें शेत करून द्यावें असें झालें नाहींतर दुसऱ्यास ते मी शेत विकून ठरल्या रकमेंत कमी रुपये जितकें येतील तितक्याबद्दल फिर्याद करून अखेर निकाल होईपर्यंत जें नुकसान व ह्या नोटिशीचा खर्च असें सर्व भरून घेतलें जाईल. ज्यास्ती रुपये आल्यास तुमचे तुम्हांस मिळतील ह्मणून दिली नोटीस सही ता० १–२–९२ इसवी.

( सही )

सहीची निशाणी कट्यार वलीआमद वल्लद गुलआमद याची असे.

---

नोटीस.

रा० माहादापा वल्लद खंडापा वाणी दुकान बाळापूर मालक नारायणआपा ओंकार आपा राहणार बाळापूर यांस खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आम्ही आपले खामगांव येथील जलालपुऱ्यातले घर किंमत रुपये १३७८ तेराशे अठ्याहत्तरास तुम्हास विकत दिलें. विक्रीचे शर्तीप्रमाणें खरेदीखत लिहून मी सही केली. किंमतीबद्दल रुपये आपण रजिस्टर कचेरींत देण्याचें कबूल होतें. दस्तऐवज मी रजिस्टर करून घेतला परंतु आपण मला रुपये न देतां ता० १-१-९२ चे नोटिसीनें आपले मनची एक नवीन शर्त विक्रीचे करारांत ढकलून त्या शर्तीची अट घालून आपले रुपये देण्याचे करारापासून आपण निसटून जाण्यास पाहत आहां. जो करार ठरला त्याच्या शर्ती बरोबर रीतीनें खरेदीखतांत लिहिल्या आहेत. सबब आपले नोटिसींत लिहिल्याप्रमाणें मी कोणतेही रीतीनें जबाबदार नाहीं. यापूर्वी एक नोटीस मी आपल्यास दिलीच आहे. हल्लींची नोटीस देण्याचा मूळ हेतू असा कीं कराराप्रमाणें लिहिलेले खरेदीखत व विकलेली मिळकत मी आपले ताब्यांत देण्यास तयार आहे. करितां नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत रुपये आमचे घरीं अगर मे. न्यामतखां मक्तेदार बाळापूरकर यांचे येथें भरावे. तसें न केल्यास मिळकतीवर आपला कोणतेही तऱ्हेनें हक्क राहणार नाहीं शिवाय आपले लबाडीमुळें आम्हास विनाकारण लागलेला खर्च व झालेली नुकसान आपलेपासून भरून घेऊ व आम्हास वाटेल त्यास सदरहु मिळकत आम्ही विकू अगर वाटेल ती दुसरा व्यवस्था करू. तारीख २-२-९२ इसवी.

( सही )

गणेश परशराम पांडे दस्तुर खुद्द.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती माघ शुद्ध ११ शके १८१३

अलिकडे सामाजिक सुधारणे संबधानें चिहितांना उलट पक्षाला हवेंतेंस टोचून लिहिणें व त्याभरांत हवें तें लिहिणें हा स्वपक्ष सिद्ध करून दाखविण्याचा एक मार्ग झाला आहे. संमती बिलाचे वेळेस हा प्रकार साजण्या सारखा होता. कारण त्यावेळीं निष्पक्षपातानें व शांतपणें लिहिणें दुरापस्तच होतें. पण तोच रोख अजून पर्यंत राखणें हें चांगलें नव्हे. पुण्याची गोष्ट अलाहिदा आहे. कारण तेथें वादविवाद ही बरेच झाले व त्यावर कृष्ण कारस्थानें ही बरींच उत्पन्न झालीं. परंतु आमच्या प्रांतांतील वर्तमान पत्रांनीं पूर्वीचा रोख राखणें व व्यक्ति विशेष संबधानें कांहीं कारणें न दाखवितां असंभाव्य मजकूर प्रसिद्ध करणें हें उचित दिसत नाहीं. आमचे वैदर्भकार ह्या दोन गोष्टीकडे लक्ष देतील तर फार बरें होईल. नुसतां संबध असला कीं पुरे कीं ह्या दोन कोरडे असा प्रकार चांगला नाहीं. वैदर्भकारांनीं लिहितां लिहितां असें लिहिलें आहे कीं रा. रा. नामजोशीं यांनीं 'सामाजिक परिषदाचे वेळीं कांहीं लोकांस 'नो नो' ह्मणण्यास आणून ठेवलें होतें. हें वैदर्भकारांनां सिद्ध करून देणें किती जड जाईल. वैदर्भकारा बरोबर आणखीही पुष्कळ मंडळी सभेंत हजर होती- लोकांचा 'नो नो' ह्मणण्यांत वैदर्भ कारांनां दुसरा कांहींच हेतु आढळला नाहीं काय? कदाचित वैदर्भकार वक्त्यांचे फार जवळ असतील. खरी गोष्ट अशी होतीकीं सूचना व प्रतिसूचना किंवा उपसूचना सर्वांनां कळत नसत; कारण दोन चार वक्ते खेरिज करून बाकीच्यांची भाषणें सर्वांनां ऐकूं आलीं नाहींत. यामुळें अध्यक्षांनीं मत विचारल्यावर सूचना कोणती हें विचारणें जरूरच पडे. सर्वांनां ह्या गोष्टी ऐकूं येत नव्हत्या याचें उदाहरण पाहिजे असल्यास आह्मीं वैदर्भकारांस देतो. त्यांच्या कदाचित लक्षांत असेल कीं कांहीं ठराव केवळ सर्वांनां ऐकूं जावे ह्मणून अध्यक्षांचे बदली दुसऱ्यांनींच वाचले. ही गोष्ट वैदर्भकारांस ठाऊक पाहिजे होती पण त्यांचा व टिळक, नामजोशी यांचा बारावा बृहस्पाति - मग कसची त्यांनां ही गोष्ट सुचते. त्यांनीं दिला ताशेरा झोंकून. याच लेखांत रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांसही एक टोला आहे. निव्वळ विरुद्ध पक्षांचे ह्मणून वाटेल त्या रीतीनें लिहिणें हा योग्य मार्ग नाहीं असें आह्मांस वाटतें.

---

लेडी डफरीन फंडाची पोटशाखा वऱ्हाड करितां स्वतंत्र आहे तिच्या सहावे वार्षिक रिपोर्टाची एक प्रत आम्हा कडे आली तिचा आभार पूर्वक स्वीकार करून त्यांतील मुख्य मुख्य माहिती आम्ही येथें देत आहों. वऱ्हाडच्या फंडाचे अध्यक्ष, मेंबर, लाईफ मेंबर, सेक्रेटरी वगैरे मिळून एकंदर २९ गृहस्थ व्यवस्थापक आहेत. सन १८८६ तील एप्रिलच्या दुसरे तारखेस हा फंड उभारला त्याची एकूण रक्कम गेल्या नोवेंबरच्या अखेर रोजीं रुपये ६८४५३–६–६ पै. त्यांत गुदस्त झालीं पैसा गोळा झाला तो रुपये २७२६–० आ– ६ पै आहे. या पैशांपैकीं अकोले जिल्ह्यांतून ८० रुपये वर्गणी मिळाली आहे बाकीच्या पांच ही जिल्ह्यांतून कांहींच वर्गणी जमली नाहीं ही गोष्ट अगदीं सुमार होय. सरकारी लोकल फंडांतून प्रत्येक जिल्ह्यामागें २०० रुपये लेडी डफरिनफंडा प्रीत्यर्थ खर्चीं घालण्याचा संकल्प आहे. त्या प्रमाणें अकोला, इलिचपूर, बुलढाणा, आणि वाशिम या चार जिल्ह्यांतून दोनशे दोनशे रुपये पाठविण्यास अलिशान रेसिडेंट साहेबांची योग्य वेळेवर मंजुरात न मिळाल्या मुळें आठशे रुपये चालू रिपोर्टाच्या वर्षांत जमा झाले नाहींत. लेडी डफरिन फंडाची उपयुक्तता लक्षांत आणून शेगांव मुनसिपालिटीनें आपल्या ऐपती प्रमाणें सदर्हू फंडासाठीं २५ रुपये दिले आहेत. शेगांव मुनसिपालिटीचें उदाहरण इतर श्रीमान व बहुसाळ मुनसिपालिट्यांनीं उचलावें आणि आपल्या सवडी प्रमाणें या सत्कृत्याला उदार आश्रय द्यावा म्हणून सेक्रेटरी मि. आरदेसर दिनसाजी चिनाय यांनीं सूचविलें आहे. एकंदर फंडा पैकीं ५०, ५०० रुपये बयांके मध्यें ठेविलेले आहेत. रिपोर्टाच्या वर्षी सर्व खर्च १८५३ रु. ९ आ. ७ पै. झाला असून त्यांत सुईणींच्या पगारा निमित्त आणि इतर बाट खर्चा निमित्त १६०६ रु० ० आ. १ पै. आहे. मुंबईच्या 'कामा हास्पिटलांत' वऱ्हाडच्या सुईणीस शिकण्याची कायमची सोय असावी म्हणून वऱ्हाडच्या पोटफंडांतून ४००० रुपये त्या प्रीत्यर्थ खर्च करण्यांत आले आहेत. एवढी चांगली सोय असून ही मुंबईस शिकण्यास जाण्या साठीं हुषार व लायक अशा सुईणी मिळत नाहींत ही खेदाची गोष्ट होय. नागपूरच्या डफरीन हास्पिटल मध्यें जाण्यास कांहीं जणी सिद्ध असतात परंतु त्यांना पाठवून शिकविण्याचा खर्च करण्याची जरूरीच राहिली नाहीं. नागपूर, मद्रास, व मुंबई या प्रांतांतून चांगल्या शिकलेल्या व वऱ्हाडांत नोकरी पतकरण्यास तयार असलेल्या अशा सुईणी पाहिजे तितक्या आयत्या मिळूं लागल्या आहेत. वऱ्हाडांत आज मितीला एकंदर अकरा सुईणी असून त्यांनीं ३७६ रोग्यांस औषधोपचार केले. डाक्टरीचा धंदा करणाऱ्या बायका या प्रांतांत स्वतंत्र दवाखाने काढून उद्योग करूं लागल्या नाहींत. उमरावतीस कांहीं मिशनरी बाया किरकोळ औषधपाणी देत असतात परंतु त्याचा तादृश उपयोग नाहीं.

स्त्रिया करितां एक दोन स्वतंत्र दवाखाने काढण्याचा वऱ्हाडच्या फंडकमिटीचा विचार आहे. त्या कमिटीचे अध्यक्ष कर्नल मेकंझी साहेब यांनीं हें कार्य सिद्धीस नेण्या विषयीं मोठी खटपट चालविली आहे. साही जिल्ह्यांच्या डेपुटी कमिशनरांस स्त्रियांच्या हास्पीटला साठीं पैसा गोळा करण्या बद्दल सरक्युलरानें कळविलें आहे. उमरावतीस पहिला व जमल्यास अकोल्यास दुसरा असे दोन दवाखाने बांधण्याचा विचार चालत आहे. एका दवाखान्याच्या इमारतीस १७००० पासून २४००० पर्यंत रुपये खर्च येईल आणि त्या दवाखान्याच्या व्यवस्थेसाठीं सालिना ३००० रुपये निराळे खर्चावे लागतील. या पैकीं लेडी डफरिन फंडांतून ५००० रुपये देण्याची सवड असून उमरावती मुनसिपालिटीनें १००० रुपये देण्याचें कबूल केलें आहे. तेव्हां दरएक जिल्ह्यांतून तीन तीन हजार वर्गणी गोळा झाली म्हणजे अठरा हजार रुपये होतील. सबब, उदारधी सत्कार्याभिलाषी, लौकिकेच्छु लोकांनीं हस्तें परहस्तें यथाशक्ति मदत करावी, लोकल कमिट्यांनीं हें वर्गणीचे काम हातीं घ्यावें, तहशील कचेऱ्यांतून वर्गण्या गोळा कराव्या, भूतदयेचें हें कृत्य असून तें अबला जना प्रीत्यर्थ करावयाचें आहे तेव्हां लोकांनीं हें कार्य सिद्धी करावी अशा मतलबाचे सरक्युलर लिहिविण्यांत आलें आहे. या अध्यक्षांच्या सरक्युलरावर सेक्रेटरी मि. आरदेसर दिनसाजी चिनाय यानीं आपला ही अभिप्राय आमच्या कडे पाठविला होता. गोरक्षणी सभेकडे लोकांचें मन वळलें आहे तें अगोदर स्त्रियांच्या आरोग्य रक्षक सभेकडे वळवावें असें ही त्यांनीं म्हटलें आहे. त्याच्या मतें वऱ्हाडची लोकसंख्या दहावर्षीं पूर्वी २६,७२ ६७३ होती ती शेंकडा आठ या प्रमाणें वाढली आहे तेव्हां प्रत्येक माणशीं एक एक

पै आकारली तरी देखील पाहिजे त्याहून अधीक रक्कम गोळा होईल. त्या अर्थी धनसंपन्न सुखवस्तु लोकांनीं मनावर घेतल्यास खचित आवश्यक अशा दवाखान्याची उभारणी हातों हातीं होईल अशी मोठी उमेद आहे.

( आमच्या एका मित्रा कडून )

गेल्या २२ वे तारखेस मुंबई युनिव्हरसिटीचा पद वीदानाचा समारंभ झाला त्या वेळीं व्हाईस चान्सेलर नामदार बर्डवुड साहेब यांनीं आपल्या भाषणांत गेल्या तीस वर्षांच्या मुदतींत वरिष्ठ प्रतीच्या शिक्षणाचा प्रसार किती जलदीनें वाढला आहे तें आंकड्यांनिशी दाखविलें. हल्लीं म्याट्रीक्युलेशन परीक्षेस दरसाल शेंकडो विद्यार्थी बसतात आणि शेंकडो कालेजांतून अभ्यास करून वरवरच्या युनिव्हरसिटी परीक्षेस जात असतात हें मनांत आणलें म्हणजे आकड्यांशिच टाळा बसविण्याचें कांहीं कारण नाहीं. विद्यालयें बहुविध व बहुत झालीं व तीं सर्व चांगलीं चाललीं आहेत आणि उत्तरोत्तर अधुनिक व होतकरू पीढ्या विद्येनें संस्कृत होत आहेत ही आनंदाची गोष्ट होय. देशांतील लोक सुशिक्षित असणें हें त्या देशाच्या भरभराटीचें सुचिन्ह होय. हे साधारण व व्यापक शेरे देऊन अभिनंदन करण्याचा शिष्ट सांप्रदाय पडला आहे व अशा प्रकारचे अभिप्राय आम्ही थोर थोर बुद्धिमान, पंण्डित, व मुत्सदी अशा लोकांच्या तोंडून ऐकतों तेव्हां त्यांच्या म्हणण्या विरूद्ध कांहीं प्रतिपादन करण्याचें धाडस कोणी करीत नाहीं परंतु रात्रंदिवस ज्या गोष्टी आमच्या डोळ्या पुढें खेळत आहेत आणि ज्यांच्या बरें वाईट पणा वर आमच्याच होतकरू विद्यार्थ्यांचें हिताहित अवलंबून आहे त्यांच्या संबंधानें दुर्लक्ष्य ही करवत नाहीं म्हणून त्या सूज्ञ गृहस्थांच्या अनुमोदनानें खालीं दाखल केल्या आहेत.

१ इंग्रजी भाषा शिकण्याच्या पायीं अर्ध्याहून अधीक आयुष्य खर्ची पडतें. देशी भाषा चालू कराव्या व इंग्रजी भाषा व्यवहारांतून काढेवल तितकी काढावी नाहींतर इंग्रजी भाषा जन्मभाषे प्रमाणें लहानपणा पासून शिकवावी.

२ अभ्यास फार वाढले आहेत आणि परीक्षा अतोनात झाल्या आहेत. अभ्यासांच्या व परीक्षांच्या चक्रांतू निघणाऱ्या विद्यार्थ्यांचा बहुत करून सर्व देह निर्माल्या प्रमाणें असतो.

३ उच्च शिक्षणाच्या दरवाज्याला डोकी आपटे पर्यंतच लागणाऱ्या नाना विषयांतल्या ज्ञानाच्या प्राप्ती साठीं इंग्रजी भाषेच्या काठिण्या मुळें पुष्कळ वर्षें लागतात. सांप्रतची शिक्षण पद्धती चांगली नसून वास्तविक शिक्षणाला व्यत्यय कारक आहे.

४ पैसा अवाढव्य खर्च होतो आणि ज्ञान फळ हातीं लागण्याचा अगोदरच ज्ञानाच्या टरफलावर मनाची समजूत करून पुष्कळांस आयुष्य कंठावें लागतें. चालू शिक्षणानें पोटापाण्याची सोय होत नाहीं आणि सर्व भराभर व्यर्थ होतें.

५ सांप्रतचें शिक्षण न शिकावें हें बरें. त्या पासून कोल्ह्यावघी लोकांस भलता मार्ग दाखविल्या सारखें होत आहे. व्याकरणाची किंवा न्यायाची घटाटोप व खटपट नको अशीच स्थिती प्रचंड प्रजेची आहे. कोणती दिशा धरली पाहिजे व त्या दिशेला कोणकोणत्या वाटा आहेत हें ठरविण्या पूर्वीं स्तब्ध रहावें हा शहाणपणा आहे कीं नाहीं?

६ अंधन्यायानें सर्वजण एका माळेंत चालले आहेत. मुलाला शाळेंत घाला, ऐपती प्रमाणें शाळेंत तो शिकेल तें शिको, आणि त्याच्या प्राक्तना प्रमाणें त्याला रोजगारधंदा मिळेल तो मिळो. सारांश लोकांची मती व गती कुंठली आहे आणि त्या मुळें ते अनन्यगतिक बनले आहेत.

सारांश, सांप्रतची शिक्षण पद्धति कुचकामाची आहे. भावी स्थिती कशी होईल हा प्रश्न सुटण्या सारखा नाहीं तरी सर्व गोष्टींचा ओघ वाईटा कडे आहे असें मात्र दिसत आहे. कालमहिमा कल्पनेच्या बाहेर आहे तरी आजची दुस्थिति आणखी पावशतकानें तशीच न राहतां ऱ्हासा प्रत पोंचेल असें अंतस्थ कारणाच्या परिणामा वरून वाटतें.

---

गेल्या मंगळवारीं लार्ड सालिसबरी हे एक्झीटर मुक्कामीं आपल्या कान्सरव्हेटिव पक्षाच्या सभेंत बोलतांना इजिप्त संबंधानें म्हणाले कीं इजिप्तचे माजी खेदीव मरण पावल्यानें एक मोठा मनुष्य हरपला. खेदिव मोठे हुशार, सरळ आणि प्रामाणिक होते. मिसर देश ज्या संकटा मध्यें पडला होता त्यांतून तो पार पडला याचें श्रेय खेदिवांस आहे कांकी त्यांची सात्विक वृत्ति, साळढाळपणा, आणि शहाणपणा इत्यादिकांच्या जोरावर राज्यकारभार सुयंत्रपणें चालूं लागला. धर्मावर पूर्ण निष्टा असून आपल्या ज्ञातीबांधवांस मुख्य मुख्य अधिकार देण्याकडे ते विशेष लक्ष देत असत. इंग्रजी मुत्सद्याची सल्ला मसलत आणि कुशलतेची तोडजोड यांचा सावधगिरीनें उपयोग करून आपल्या गोष्टींची व आपल्या संस्थाची चिकाटी बळकट कायम धरली म्हणून इजिप्तची वसूलजमाबंदी व्यवस्थशीर झाली आणि इतर सर्व प्रकरणें सोयीस लागलीं. ही प्रस्तावना आटोपल्यावर त्यांच्या मागून तक्तावर बसलेले नवीन खेदिव ही त्यांनीं आरंभलेल्या सुधारणा व त्यांनीं घालून दिलेल्या पद्धती कायम ठेऊन देश सुखी करितील अशी त्यांनीं आशा प्रदर्शित केली. इजिप्त देशांत इंग्रज सरकारचा पाय शिरला आहे तो माजी खेदिवाच्या मरणानें चांगला मजबूत रितीनें स्थीर व चिरस्थाई झाला असें अनेक राष्ट्रांचें ह्मणणें आहे आणि तें अक्षरशः खरें आहे. इंग्रजांचा राज्यविस्तार, अफाट बलसामर्थ्य आणि समुद्रावरील वर्चस्व ही मनांत वागविली ह्मणजे प्रत्येक शोधक दृष्टीनें व इतिहासांतील माहितीच्या आधारानें पाहणाऱ्यास आढळून येईल कीं इंग्रजांतली सुखसमृद्धि तळवारीला माखलेल्या साखरे प्रमाणें गोड गोड आहे. त्या साखरेची गोडी घेणाऱ्यास मुख कसें होतें तें कळत असल.

---

वऱ्हाड प्रांतांच्या सन १८९०।९१ साला बद्दल काढलेल्या आढाव्या वरून दिसतें कीं उत्पन्न १००,९५,९५० रुपये असून खर्च ८५,९२,७२० रुपये आहे ह्मणजे शिलकेंत १५,०३,२३० रुपये राहतात. ३९ वर्षांपूर्वीं या प्रांताचें ऐन साऱ्याचें उत्पन्न ३०९९६१० रुपये असून सर्व एकुणात उत्पन्नाची रक्कम ४०७७४०० रुपये होती आणि एक पिढीचा काळ लोटून कांहीं वर्षें लोटल्या नंतर आजमितीला जमिनीचें उत्पन्न ६५,२४,७४० रुपये ह्मणजे दुप्पटीहून ही अधिक वाढलें आहे आणि एकंदरीनें इतर सर्व उत्पन्नांच्या बाबी धरून जवळ जवळ अडीच पटी नजिक प्रमाण येऊन बसलें आहे. उत्पन्न वाढण्या सारख्या अनेक सुधारणा झाल्या आहेत तरी उत्पन्न अडीच पटीनें वाढण्या इतक्या त्या नसून सरकार देणें नानाविध रूपानें प्रजेला कष्टप्रद झालें आहे. वऱ्हाड प्रांताची मूळची श्रीमती लयास जाऊन लोक दिवसें दिवस निर्धन व बेरोजगारी होऊं लागले आहेत आणि तशांत सरकार देणें सालोसाल जबर वाढत चाललें आहे. ही स्थिति सुधारणा चक्रा बरोबरच गमन करणारी असल्यामुळें वऱ्हाड प्रांताचीच काय पण सर्व हिंदुस्थानची आधिभौतिक संपत्ति वृद्धिंगत होण्याचे उपाय प्रचूर व बहुसाळ होतील तेव्हां सांप्रत स्थितीच्या ओघाला निराळी दिशा लागण्याचा संभव आहे.

खर्चाची रक्कम ८५,९२,७२० रुपये आहे त्यांत लष्करच्या खर्चा साठीं ३३,७६,०६० रुपये असून मुलकी व न्याय मुनसफी साठीं ३६,४५,८१० रुपये खर्ची पडले आहेत. खर्च ही भारी वाढले आहेत, न्याय कोर्टें, रजिस्ट्रेशन खातें, शाळा खातें, दवाखानें वगैरे सर्व संस्था पुष्कळ वाढल्या आहेत तरी खर्चा पेक्षां उत्पन्न सालोसाल अधीक अधीक वाढून शिलक सांठविली आहे ती गेल्या चाळीस वर्षांच्या काळांत एकूण ३,२६,०६,५४० रुपये झाली आहे.

---

वऱ्हाड प्रांताची शिलक सांखळी तपासण्याचा निजाम सरकारचा अधिकार नाहीं तरी हा प्रांत अमानी मुलूख असल्या मुळें खर्चवेंच भागून शिलकेंत रक्कम गोळा होईल ती निजाम सरकारच्या खजिन्यांत पोंचती करावी असा तहनामा आहे. सन १८५२ च्या सुमारास निजामसरकारचें दिवाळें निघालें, हैदराबाद संस्थानच्या संरक्षणा निमित्त ठेवलेल्या इंग्रजी फौजेच्या पगारांची बाकी थकली, हिंदुस्थान सरकारनें मागील कर्जफेडी साठीं व पुढील खर्चाच्या व्यवस्थे साठीं निकराचा व निक्षून तगादा लाविला तेव्हां निजाम सरकारनें निरुपाय होऊन अलाहिदा वऱ्हाड प्रांत तैनाती लष्करा साठीं सोडून दिला तो अद्याप तसाच इंग्रजाकडे आहे. सरासरी दाहा वर्षांच्या मुदतींत मागील कर्जाची फेड झाली व चालूं खर्च ही भागून पांच पांच लाख रुपयांची सालिना शिलक राहूं लागली. राज्यकारभाराचे सर्व अधिकार इंडिया सरकारकडे सोंपविले आहेत तरी शिलकेवरील स्वामित्व निजाम सरकारचें असल्या मुळें सहा वर्षें शिलकेंत पैसा सांठल्यावर प्रथम सन १८६६–६७ सालीं निजाम सरकारास पांच लक्ष रुपये देण्यांत आले आणि तेव्हां पासून प्रांताची वहिवाट करून शिलक राहते त्यांतून दरसाल लहान मोठी रक्कम पोंचवति पोंचवीत सन १८९०–९१ अखेर २,८४,५०,२१० रुपये निजाम सरकाराच्या तिजोरींत भरणा केले ते वजा जाता साचलेल्या शिलके पैकीं ४१,५६,३४२ रुपये इंडिया सरकार कडे निजाम सरकारचे येणें निघत आहे आणि ही रक्कम निजाम सरकारचे नांवानें सरकारी कागदोपत्रीं जमा आहे.

---

वरील साडे ऐकेचाळीस लक्ष रुपये इंडिया सरकारकडे शिलक आहेत तरी एवढ्या मोठ्या रकमेचा उपयोग करण्या बद्दल इंग्रज सरकार निजाम सरकारास व्याज पोंचवितें अशांतली कांहीं गोष्ट नाहीं. कदाचित राज्यकारभाराच्या सुरक्षित पणा साठीं व सुयंत्रणा साठीं ही शिलक हातीं असणें जरूर ही असेल. परंतु ही गोष्ट नवलाची होय कीं एवढी रक्कम हस्तगत असून ही वऱ्हाडप्रांत ज्याचा त्यास परत करावा अशी बुद्धि आमच्या सरकारास होत नाहीं आणि निजाम सरकार ही त्या प्रांताची मागणी करण्यास सिद्ध झालें नाहीं. तैनाती फौजेच्या एका वर्षाच्या खर्चाची रक्कम सरकारच्या ताब्यांत आहे तेव्हां प्रांत परत करण्यास न्यायाच्या व स्वार्थाच्या नजरेनें कांहीं योग्य व्यत्यय दिसत नाहीं. माशानें गिळलेल्या माणका प्रमाणें वऱ्हाड प्रांताची स्थिति आहे. कदाचित ४० वर्षांच्या वहिवाटीचा हक्क स्वामित्व नष्ट करण्यास पुरेसा असेल. इंग्रजी अमला खालील प्रांतास निजामशाई आवडणार नाहीं असें ही घेऊन चाललों तरी देखील ती सबब न्यायाला सोडून असणार आहे. आह्मा प्रजेला काय, रुळलेलाच अमल ठीक आहे परंतु आमच्या परत जाण्यानें नेटीव संस्थानाची मर्यादा वाढेल, इंग्रजांचा किता संघट्टनाच्या दळणावळणानें संस्थानच्या जुन्या राज्याला मिळेल आणि एकंदरीनें इंग्रज सरकारची मोठी कीर्ती होऊन त्यांच्या राज्याला विशेष चिरस्थाईपणा येईल असें निराळ्या पक्षानें वाटतें. कसें ही असलें तरी सध्यां तो प्रश्नच निघत नाहीं ही गोष्ट कोणास ही आवडणार नाहीं.

---

गेल्या सोमवारीं अकोले जिल्ह्यांतील अपकारीचा हरास झाला. हरासाच्या वेळीं खुद्द डेपुटी कमिशनर आणि या जिल्ह्यांतील सर्व तहशिलदार हे मामूल सांप्रदाया प्रमाणें हजर होते. मक्ते घेणार लोक ही बरेच जमले होते आणि परस्परामधील चढाओढीनें व भावी फायद्याच्या कमजास्त प्रमाणानें गतवर्षांपेक्षां हरासाची किंमत फार वाढली. सन १८९२–९३ साला करितां मक्त्यांची विक्री झाली त्यांतील दारू, अफूगांजा, आणि शिंदी असे अपकारी हरासाचे ३ पोटभेद असून तिन्ही मक्ते स्वतंत्रपणें हरासानें दिले जातात तेव्हां हा निरनिराळा तपशिल न देतां एकंदर प्रत्येक तालुक्यामागें सरकारी खजिन्यांत अपकारी निमित्त किती मोठ्या रकमेचा भरणा होत आहे हें कळविण्यासाठीं तालुकेवार आंकडे दाखवावयाचे ते येणें प्रमाणें:–

| | रुपये. |
|---|---|
| अकोला | ११५८०० |
| बाळापूर | ९३१०० |
| खामगांव | ६४३७५ |
| अकोट | ८७७२५ |
| अकोली जहागीर | ४५०० |
| जळगांव | ५६०५० |
| कुवरदेव | ११२५ |
| एकूण | ३,८२,६७५ |

वरील सर्व आंकड्यांची एकुणात घेऊन गुद- स्त सालच्या आंकड्यांशी ताडून पाहतां २७००० रुपयांची हरासाची किंमत वाढली आहे असें दिसून येतें. सत्तावीस हजारांची वाढ एका अकोले जिल्ह्यासाठीं आहे ही गोष्ट अगदीं वाईट होय. सरकारची पद्धत अशी आहे कीं दारू, अफूगांजा, शिंदी वगैरे माद क पदार्थांचें सेवन नसनसे हे मादक पदार्थ महाग विकले जातील त्या मानानें आपोआप कमी कमी होत जाईल आणि ह्मणून सरका- रचा रोख ह मक्ते वाढविण्याकडे विशेष अस तो. परंतु वास्तवीकपणें लोक अंमली पदार्थ सर्वथैव सोडून देतील असें कालत्रयीं घडणार नाहीं. लोकांस थोडाबहुत हा अम्मल आणणारा माल बाजारांत मिळणें अवश्यक आहे आणि तो फार महाग विकला गेल्यानें व्यसनाधीन झालेले व दारिद्र्यावस्थेंत बुडलेले लोक मादक पदार्थांच्या सेवनासाठीं अन्नपाण्याला आंच- वतात आणि त्यांची कुटुंबे त्या त्या व्यसना खालीं चुरडून जातात. हरासाच्या किंमती वाढल्या ह्मणजे गरीब गिऱ्हाईकांवर त्या र- कमा आकारल्या जातात आणि तेणेंकरून त्यांच्या उदरनिर्वाहाच्या संचयावर अपरोक्ष रीत्या असा निराळा घाला पडतो. मुख्य सु- धारणा ही पाहिजे कीं मादक पदार्थ महाग असोत किंवा स्वस्त असोत त्या पदार्थांपैकीं प्रत्येक चीज दर माणशीं कमी प्रमाणानें वि- ली जावी आणि अशा प्रत्येक माणसाचें नाव रजिष्टरीं नमूद असून त्यानें किती किती मा- दक पदार्थ सेवन केले याचा दाखला असावा. सारांश, दारू, गांजा वगैरे पदार्थांची उत्पत्ति व व्यय हीं ज्या हरतऱ्हेनें कमी करण्यांत ये- तील त्या तऱ्हें तीं कमी झालीं पाहिजेत. सरकारची दृष्टी स्वार्थावर असून लोकांच्या नैतिक उन्नतीवर ही आहे. हे दोन्ही हेतु एकसमयावच्छेदेंकरून साध्य होण्यासारखे ना हींत तेव्हां सरकारी अबकारी खात्याचें उत्पन्न कमी न होतां ज्या सुधारणा होतील त्याच स्वप्या मानल्या पाहिजेत.

# The Berar Samachar

MONDAY, FEBRUARY 8, 1892

Religion is a grand unifying cement. In India it is specifically so A fully religious life was a good social life according to the best notions of a Hindu society. So the old system of castes and classes correspanded with the different ranks and grades in society. But with the gradually increasing unsuitableness of religious clans and castes to the varying circumstances and conflicts of the people of different creeds and sects the caste-system of old times came to be discredited and the fusion of religious and social distinctions became an impossibility. The differences marked by social well being and social existence are the modern principle of division and put different people in a society into so many separate classes. People all over the world have observed a sort of caste-system. The caste system in India is founded upon religion. It is at present on a slippery ground because it has lost more or less its religious import.

We don't court an adventure nor do we improve upon our old things. Antiquity is no doubt a good-stand whence we should survey our field of reform; but when we advance we ought to keep a watch of the surroundings that hem us all around. The caste-system of India may be a good thing of those times but it is a bane to the modern society. A wholesale abolition of castes or other distinctions which human nature and intellect has brought upon to mark out one man from another will never succeed or gain ground. Birth brings some status to a native of this country and it is death alone that removes all barriers of littleness & greatness of artificial introduction. A man is born a Bramin, kunbi, or a low-caste one. It is not based upon sound principles of equity and jurisdiction. Long immemorial usages and customs have sanctioned the caste-system and made it holy and sacred. But the times are changed and we are expected to leave a man to earn his own distinction with the help and means to which he has every legal and allowable right and with the gifts of intellect & perception with which he is endowed. The competitive system runs contrary to the caste-system. Let every one secure the best market he can for his own attainments. This is in short the guiding principle of the Western nations While in India every one has his own fixed market to traffic upon his own commodities which he inherits at his birth unless he honours himself with the breach of his caste-system and chooses another sort of market. But the latter thing is generally beyond one's ordinary means to get effected in spite of the aggressive and turbulent opposition of his colleagues in the society. But with the widespread popularity of the English Government the spell of caste system is dissolved. The castes are getting loose and loose and are prepared to tolerate, if not adopt, any breaches of their old rules and observances. The present tendencies are working in the right direction and no helping salvation or active stimulus is needed from the foreigners to behold the future that is looming in its dark and mysterious manner. It often happens that a foreigner or a corrupt man siding with the foreigner ovedozes our society with his pills of curing the caste-system. But when people see that their position is tottering and shaky they in right earnest stick to what they have got and leave off their plans of an onward move. Outsiders thus impair the good work they hold up in principles through their sheer fanaticism and short sighted altruism.

We are sorry that Col. Mackenzie is of one of those last mentioned. He exercises his energing influences too much so as to leave the proper barriers of usefulness and good notions. His vindicative remrks on the abolition of the caste system are rather uncalled for if not invidious. Whatever is being done with the silent and slow processes of new spheres of work and influence in modern times the offg. Commissioner will not be able to hasten and accelerate without creating a wide gulf that will separate the old and the new men from marching in one single direction. In social reforms of ample extent and magnitude one should rightly propose to himself to act like an image on the pillar at the turning of roads whenever he has not to go the way but simply to direct. We allude to his remarks for what they are worth as they occupy a prominent place in an annual report.

---

The Educational report for 1890-91 is an 'excellant one'. The excellence lies in the accurate and concise statements of the report. The report is a bare record without any incidents that arrest attention and open up a door for different views and opinions. The chief merit of the report is that few things can be said against it. The work of review is consequently easy and simple. We shall have to quote the main points and omit the minor ones. At the outset we begin with a long quotation of a para that summarizes the results of the year's operations:—

The year has been, on the whole, educationally prosperous. Its principal features are as follows:— There is a considerable increase in the number of primary schools; attendance in all cases of school has increased; there is a satisfactory increase in fee receipts and popular contributions; the total contributions from the municipalities have increased notwithstanding a falling-off in their total income, the Berar high schools have acquitted themselves satisfactorily at the last matriculation examination of the Bombay University; conduct registers have been introduced into the high schools, and inter-school rules into all classes of schools; physical and moral education is adequately attended to everywhere; bonuses earned by deserving masters on account of successful teaching and the number of such masters have increased; there is great improvement in indigenous schools— the number of schools, the number of scholars, the number of passes at the Deputy Educational Inspector's examinations, and the amounts of grants earned by the masters having all increased; the numbers of Kunbis, low-caste boys, and the Mahommedans attending our schools have considerably risen; the results of the annual examination of the training college are satisfactory, and the number of its students employed as masters is greater than in the preceding year; more Mahomedans have passed examinations under the several standards than during the previous year, though unfortunately the same cannot be said of low caste boys and aboriginal pupils

## वऱ्हाड.

वऱ्हाड प्रांताचा सन १८९०-९१ चा आडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट प्रसिद्ध होऊन त्याची एक प्रत सालाबाद प्रमाणें आह्माकडे आली आहे तिचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों.

रा० रा० यज्ञेश्वर अनंत वैद्य हे रजेवरू न परत येऊन येथील मुनासिपल शाळेचे हेड मास्तरचे आपले कामीं फेब्रुवारी पासून दा- खल झाले.

रा० रा० बळवंत बापूजी तहशिलदार रजेवरून परत आले ह्मणजे त्यास मंगरूळ- पीरास नेमून मेसर्स अनवरअली, एकनाथ मो रेश्वर, गोविंदराव यशवंत, आणि वामन ग- णेश देशपांडे या चार गृहस्थांच्या अनुक्रमें अ कोला, दारव्हा, जळगांव व केळपूर या ठिकाणीं तहशिलदारीवर नेमणुका होतील आणि रा० रा० विठूजी नारायण केळापुराहून परत ये- थील हुजूर नाझरचे जागीं दाखल होतील अ सें ह्मणतात.

येत्या २०वे तारखेपासून रा. रा. पी. गो विंदराज मुदलीयार एक्स्ट्रा असि० कमिशनर यवतमाळ यांस सहा आठवड्यांची हक्काची र जा मिळाली आहे.

चालू महिन्यापासून एक महिन्याची ह- क्काची रजा अकोला जिल्ह्याचे पोलिस सुप- रिन्टेंडंट मि. एन. आर. कंबरलेज यांस दिली असून त्यांच्या रजेंत मि. जे. टी. बी. डी. सुवेल असि० सुपरिंटेंडंट यांस नेमण्यां त आलें आहे.

चालूं वर्षी कर्नल के. जे. एल. म्याकिनझी कमिशनर यांस वऱ्हाड व्हालंटीयर रायफल कोरचे आनररी कर्नल नेमलें आहे.

उमरावती क्यांप मुनसिपालिटीचे मि. आर. ए. सिम्पसन यांस समासद नेमलें.

रा. रा. गोविंद गंगाधर तहशीलदार यां- चो चौथ्या वर्गांतून तिसऱ्या वर्गावर बढती झाली आहे.

गेल्या पांचवे तारखेपासून रा. रा. गोविं- दराव यशवंतराव तहशिलदार दारव्हा यांस ४९ दिवसांची हक्काची रजा मिळाली, आणि त्या रजेंत नायब तहशीलदार रा. रा. विना- यक आप्पाजी यांसच आक्टींग तहशीलदार नेमलें आहे.

क्याप्टन सी. चामिअर असि. कमिशनर वर्ग २ यांचे हाताखालील बुलढाणें जिल्ह्यां- तील कोडतास पांचशे रुपयापर्यंत स्माल्काज कोर्टाचा, असि. कमिशनर पहिले वर्ग कोड- ताचा, आणि पहिले वर्ग माजिस्ट्रेटीचा असे सर्व अधिकार दिले आहेत.

खान बहादूर सय्यद शमसूलअली असि. कमिशनर वर्ग १ यांस बारा महिन्यांची फर्लो मिळाला होती ती संपत आली ह्मणून आण- खी सहा महिन्यानीं ती फर्लो वाढविण्यांत आली.

रा. रा. केशव जयकृष्ण एक्स्ट्रा असि. कमि. यांच्या रजेंत वाशीम जिल्ह्याचे डिस्ट्रीक्ट रजिष्ट्रारचें काम मि. शापूरजी वीरजी एक्स्ट्रा असि. कमिशनर यांजकडे सोंपविलें आहे.

रा. रा. हरबाजी शिवराम देशपांडे, मि. अहंमद अबदुल करीम आणि रा. रा. हरी मोरेश्वर शेवडे या तिघांस अनुक्रमें मेहेकर, चिखली आणि जळगांव येथील तालुकाबोर्डा- चे सभासद नेमले आहेत.

मि. आर. म्याकागेल यांस इलिचपूर जि- ल्ह्याचे डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार नेमलें.

गेल्या बुधवारीं येथील स्टेशनवर एक तरूण १७।१८ वर्षांची बाई रेलवेंतून उतर- ल्यावर पोटदुखीनें उघड्या मैदानांत एकटी पडली आणि कोणा कडून कांहीं विचारपूस न होतां मरण पावली. आकस्मिक मरण आलें म्हणून पंचनामा होऊन मूठमाती दे- ण्यांत आली. वैद्यकारांनीं म्हटल्या प्रमाणें अशा रीतीनें मेलेल्या मनुष्या विषयीं विशेष शोध व दक्षता घ्यावयाला पाहिजे होती खरी!

'करुणेश प्रासादिक वऱ्हाड संगीत' मंड- ळीनें परवां रात्रीं मृच्छकटिकाचा खेळ करून दाखविला. खेळाच्या पहिला अंकाच्या भरां- त एक पोलीस जमादार बरोबर वे सात आठ शिपाया निशीं डेपुटी कमिशनरचा परवाना असतां हा खेळ बंद करण्या विषयीं हेका घेऊन बसला नंतर ती फिर्याद मि. रघुवीर- सिंग चिफ कान्स्टेबला कडे गेली आणि त्यांनीं पोलिसास दोष देऊन खेळास परवानगी दिली. पोलिसाच्या सदर्हू वर्तणाचा जाब घेणारा कोणी अधिकारी नाहींच काय?

वेणी गणेशपूर येथील रामजी पाटलाचें नाक कापल्याचा आरोप शाबित झाल्या वरू- न अपराधी गणू व दोन परदेशी यांस प्रत्ये- कीं दहा दहा वर्षांची शिक्षा सेशन कोडतानें फर्मावली आहे.

## वर्तमानसार.

अलिकडे आकाशांत गुरु व शुक्र हे दो- न तारे अगदीं नजीक नजीक दृष्टीस पडतात दोन्ही तेजःपुंज ग्रह असल्यामुळें त्या दोहीं- ची समीपता फार मनोरम वाटते. नै- ऋत्य दिशेच्या पश्चिमे कडील भागास हे तारे सायंकाळीं दृष्टीगोचर होत असतात. अशी संधि तीस वर्षांनीं एकवेळ येत असते असें म्हणतात.

गेल्या दिसेंबरचे अखेरीस ह्मणजे सरकारी सालचे नऊ महिन्यांत सरकारास २९२९०००० मण मिठावर ६०९६१००० रुपये जकातीचें उत्पन्न झालें.

अहमदाबादेस भयंकर आग लागून ९ लक्ष रुपयांचें नुकसान झालें. एक गिरणी सबंद जळाली.

चालू सालीं पाऊस लवकर न पडल्यास हिंदुस्थानांत अतिशय भयंकर दुष्काळ पडेल असें सर्वांचें ह्मणणें आहे.

सु० प०

हल्लीं अमेरिकेंत असलेल्या एका केसाळ घोड्याची माहिती 'सॉटिफिक अमेरिकन' वरून आह्मी देत आहे. हा घोडा उंच असून त्याचें वजन १४३५ पौंड आहे! ह्याच्या केसांची वाढ विलक्षण असून मानेची अयाळ १४ फूट लांब; डोकी वरील ९ फूट लांब आणि शेपटी बारा फूट लांब इतकी मजल गेली आहे! त्याच्या केसांची आणखी वाढ होणार आहे; ह्मणून ते धुवून स्वच्छ ठेवण्यांत भारी लक्ष ठेविलेलें आहे त्याच्या अयाळीचे तुकडे बांधून ते पोत्यांत घालून ठेवतात. अयाळीच्या व डोकीवरील केसांसच फक्त पांच पोतीं लागतात! प्राणी फार आश्चर्यकारक आहे!

साहेब दामाजी— राणीगंज ( बंगाल ) येथील रेल्वे कंपनीच्या कोळशाचे खाणींतील शंभरांहून जास्त गरीब हिंदु मजुरांस त्या खाणींवरील युरोपियन म्यानेजर साहेबांनीं स्वतःच्या पैशानें प्रयाग स्नानास पाठविलें असें समजतें! अशा उदार साहेबांस दामाजी पंताची उपमा खासी शोभते!!

पर्जन्य प्रयोग— कोलापूर येथें कृत्रीम पाऊस पाडण्या करितां मि० रोझन यांस दरबाराकडून बलावणें झालें आहे. कराची म्युनिसिपालिटीकडून ही ह्या साहेबांस पाचारण झालें आहे असें समजतें.

खरेदी— एक लाख मण आटा ताबडतोबीनें खरेदी करण्याचा हुकूम रावलपिंडी येथील कमिसरीएट खात्यास सरकारांतून झाला आहे. कसली धांदल ही.

सुवर्ण तुला—त्रावण कोरचे महाराज त्रिवेंद्रम येथें आपली सुवर्ण तुला करणार व तें सुवर्ण ब्राह्मणांस वाटणार असें प्रसिद्ध झालें आहे. ह्या वेळीं दुष्काळ पीडितांची कींव मनांत आणून त्यांस ह्यापैकीं बराच अंश माहाराज पोंचवितील तर तेंच तेंच सात्विकदान होईल.

डाका येथील पोष्ट आफिसांतील पत्रें टाकण्याच्या पेटींत ब्रात्य पोरानें विस्तव टाकिल्यामुळें पत्रांचा व पेटीचा होम झाला.

बंदीचा हुकूम— विशेष जरूरच आहे अशा ठिकाणीं मात्र दुष्काळाचीं कामें सुरू ठेऊन बाकीचीं सर्व चाललेलीं कामें एकदम बंद करावी असा मद्रास सरकारचा हुकूम सुटल्याचें समजतें दुष्काळाचें काळें तोंड झालें काय?

बक्सार येथील मुनसफाचा ९।१० वर्षांचा मुलगा गंगाजीस बळी देण्याकरितां पळवून नेणारा एक फकीर प्रयागच्या पोलिसानें पकडला आहे.

स० शो०

नवी व जुनी मिळून सगळ्या हिंदुस्थानांत गेल्या वर्षी एकंदर ९,७०६ बुकें प्रसिद्ध झाली. त्यांत ४,४२९ नवी व बाकी जुनी. एकंदरींत नाटकें व गोष्टी यांचाच भरणा जास्त आहे. खरोखरी शास्त्रीय व उपयुक्त विषयांची जास्त झाली पाहिजेत. या बुकाचें प्रमाण दररोज सरासरी ४ या मानानें बसतें. २८ कोटींत रोज ४ अगदींच थोडीं ह्मणावयाची.

निझाम व जेकब यांच्या दरम्यानचा बड्या हिऱ्याचा वाद आपसांत मिटविण्याचा उद्योग चालू आहे. जेकब यास आणखी १७ लाख रुपये देण्यास व शिवाय त्यास फौजदारी कामांत झालेला खर्च देण्यास निझाम तयार आहे असें सांगतात. ही आपसांतली समजूत न होईल तर तो दिवाणी कज्या लवकरच चालू होईल असें बाहेर आलेल्या तारेवरून होतें. हे १७ लाख व खर्च देऊन तो हाड दगड तरी घ्यावयाचा कीं नाहीं.

गायकवाड महाराजांनीं रक्तपित्यांच्या इस्पितळाकरतां १०,००० रुपये वर्गणी दिली. हें दान अगदीं सत्पात्रीं आहे.

धाकट्या देवासचे राजे दादासाहेब मागच्या आठवड्यांत मरण पावले. हे १८८१ त गादीवर बसले व यांणी आपल्या कारकीर्दींत राज्यव्यवस्थेंत पुष्कळ सुधारणा केली. वय ३२ वर्षांचे असून निपुत्रीक मेल्यामुळें दत्तकाची व्यवस्था व्हावयाची आहे.

हंजावर गेलेली फौज परत गिलजींत येथें आली. खिंड रक्षणापुरती ठेवली आहे. सफदर अलीचा पाठलाग करतांना त्या प्रांतांतील खेड्यापाड्यांतल्या लोकांनीं इंग्रजी लष्करी लोकांची चांगली बडदास्त ठेवली असें त्या कामावरचा आफिसर सांगतो. ते लोक आमच्या सत्तेंत राहण्यास खुषी आहेत असें दाखविण्याचा हा हेतू असावा.

फरारी झालेले हुंजा लोक शमशाल खिंडीतून हिंदुकुश वलांडून यार्कंडकडे गेले असावे. सफदर अलीखान यास तिकडे निर्वाह होण्यासारखी एक जहागीर आहे असें सांगतात. सफदर अलीचा सरनागार वजीर दाउदखान याणें इंग्रजी फौजेस हरकत करण्याचा पुढारीपणा घेतला होता तोही सफदर बरोबरच पळून गेला, पण त्यानें पळून जाण्यापूर्वी मी येत्या उन्हाळ्यांत राशियन फौज बरोबर घेऊन तुह्मांस सोडविण्याकरतां येईन असें लोकास सांगून गेला आहे असें सांगतात.

राशियाच्या मध्य एशियांतील खटपटीच्या संबंधानें पामीर प्रकरणामुळें इंग्लंडास सावध राहाणें भाग झालें आहे असें बर्लीनचा एक पत्रकर्ता ह्मणतो.

राशियाचे एक लढाऊ गलबत अलेकझांड्रिया येथें जात आहे. कारण? लढाइच्या वेळीं इकडून तिकडे निरोप पोचाविण्याचे आणि मेलेल्या व घायाळ झालेल्या लोकांचा शोध लावण्याचें काम कुत्र्यास शिकाविण्याचा उद्योग आस्त्रियांत सुरू आहे.

इंग्लंडचा जलमार्गाचा वार्षिक व्यापार १,०८,९९,९०४ टणांचा असून जर्मनीचा १४,०९,८३८ टणांचा आहे आणि अमेरिकेचा १०,२१,९९९ टणांचा आहे. हा इंग्लंडचा भारी व्यापार हिंदुस्थाना मुळेंच आहे हें हिंदुस्थान व त्यांतील लोक यांचा तिरस्कार करणाऱ्या इंग्रजांनीं ध्यानांत ठेवावें.

जपानांतल्या एका तत्ववेत्यानें अळंबे किंवा कुत्र्याचें मूत याची लागवड करून त्याच्या बियाचो दारू तयार करण्याची रीत सुरू केली आहे व अमेरिकेंतही हल्लीं त्याचा प्रसार झाला आहे.

मनुष्यः— मनुष्य सुमारें ८०-१०० वर्षे वांचतो. स्त्री २१० दिवस गर्भिणी राहून प्रसूत होते. तिला प्रत्येक खेपेला बहुत करून मूल होतें. परंतु कधिंकधी २ किंवा ३ सुद्धां झालेलीं ऐकण्यांत आहेत.

वानरः- डार्विनच्या मताप्रमाणें हे प्राणी मनुष्याचे पूर्वज होते. वानर २०।२२ वर्षेपर्यंत जगतो. वानरीण २४० दिवस गर्भिणी राहून प्रत्येक खेपेस प्रायः ३।४ पिलें घालिते.

डुकरः— ह्या प्राण्याचें आयुष्य सुमारें १९।२० वर्षेपर्यंत असतें. डुकरीण ११० दिवस गर्भ धारण करून प्रत्येक खेपेस पुष्कळ पिलें घालते.

कोल्हाः— ह्या प्राण्याचे आयुष्य १९।२० वर्षे मादी ६३ दिवस गर्भिणी राहून बरींच पिलें घालते.

गाय, बैलः— हा प्राणी ३०—३३ वर्षे वाचतो. गाईला गर्भाची वाढ पूर्ण होण्यास स्त्रीपेक्षां ७ दिवस ज्यास्ती लागतात.

घोडा, गाढवः— आयुष्य ३०।४० वर्षे मादीच्या गर्भवाढ पूर्ण होण्यास ३३० दिवस लागतात.

उंदीरः— या प्राण्याचे आयुष्य नीट माहीत नाहीं. मादीला गर्भवाढ पूर्ण होण्यास ३८ दिवस लागतात. मादी प्रत्येक वेळेस ८-१० पिलें प्रसवते.

हत्तीः— आयुष्य मनुष्या इतकेंच. गर्भ पूर्ण होण्यास ९९३ दिवस लागतात.

मृगः— या प्राण्याचे आयुष्य ३० वर्षांपर्यंत असतें. गर्भ पूर्ण होण्यास २८० दिवस लागतात. ठा० अ०

सन १८९२—९३ साला साठीं १ शि० ३॥। पेन्स ह्मणजे एक रुपया असा सरकारी भाव स्टेट सेक्रेटरी याणीं ठरविला आहे.

खालच्या आणि वरच्या ब्रह्म देशाची लोक संख्या ८०९८०१४ इतकी आहे असें नव्या केलेल्या गणती वरून समजतें.

प्रचंड धान्य प्रवाह— ता० ३१ मार्च १८९२ रोजीं संपणाऱ्या सगळ्या वर्षांत हिंदुस्थानांतून युरोपादि देशांत १९००००० टन गहू जातील असा सुमार आहे. परदेशच्या बाजारांनीं हिंदुस्थानच्या गव्हांस अशी ओढ लाविल्यानें हिंदुस्थानचे लोक उपाशीं मरतात व दुष्काळा पेक्षां गहू जास्त महाग होतात याचें नवल तें काय? सुधारलेल्या काळाचा हा अगाध महिमा आहे.

शू० सू०

भयंकर कृत्य— सहा खून— बडोदा रेल्वेच्या इटोला स्टेशन पासून १॥ मैलावर असलेल्या टर्पाला नांवाच्या गांवातील एका धर्म शाळेंत एका बोवानें आपल्या कुटुंबांतील सहा माणसाचे खून ता० १९ जानेवारी रोजीं रात्रीं केले. बोवाची बायको, दोन मोठ्या मुली, दोन मोठे मुलगे, व एक दीड वर्षांचा लहान मुलगा अशीं माणसें गाढ निद्रावश असतां त्यांचे गळे त्या निर्दयानें कापून टाकिले. व आपण मौलाच्या रानांत जवळच लपून बसला. त्यास पडकलें असून बडोद्यास रवाना केलें आहे. कोण हें घोर कृत्य?

बोलकें घड्याळ—प्रसिद्ध विद्युद्विद्या विशारद मि० एडिसन यानें आपल्या विद्युच्छास्त्रानें ज्या अनेक मौजा करून व अपूर्व शोध लावून जगाला थक्क केलें आहे यांतच त्यानें अलीकडे एक बोलकें घड्याळ तयार केलें आहे. त्याचे योगानें ही मनुष्य थक्क झाल्यावांचून राहणार नाहीं. हें घड्याळ मि० एडिसन यानें सेंट पीटर्सबर्ग येथें झारच्या हुकमानें जो एक विद्युद्यंत्र संग्रह केला आहे त्यांत ठेविण्याकरितां मुद्दाम तयार केलें आहे. या घड्याळांत पाव, अर्धा, पाऊण व एक असे जे तासाचे निरनिराळे ठोके पडतात ते ठोके न वाजतां त्या ऐवजीं त्या घड्याळांत एक फोनोग्राफ यंत्र ठेविलें आहे. ते त्यावेळीं "पावतास झाला," "अर्धातास झाला" "पाऊणतास झाला" आणि शेवटीं जितके वाजले असतील तितके तास झाले असें मोठ्यानें बोलून दाखवितें. तसेंच या घड्याळांत अलार्मच्या जागीं त्या फोनोग्राफ यंत्राचीच योजना केली आहे. ज्यावेळीं आपल्याला अलामकडून काम करून घ्यावयाचें आहे त्यासाठीं पूर्वी किल्ली देऊन ठेविली असली ह्मणजे सदरील फोनोग्राफ यंत्र मोठ्यानें बोलतें, "उठा, उठा, जागे व्हा, उठावयाची वेळ झाली!" आणि यणेंकरून अलार्मापेक्षां अधिक चांगलें काम होतें! एडिसनच्या कल्पनेची तरी किती धन्यता गावी?

एक युरोपियन थोर अधिकारी मत्त झालाः— राजमहेंद्री येथें गोदावरी जिल्ह्यांचा एक बडा युरोपियन अधिकारी मत्त होऊन तेथील एका देवळांत शिरला, आणि त्या देवळांतल्या मूर्तीला त्यानें लाथा मारिल्या हंड्या, गोळे वगैरे फोडून समया उपड्या पाडिल्या, तसविरा फोडून तोडून टाकिल्या, तेथें असलेले लोकांस मारिलें, आणि म्यु० पा० च्या हुकूमानें एक छपरी बांधली जात होती ती पाडून टाकली. असा त्यानें बराच धडाका केला. ही गोरी लोकां बिचाऱ्या रयतेच्या जीववित्तावरोबर चालावयाची! अशा मत्त लोकांस चांगलें कडक शासन झालें पाहिजे. हें कितपत होईल कोण जाणे! न्या० सि०

## अकोलें बाजारभाव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | | | ९९॥।- |
| „ १९ दिवसाच्या मुदतीची | | | | | ९९॥= |
| सुवर्ण | २३॥ | रुपे | १०८ | आळशी | ९४ |
| गहू | काठे ७२॥ | | | बनशी | ८९ |
| जवारी | ४४ | चणे | ७० | सर्की | ९॥ |
| कापूस | ३६ | | | रुई | ४८ |
| मीठ | ३॥। | तूप | ८ | तेल | ९॥ |

सव्याचे भाव. ( मोगलाई )

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी | बसंत | १९४८ | |
| गहू | वैशाख शुद्ध | १९४८ | ६७ |
| आळशी | चैत्र शुद्ध | १९४८ | ८५॥ |
| रुई | फाल्गुन | १९४८ | ५१॥।= |
| सर्की | वैशाख नवे साळची | १९४८ | ९ |

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांणीं छपून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही " ३ " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास ........................ ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

SUBSCRIPTION
Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly...........3 " 8 as
Single copy........................................1as

Advertisements
Below 10 lines...2 as
per line over10...4Rs
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VO XXVI AKOLA MONDAY 15 FEBRUARY 1892 NO 7

वर्ष २६ अकोला सोमवार तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १८९२ इ० अंक ७

### नोटीस.

मारुती वलद मानाजी माळी व पुंनाजी वलद नागोजी माळी राहणार ताजनापेठ यांस नोटीस देणार कृष्णा वलद लक्षुमण माळी राहणार ताजनापेठ नोटिसीनें असें कळवितो कीं मी तुह्मां उभयतांस जामीन देऊन माझे कामाकरितां कर्ज रुपये ७० सत्तर काढिले व त्याजबद्दल कर्जरोखा सावकारापाशीं तुमच्या जामीनगती लिहून देऊन दिला व तुम्ही जामीन झाला ह्मणून मजपासून माझें घर ताबेगाहाण करून घेऊन कागद रुपये ७६ शाहात्तराचा तुह्मी जामीन झाला ह्मणून करून घेतलें आहे. आतां रुपये ७६ च्या ताबेगाहाण जामीनकीबद्दलच्या कागदांत दोन महिन्याची मुदत आहे व ती आजपासून सहा दिवसांनीं संपते व मी आज दाहाबारा दिवसांपूर्वीं रुपये घेऊन तुह्मांस देऊन तुह्मी सावकाराचे रुपये देऊन माझा सावकाराच्या येथला कागद व तुह्मी जामीन झाला ह्मणून मजपासून ताबेगाहाण घरचा रुपये ७६ चा कागद परत द्यावा ह्मणून रुपये घेऊन आलो. परंतु तुम्हीं रुपये घेतले नाहींत याजकरितां तुह्मांस नोटिसीनें असें कळवितो कीं रुपये ७० व त्याचे व्याजसुद्धां मी अनामत नारु वलद रामा माळी यांजपाशीं ठेविले आहेत. तर नोटीस पावतांच रुपये घेऊन माझा सावकाराच्या एथला कागद व तुह्मी जामीन झाला ह्मणून ताबेगाहाण घराचे रुपये ७६ चा कागद आणून देऊन निकाल करावा असें झाले नाहींतर मी कोणणाच्या प्रकारचा जबाबदार नाहीं. व उगीच मजला तुमच्या अशा करण्यानें कांहीं दखल व नुकसान होईल तर सर्व भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस. तुह्मी रुपये घेतले नाहींत याजबद्दल मला ही नोटीस देणें भाग झाले व विनाकारण खर्चांत तुह्मी घातले करितां ह्या नोटिसीचा खर्च ही तुह्मांस द्यावा लागेल तुम्हापाशीं जो रुपये ७६ चा गहाण दस्तायवज आहे तो पोकळ आहे कळावें. ता. ९ माहे फेब्रुवारी सन १८९२ इ०

( सही )

सहाची निशाणी कृष्णा वलद लक्ष्मण माळी याचे हातची अस.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ३ शके १८१३

### स्त्रीशिक्षण.

( शाळाखात्याचे रिपोर्ट वरून )

वऱ्हाडांत प्रांतांत सन १८९०-९१ सालीं मुलींच्या शाळा ४९ असून त्यांत शिकणाऱ्या मुली व मुलांच्या शाळेंतून शिकणाऱ्या मुली मिळून २०२२ आहेत त्या पैकीं शाळेच्या हजिरीपटा वरून सरासरी काढतां रोज १२६१ मुली हजर असतात. प्रांतांतील मुनसिपल व सरकारी शाळा मिळून फीचे उत्पन्न २५८॥. रुपये असून सर्व शाळा करितां मिळून रु० ९८६२ ८आ.-३पै खर्च झाला आहे. प्रत्येक मुली मागें वर्षाचा खर्च रु० ७ ५आ. ७पै झाला आहे. वऱ्हाडांतील स्त्री शिक्षणा संबंधानें डायरेक्टर साहेबांनीं शेरा दिला आहे तो नेहमी प्रमाणे ठराविक आहे तरी त्याची आठवण वारंवार लोकांस देणें भाग आहे. जों पर्यंत लोकांच्या सामाजिक चाली रिती जशाच्या तशाच अविछिन्नपणें प्ररूढ आहेत आणि जों पर्यंत स्त्रियांची उन्नति करण्याचा अल्प प्रयत्न ही हिंदु आणि मुसलमान जातींच्या बहुत लोकांस अपमानकारक वाटतो तो पर्यंत स्त्रीशिक्षणाची अभिवृद्धि संथपणानें होत जाईल. परंतु संतोषाची गोष्ट अशी कीं वस्तुस्थिती मध्येंच इनस्पेक्टर मंडळी, शाळा मास्तरणी आणि मास्तर हे आपली पराकाष्ठा करून सोडतात आणि शाळा कमिट्या पैकीं अकोटचे रा. रा. गनुसिंग आणि गुलाम हुसेन सारखे कियेक प्रबुद्ध लोक त्यांना आनंदानें मदत ही करितात.

गुदस्त सालच्या आरंभी आह्मी कारंजाच्या हिंदुस्थानी कन्याशाळे विषयीं प्रशंसा केली होती त्या प्रमाणेंच डायरेक्टर साहेबांचें, मत ती शाळा उत्कृष्ट रितीनें चालली आहे असें पडतें. उमरावतीच्या मुनसिपल नंबर १ चे शाळे वरील शिकलेल्या मास्तरीणबाई पूर्वी प्रमाणें चांगलें शिकवितात परंतु मुलींची हजिरी पाहिजे तशी नसते.

अकोला जिल्ह्यांतील १८ कन्याशाळा पैकीं चार शाळेवर मुख्य स्त्रिया असून पांचव्या एके शाळेमध्यें पुरुषाच्या हाताखाली एक मास्तरीण आहे. या पांचजणी पैकीं तिघींचे नवरे त्या त्या गावीं पंतोजींचें काम करीत आहेत. डेपुटी इनस्पेक्टर लिहितात कीं:- अकोल्याच्या मुनसिपल मराठी शाळेवर पुण्याच्या शिकलेल्या एक बाई मुख्य आहेत. त्यांच्या शाळेंत मुलींच्या हजिरीचें प्रमाण सर्वांत भारी असून शाळेची स्थिति ही अत्युत्तम आहे कांकीं हजिरी पटावर ७४ मुली आहेत आणि परीक्षेस दिलेल्या मुली पैकीं शेंकडा ८२.७ प्रमाणें मुली पसार झाल्या आहेत. अकोट आणि खामगांव येथील शाळेंतून साठ साठ मुली आहेत तरी खामगांवच्या शाळेचें काम अधीक चांगलें आहे त्यास कारण कीं या शाळेंत पसार झालेल्या मुलींचें शेंकडा प्रमाण अकोट पेक्षां अधीक आहे. मुंडगांवच्या मराठी शाळेंतील कांहीं जणी पांचव्या आणि सहाव्या इयत्तेंत पसार झाल्या आहेत त्या वरून शाळेच्या कामाची मातबरी कळून येईल. केळीवेळीस मुलांच्या शाळेच्या हेडमास्तरची बायको मुलीच्या शाळेवर आहे आणि बहुतेक गत वर्षीं प्रमाणेंच ती शाळा आहे. या बाई स्वयंपाक व शिवण काम हीं निराळी चांगली शिकवितात आणि ज्या वयांत आलेल्या थोर मुली व स्त्रिया शाळेस येऊं शकत नाहींत त्यांना शिकविण्या बद्दल या प्रयत्न करीत असतात व त्या बद्दल यांची तारीफ केली पाहिजे. दानापूरची शाळा नीटशी चालत नाहीं. मुलींनीं नेमस्तपणानें वेळच्या वेळीं शाळेला येत असावें ह्मणून कमिटीनें खटपटी केल्या पण सर्व वाया गेल्या.

इलिचपूर जिल्ह्यांतील परतवाड्याची मराठी शाळा बरी चालली आहे परंतु अंजनगांवच्या शाळेवर शिकलेली मास्तरीण आहे तरी कांहीं सुधारणा नाहीं. त्या बाई हुषार असून मेहनती आहेत आणि जर ती शाळा नीट चालणार नाहीं तर ती बंद करावी लागेल. यवतमाळची शाळा फार चांगली आहे असा रिपोर्ट सांगतो परंतु वणी व दारव्हा येथील शाळा समाधान कारक अशा स्थितींत नाहींत.

वाशिम जिल्ह्यांत मंगरूळपीर येथील शाळा चांगली चालली आहे असें कळतें.

अकोला व उमरावती येथील मुनसिपालिटीचा विचार त्यांच्या ताब्यांतील मुलींच्या शाळांतून स्कालरशिपा ठेवण्याचा आहे आणि त्या विचारा प्रमाणें त्यांनीं दिलेल्या, रकमांत भर घालण्या विषयीं सूचना मंजूरीती साठीं दाखल केली आहे.

मुलींच्या शाळे विषयीं रिपोर्टांत माहिती दिली आहे त्या मध्यें आमच्या मतें दोन गोष्टी विषयीं मोठी उणीव आहे. मुली शाळेस जातात त्या मध्यें लग्न झालेल्या किती असतात आणि लग्न न झालेल्या किती असतात आणि त्या बरोबरच दहा, चौदा आणि चौदाहून अधीक वयाच्या किती किती मुली शाळेस जातात ही माहिती असणें आवश्यक होतें. वऱ्हाडांत स्त्रिशिक्षणाचा चाल फार करून लोकांस आवडत नाहीं. त्या संबंधानें हा प्रांत मागसलेला आहे तरी वरील दोन प्रकारची माहिती दिल्यानें शाळेस जाणाऱ्या मुली बहुत करून अविवाहित आणि अल्पवयी असतात अशी लोकांची पूर्णपणें खातरी करून देतां येईल आणि त्या साठीं वारंवार त्यांना जागें ही करण्यास नीट सांपडेल. आह्मी हें प्रत्येक गृहस्थाचें कर्तव्य समजतों कीं मुलगी असो किंवा सून असो ही गृहसंसारांत शिरे पर्यंत तरी नित्य तिला शाळेस पाठवून लिहितां वाचतां शिकवावें. हें फार अगत्याचें आहे. पण हें ब्रह्मज्ञान सांगावें कोणी आणि ऐकावें कोणी!

---

राष्ट्रीय सभेची बैठक येत्या दिसेंबरांत कोठें भरवावी हा मोठा प्रश्न पडला होता परंतु आह्मी मागें ध्वनित केल्याप्रमाणें केला० पंडित अयोध्यानाथ यांचे मित्रमंडळींनीं पंडितजींच्या मनोरथाला व संकल्पाला अनुसरून आल्हाबादेसच राष्ट्रीय सभा भरविण्याचा निश्चय केला आहे हें ऐकून सर्वांस परम संतोष झाला असेलच. पंडित विश्वंभरनाथ, बाबू चारुचंद्र मित्र चारुचंद्र मित्र, पंडित मदनमोहन इत्यादि मुख्य मुख्य गृहस्थांनीं अल्हाबादच्या बैठकीचा बोजा आपल्या शिरीं घेतला आहे तेव्हां हा सुयोग योग्यवेळीं जमून आला आणि सर्व प्रकारची यथासांगता भारदस्त, कार्यदक्ष, व राष्ट्रहिताचे कैवारी अशीं लोकाकरवीं होत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

दुधांत जशी साखर तशी दुसरी आल्हाद कारक बातमी अशी कळते कीं मि. डब्ल्यू. सी. बानरजी यांनीं राष्ट्रीय सभेच्या दुय्यम सेक्रेटरीचें काम अखेरीस कबूल केलें. हे गृहस्थ काम पतकरतील किंवा नाहीं याबद्दल मोठा संशय होता पण त्यांनीं ते एकदा पतकरल्यावर मग तें राष्ट्रकार्य फत्ते झालें असेंच मानावें. मि. बानरजी यांचा या निवडणुकीनें लोकांनीं बहुमान केला असें ह्मणण्यापेक्षां मि. बानरजी यांनीं या अंगीकारानें सर्व लोकांचा बहुमान केला असें ह्मणणें अधीक यथार्थ होईल. मि. ए. ओ. ह्यूम साहेबांची भीड बानरजी यांना मोडवेना. खुद्द ह्यूम साहेबांनीं लोकांच्या विनंतीला नकार देऊन पुन्हा जनरल सेक्रेटरीचें काम चालविलें तेव्हां त्यांच्या लोकप्रिय व उदार वर्तनाची आठवण होऊन त्यांनीं कृतज्ञतेपूर्वक होकार दिला हे स्मरणांत ठेविलें पाहिजे. मि. बानरजी राष्ट्रीय सभेच्या पहिले बैठकीचे अध्यक्ष होते. त्यांची विचारसरणी फार पोक्त व दूरदर्शीपणाची असून उत्साहशक्ति, कार्यदक्षता, व्यवहारनैपुण्य इत्यादि गुणांनीं ते इतरास आपल्या विचाराचे करून टाकतात. पंडित अयोध्यानाथ वारले हें न भरून येणारें नुकसान आहे तरी राष्ट्रीय सभेला असा वक्तृत्वशाली, सन्मार्गदर्शी, आणि कार्यकर्ता पुरुष मिळाला हें दुःखांत सुख होय.

---

दुष्काळानें प्रजाजनांस व जनावरांस त्राही त्राही करून सोडलें आहे. हिंदुस्थान सरकारनें लोकांचे व जनावरांचे प्राण वाचविण्या साठीं अनेक युक्त्या लढविल्या आहेत. दुष्काळा निमित्त मोल मजूरीचीं कामें उभारली आहेत आणि कित्येक बंदी जंगलांतून गुरांस चरण्याची मोकळीक दिली आ

हे. तरी दुष्काळाचा फैलाव मोठ्या विस्तृत भागावर असल्या कारणानें सरकारची मदत फार थोडी आहे आणि सरकारांतून अशा दुर्धर व भयंकर आणीबाणीच्या प्रसंगाला जितके उपाय योजले पाहिजेत तितके अद्याप अंमलांत आले नाहींत आणि सरकारची व्यवस्था अगदी निकराची व घाईची पाहिजे तशी ही ती अंमलांत येत नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट होय. हिंदुस्थान सरकारच्या आमच्या होळकर सरकारनें उत्तम उदाहरण घालून दिलें आहे. साडे नऊ हजार रुपये आपल्या खजिन्यांतून होळकरांनीं दुष्काळ-निवारणार्थ खर्चीं घालून ते मुंबई व मद्रास सरकारच्या हातीं दिले आहेत.

---

बंगळोर कडील कोष्टी लोकांच्या सोयी-साठीं म्हैसूर दरबारनें उत्तम युक्ति काढली आहे कोष्टी, लोहार, घिसाडी वगैरे उद्यमवाले लोक दुष्काळानें इतर लोकांबरोबर रसातळास जाऊन पोंचले आहेत. त्यांच्या जिन्नसांला अशा अन्नान्नदशेंत कोणी विचारीत नाहीं. ह्मणून त्यांना आपले रोजगार बंद करावे लागतात. म्हैसूर संस्थान नेटावशाई खालीं नसतें तर इतर जातीच्या लोकांप्रमाणें कोष्टी लोक ही आपले पिढीजादे उद्योग बुडवून दुष्काळ निमित्त काढलेल्या मोलमजूरीच्या काबाडकष्टाच्या व अल्प वेतनाच्या कामांत शिरले असते. भुकेनें व्याकूळ होऊन वाटेल ती नोकरी मनुष्य पतकरतो किंवा पोटा साठीं वाटेल तो गुन्हा करितो असा अनुभव आहे. म्हैसूर संस्थानास बंगळोरच्या डेपुटी कमिशनरानें सूचना केली कीं दरबारनें कोष्टी लोकांकडून कपडा मागावर काढवावा आणि तो खरेदी करावा. असा खरेदी केलेला कपडा सांठवून ठेवावा आणि मागणी आली म्हणजे विकण्यास काढावा. असें करण्यासाठीं दरबारला आपल्या ताब्यांतील अधिकाऱ्यांस शेकडा दोन प्रमाणें कमिशन द्यावें लागेल. दररोज पांचशे रुपयांचा कपडा घेण्याचें ठरविलें तर सहा महिन्या अंतीं १०००० रुपये भांडवल म्हणून सरकारला काढावें लागेल. ही रक्कम कांहीं भारी नाहीं आणि तसें करण्यानें ४००० माग चालून दहा हजार कोष्ट्यांचे प्राणसंरक्षण होऊन त्यांचा हा धंदा चालेल. या सूचनेंत सरकारचा फायदा, प्रजेचें संरक्षण, आणि देशी कलांस उत्तेजन इतक्या गोष्टी साधून कामही मोठ्या श्रमाचें नाहीं असें पाहून म्हैसूर दरबारनें ही सूचना पसार केली आणि त्या प्रमाणें हुकूम ही दिला.

ब्रिटिश सरकारची पद्धत गिरविली असती तर बंगळोरची कोष्टी मंडळी घरदारांचा त्याग करून पोटापायीं मजूरदार बनून त्यांनीं या दाणादाणीच्या स्थितींत इतर मजूरांची संख्या वाढविली असती. बंगळोरचें कोष्टी काम बंद पडलें असतें तर म्यानचेस्टर आपला कपडा विकण्यास राजीखुषी होतेंच. अर्थशास्त्राचे सिद्धान्त हिंदुस्थानास जशाचे तसेच लागू होण्या सारखे नसतात कां कीं या देशाची स्थिती सामाजिक जाती व पंथ याच्या संबंधानें फार भिन्न व विचित्र आहे आणि तिचा सिद्धान्तवादी लोकांस नेहमी विसर पडतो. साळी कोष्टी यांचा पिढीजादा धंदा कपडा मागावर काढण्याचा आणि त्या व्यतिरिक्त इतर धंदे ते लोक कमी पणाचे, दर्ज्यानें हलके व स्वजातीस बाधक असे मानतात. तेव्हां देशी माग बंद झाले व त्याचा माल घेण्यास कोणी राहिला नाहीं म्हणजे ते लागलींच देशोधडीस लागतात जर एखाद्या कोष्ट्याजवळ पैसा असेल तर तो व्याजबट्टा किंवा शेतीवाडी करून उदरनिर्वाह चालवितो. परंतु आमच्या देशांतील कसबी हुन्नरवाले लोकांचें बहुतेक हातावरचें पोट असतें आणि पराकाष्ठा झाली तरी देखील त्यांच्या पाशीं कांहीं बचेत नसते. तेव्हां म्हैसूर सरकारची वरील युक्ति नामी असून कोष्ट्यांचा वर्ग कायम राखील. परंतु ही व्यवस्था थोड्या अवकाशा पुरती आहे म्हणून तिजबद्दल विशेष अभिनंदन करवत नाहीं. कोष्ट्या सारख्या उद्योगी लोकांस कायमची मदत देणें अशक्य आहे काय? एखादी मंडळी निघून तिच्या हातून सरकारच्या मदतीनें वेळेवर या लोकांस मदत करावी, त्यांचा माल विकवावा आणि सर्व प्रकारच्या उद्योगांत कलाकौशल्याचा व यांत्रिक विद्येचा मिलाफ होऊन धंद्याचा उन्नति व बढती झाली आहे त्या त्या धंद्यांत त्यांस शिकवून त्यांच्या हातून निरनिराळे उद्योगांचे कारखाने चालवावे ही गोष्ट अशक्य आहे काय? पण या देशाचा खरा वाली कोण आहे?

---

महाराणी सरकारवर जो पुत्रशोकानें प्रसंग गुदरला त्या निमित्त हिंदुस्थानच्या राजनिष्ट प्रजेनें कळवळ्यानें दुःखवर्त्राच्या तारा व पत्रें शांतवना साठीं धाडलीं त्या बद्दल प्रतापशाली व्हिक्टोरिआ यांनीं प्रजा समूहाचे मोठ्या आगत्यानें आभार मानले आहेत आणि आपलें कर्तव्य बजावण्या साठीं शक्ति व सामर्थ्य ईश्वरानें द्यावें ह्मणून प्रार्थना केली आहे. आभार दर्शक पत्राचा ऊर्दू भाषांतर सहित इंग्रजी मसुदा रेसिडेन्सी आरडरच्या जादा पत्रकानें जाहीर झाला आहे त्या वरून लोकांनीं चक्रवर्तिणी बादशाहिणीचें शांतवन करण्याचा प्रयत्न केला तो यथार्थ व सफळ झाला असें दिसून येईल.

---

पंजाबचे लेफ्टेनंट गव्हरनरचे जाग्यावर सर डेनिस फिटझ प्याट्रीक यांची नेमणूक झाल्याविषयीं गेल्या इंडिया ग्याझिटांत प्रसिद्ध झालें आहे. सर डेनिझ फिटझप्याट्रीक के. सी. एस. आय. हे मार्चच्या पहिले आठवड्यांत आपल्या नव्या हुद्याच्या कामावर रजेवरून परत येऊन दाखल होतील आणि ते तिकडे रुजूं झाल्यावर निजामच्या दरबारीं कायमचे रेसिडेंट नवीन नेमले जातील असा अदमास आहे. या रेसिडेंटाच्या जागेवर हल्लीं आफिशिएटींग काम पहात असलेले मि. टी. सी. प्लौडन हे बहुतेक कायम होतील असें लोक बोलतात. गेल्या दोन तीन महिन्याच्या कारकिर्दींत मि. प्लौडन साहेब हे हैदराबादच्या दरबारांत चांगले लोकप्रिय झाले आहेत. त्यांचे कारस्थान, निजाम दरबाराशी वकिली, न्याय व सत्य यांचा बाणा इत्यादिक कारणावरून तेच कायम व्हावेत असें सर्वजण इच्छितात. त्यांची बढती होण्यास बहुत गोष्टी अनुकूळ दिसतात आणि त्याप्रमाणें सर्व व्यवस्था झाल्यास कर्नल मेकंझी, मि. आनर्ड आणि मि. निकोलेट यांच्या ही बढत्या कायम होतील असा रंग दिसतो.

---

ब्रिटिश पार्लमेंटच्या नव्या सालच्या बैठकीस नेहमी प्रमाणें सुरुवात झाली. महाराणी सरकार तर्फे जें भाषण झालें त्यांत इंग्लंडच्या राजघराण्यावर तरुण राजपुत्राच्या मरणानें आलेल्या दुःख प्रसंगाचा उल्लेख केला होता. इतर राष्ट्रांशीं सख्य भावानें इंग्लिश राष्ट्राचें वर्तन आहे असें मुख्यत्वें करून सांगण्यांत आलें. हाऊस आफ लार्डस मध्यें लार्ड सालिसबरी यांचे इजिप्त देशा संबंधी अभिप्राय अगदीं निखालसपणाचे असून भावी राज्य पद्धतीचे दर्शक आहेत. इंग्लीश सरकार इजिप्त देश कालत्रयीं सोडणार नाहीं आणि दुसऱ्या राष्ट्राचें त्या देशांत प्राबल्य होऊं देणार नाहीं किंवा बेंदर नगरी ही चालूं देणार नाहीं. इंग्लंडनें इजिप्त साठीं अव्याहत व फार दिवस श्रम केले आहेत तेव्हां ते निरर्थक न होतील अशी काळजी घेतली जाईल. वरील उद्देश मोकळ्या रितीनें व सफाईनें कळविल्यानें इंग्रज सरकारचा कायमचा विचार कळून चुकला आहे तेव्हां राज्यविस्ताराचा अभिलाष व आपमतलबीपणा हे गुण आपल्या राज्यकर्त्यांचे अंगीं कितपत वसत आहेत हें उघड दिसतें. तरी प्रत्येक शहाण्या मनुष्यानें महत्वाकांक्षा व स्वार्थबुद्धी हीं न्याय व पराक्रम यांला अनुरोधून कशीं फलद्रुप करून घ्यावीं हें आपल्या दिगन्त राज्यकर्त्यां पासून शिकण्या सारखें आहे.

---

हाऊस आफ कामन्स सभे मध्यें गेल्या बुधवारीं मि. साम्युएल स्मिथ साहेबांनीं सांगितलें कीं हिंदुस्थानच्या राज्य कारभारांत फार दुर्लक्ष होतें आणि त्या मुळें प्रजेच्या गाऱ्हाण्याचा मोठा बभाटा आहे. इंडियाच्या कायदे कौंसिलांतून लोकनियुक्त सभासद नेमण्याची पद्धत चालूं केली पाहिजे आणि अफूचा व्यापार बंद करण्या साठीं उपाय योजले पाहिजेत. आन० जी करजान नवें अंडर सेक्रेटरी यांनीं त्यावर कळविलें कीं हाऊस आफ लार्डस कडून इस्टर सुटीच्या पूर्वीं ( ह्मणजे एप्रिल १५च्या पूर्वीं ) इंडिया बिल कामन्स सभे मध्यें विचारा साठीं येईल; आणि अफूचा व्यापार कमी करण्या करितां हिंदुस्थान सरकारनें काय काय बेत केला आहे त्याचा ही कागद थोडक्यांत कामन्स सभे पुढें दाखल केला जाईल. या इंडिया बिलानें आणि लार्ड क्रास स्टेट सेक्रेटरी यांच्या भूलथापीनें आह्मी अनेक वेळा फसलों आहों आणि दृढनिश्चयानें फिरून प्रयत्न करून पाहण्याचा आमचा यशप्राप्ती होई पर्यंत पक्का संकल्प आहे तेव्हां इंडिया बिलाच्या या बातमीनें आह्मांस विशेष आल्हाद किंवा खेद वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. हिंदुस्थानच्या प्रजेचे सर्व हक्क हिराऊन घेतले आहेत. लोकांच्या अंगीं राज्यांतील अधिकार चालविण्याची योग्यता आहे, आणि त्यांस सामान्य लोकनियुक्त सभासद निवडण्याचे हक्क कायदे कौंसिला पुरते देखील नसावेत या गोष्टीची विषमता आणि अन्याय हीं राज्यसूत्रें हालविणाऱ्या साहेब लोकांस योग्य दिसत नाहींत ह्मणून ते न्याय देण्याचा फार्स ह्मणून कां होईना इंडिया बिला सारख्या सूचना आणून बाजूस ठेवीत आहेत हें आह्मा लोकांस पुरें ठाऊक आहे. असल्या वरपंगी व भासमान उपायांनीं इंग्रजांचीच उलटी बेअब्रू होऊन त्यांचा भेकडपणा, संशयखोर वर्तन, अनुदार बुद्धि यांगलीं व्यक्त होतात. राष्ट्रीय सभेनें आपला उद्योग सतत असाच चालूं ठेवला ह्मणजे आमची पूर्ण खातरी आहे कीं आमच्या न्याय्य व अल्प मागण्या थोड्या काळांत आपणांस प्राप्त होतील. इंडिया बिलाचा यंदा काय वाट होते पहावें!

---

# The Berar Samachar

MONDAY, FEBRUARY 15, 1892

---

The missionaries in England have led a crusade against the opium traffic in India. Their benevolent aims were directed by philanthropy and fellow-feeling. They could not bear the idea that the Indian people should live a degraded life in the trodden and vicious habits of the consumption of opium. With us any traffic in intoxicants and narcotics is equally condemnable and destructive with the opium one. We playing the actual game in the field know that the wines are largely ruinous and paralytic to public health. It is not less but even more so than the use of opium. In England the House of Commons was moved in a fit of enthusiasm to condemn the India Government for its fascilitating and sharpening the opium traffic. A society was also formed to suppress the consumption of opium. The society corresponded directly with India Government on the matter and the following portion of Lord Cross' letter will point out what is feasible in the direction of reform and what is the true state of fact falling short a great deal of the highly coloured exaggerations of the disastrous effects of opium:—

(1)That the number of licensed opium shops in British India has decreased by 9 per cent during the past ten years, while the population has increased 9 per cent. There were in—

1880, 11,113 licensed opium shops in British India.
1890, 10,00 " " "

These figures, I understand, include every individual authorised shop, whether it is separately licensed, or whether it is included with other shops in one license:

(2) that the quantity of licit opium consumed in British India, though it has fluctuated, has not increased greatly during the last ten years; while it is claimed that in some provinces, especially in Bombay and Madras, the increase is largely due to the substitution of licit for illicit opium. The figures of actual consumption are—

| | Seers | Chests |
|---|---|---|
| 1880 | 444,833 | 6,630 |
| 1881 | 399,753 | 5,966 |
| 1890 | 455,114 | 6,752 |

(3) that licenses for smoking opium, or its preparations on the premises (*i. e.* for opium dens, as they have been called ),are no longer granted in the Punjab or in the Central Provinces; and you have given orders for the gradual withdrawal of all such licenses elsewhere:

(4)that the Government of Bombay have been requested to stop the practice of requiring licensed opium vendors to sell yearly a guaranteed minimum quantity of licit opium; though you consider that the practice has, in the past, operated to check illicit opium dealings.

(5)that it is a mistake to regard opium consumption as a new thing in the Madras Presidency; the truth being that, whereas such consumption was uncontrolled in the past, it is now controlled and checked by being made to pay a heavy duty:

(6)that one effective measure for

cheking the spread of opium consumption has been to enhance the duty upon, or price of opium; and this price has during the last ten years been raised in Assam from Rs. 26 to Rs. 37 per seer, and in Burma from Rs. 24 to Rs. 32 per seer, while in Bombay, during the past fourteen years, it has been raised from Rs. 10 to Rs. 20 per seer.

(7) that it is not practicable to close all opium shops and to stop opium consumption so long as opium is grown in British India and in Native States. Such a measure might create serious discontent, especially in the Punjab, which is the nursery of our Indian troops, where opium is largely consumed, and where the average physique of the people is excellent:

(8) that in Burma the Local Government has proposed arrangements for stopping the sale of opium to Burmans in the lower, as has already been done in the upper, province. You have intimated your readiness to sanction this proposal, provided certain facts are made clear, and you have told the Chief Commissioner that "any possible loss of revenue involved in" measures for checking the opium habit among Burmans "need not be taken into account":

(9) that the total licit consumption of opium in British India would suffice to furnish a moderate daily dole of a quarter tola of opium (one tenth of an ounce) to about 400,000 people, that is, to two persons in every thousand of the population.

When the above despatch of the State-Secretary will be presented before the House of Commons we think that the movement in this matter under the auspices of Sir Johe Pease will come to a stand-still. It is of no avail to fight any further on the ground of exaggerated pictures of the evil effects of the opium-consumption. There is the evil of it but it is not of a nature that will die so instant a death as the extra-philanthropists in England might wish for the regeneration of the degrading morals and consumptive physique of the Indian people. Their wish savours rather of enthusiasm and fanaticism that border on the side of a lack of due consideration of the surrounding circumstances and negligent disregard of the immediate wants of the people.

---

The income-tax is the only tax in India that reaches the vastly rich and wealthy minority in the country. Thist vocal and grumbling minority— that counts in its ranks the Anglo Indian 'birds of passage' who are too many to mention for a long and voluminous catalogue, is acting the croakers's part in regard to this tax The history of the income tax is interesting. The commercial interests of the English people were at stake on account of the import duties on their things for sale in India. The import duties were abolished and the income tax was introduced to recoupe the national finances to fill up the great deficit. But at the last annual meeting of the Bombay Chamber of Commerce Mr. George Cotton has again proposed the re-imposition of the import duties in the following suggestive para:—

"The land-tax it was impossible to increase; the income-tax and the salt duty had hitherto been those from which the Govt. had drawn, ample revenue he believed they were all agreed that the income-tax, as far as this country was concerned, was a most objectional mode of taxation. Its incidence was unfair and to increase the salt-tax would be looked upon as a hardship for the poorer classes. There was, however, one thing which the Government of India could do, and they should ask them to do if necessary, and that was the reimposition of the import duties. So long as it was thought that the import duties were protective, that they protected the mill industry of this country against Lancashire, he thought Lancashire had a right to say, no one part of the Empire should be protected against another. But it had been shown that the import duties were no protection, for the mill of Bombay had since its removal increased to four, five, or six times their former number. If the duties were a protective measure he would be one of the first to oppose their re-imposition, because he did not believe in coddling any industry. For purpose of revenue their re-imposition was perfectly fair, especially in India. It was the only way they could get anything from the various States throughout India, which contributed little or nothing to the defence of the Empire."

The Englishman of Calcutta was how ever in a difficulty to solve this problem. He was forced to supplement, in the interests of the Manchester people, this import duty with an additional tax on the things produced in the mills of the country. This new tax will equalize the prices of Indian wares with those of the English manufacture. We would simply say that it is an advance upon the theory of free trade and the sound doctrines of the generally accpted political economy.

---

The following is the Reuter's telegram stating the question that was first opened before the House of Commons on Wednesday last:—

Mr. Samuel Smith, member for Flintshire, complained of the neglect of Indian affairs. He demanded the extension of the elective principle to the Councils of India and the introduction of a measure for the suppression of the opium traffic.

The Hon. G. Curzon, Under-Secretary for India, said he hoped the Indian Councils Bill would come from the House of Lords before Easter. A despatch showing the resolute intention of the Government of India to restrict the traffic in opium would, he said, be presented to the House shortly.

---

Since the advent of the British rule in India there have been at work strange influences Old things of grandeur and renown have disappeared and with it has sprung up a new class of people who are amassing wealth in vast quantities. There are men who could sustain themselves under the hard strain of new spheres of activity in education, service and commerce of the Empire. The rich are growing richer while the poor masses are growing poorer with the exhaustion of their limited resources. The rich and powerful have extended their luxuries and ways of enjoyment to the extreme possible stretch while the degenerating workpeople living from hand to mouth are gone to such a miserable and wretched state of privation and distress that their very contentment of life centers in a sufficient supply of coarse and rough food. The Statesman of Calcutta has wisely observed on the sinking and ruinous condition of poverty-striken and famine-haunted people of this country:—

"Privation may become so much a habit that what is physiologically or economically necessary for wellbeing may cease to be consciously needed. A man, for instance, may so accustom himself to semistarvation, that his appetite for good may be satisfied with half the quantity necessary to maintain him in full physical health and vigour. And a whole population may become, through necessity, accustomed to a standard of living so low as to entail upon them not merely physical degeneration, but perpetual danger of decimation." This is no doubt the case with the Indian people, and high mortality distinguishing our vital statistics is undoubtedly the effect of weakened health and low vitality. There is little in the circumstances of the Indian poor classes which afford comfort or consolation as against the condition of the corresponding classes in England.

---

NOTICE

It is notified under resolution No I (3) dated 1st February 1892 that the road commonly called the 'Maltby Road' passing from the Town Hall to the Railway Station by the Government Telegraph office; and the Road commonly called the 'Station Road' passing by the Post Office to the Railway Station, are henceforth closed for heavy goods traffic; and any person using either of these Roads for such traffic will be liable for prosecution.

12-2-92 { Vyankatesh R. Mudholkar
Secretary
M. C. Akola.

---

## वऱ्हाड.

गेल्या पांचव्या व साहावे तारखेस अकोला मुनसिपालिटींतील सहा सभासद लोकमतानें निवडावयाचे होते. सहा सभासदांच्या जागा भरावयाच्या असून उमेदवार सारे आठजण गृहस्थ होते त्यामुळें हर्ष, वरचढ, व चळवळ वगैरे कांहीं दिसून आली नाहीं. उमेदवारांपैकीं ज्या गृहस्थांस बहुमतानें सभासद निवडलें आहे त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

शहर— गणबा राघोबा व मिरझा अबासबेग; पेठ— जयकृष्ण बगाजी नाईक, अहंमद जुमानी, व पांडुरंग बापूजी.

सिव्हिल स्टेशन— फिलिप थारीस.

---

आम्हांस कळविण्यास दुःख वाटतें कीं येथील डेपुटी कमिशनर कचेरींतील ८० रुपयांचे कारकून रा. रा. वामन गणेश लळिंगकर यांस गेल्या ७ वे तारखेस देवाज्ञा झाली. गृहस्थ असाध्य दुखण्याच्या यातनेंतून सुटला पण मागें संसाराचा जबर पसारा तरुण व हातकरूं पुतण्यावर पडला.

---

रा. रा. पांडुरंग बापूजी राजंदेकर यांचा ऐवज घेऊन पळून गेलेला लबाड चाकर मुद्देमालासह नागपुरास पकडला गेला. बहुतेक पैसा न उधळल्यामुळें मालकांस परत मिळेल हें ठीक आहे.

---

प्युपिल टीचर्सच्या वर्गांतून कारंजास नवीन गेलेले मास्तर रा. रा. गणपत राजाराम यांस नवज्वरानें देवाज्ञा झाली. ऐन पंचवीशीच्या उमेदींतला तरुण व विवाहित गृहस्थ मेल्यानें केवढी अरिष्टपरंपरा घडते हें पुष्कळांस ठाऊक आहे.

---

'करुणेश्वर प्रासादिक वऱ्हाड संगीत नाटककार मंडळी' नें परवा रात्रीं सौभद्राचा खेळ करून दाखविला. प्रयोग एकंदरीनें चांगला झाला व दोनतीन पात्रांचीं कामें फार सुरेख वठलीं. रा. रा. बाळकृष्णशास्त्री कोराण्हे वाशीमकर हे या मंडळीचे पुरस्कर्ते आहेत. मंडळी नवी च असून निरनिराळ्या पात्रांची जमाजम बरी झाली आहे. वऱ्हाडांतली ही पहिली नाटकमंडळी आहे आणि लोकाश्रय गुणानुरूप मिळत गेला ह्मणजे कांहीं कालानें ही मंडळी चांगल्या नांव लौकिकास पोंचेल असें दिसतें.

---

हवामान—हवेंत चलबिचल फार झाली आहे. क्वचित् स्थळीं थोडा पाऊस व गारा ही पडल्या आहेत. ताप, खोकला व इनफ्ल्युएन्झा इत्यादि दुःखणीं तुरळक आहेत परंतु त्यांचें स्वरूप घातुक दिसतें. उष्णतेचें मान ९७ अंश पर्यंत आहे.

---

मि० आर्नल्ड आफि० ज्युडीशिअल कमिशनर हे सहा महिन्यांच्या रजेवर लवकरच जाणार आहेत असें ह्मणतात.

---

रा० रा० चिंतामणराव आपटे हे रजिस्ट्रेशन—इन्स्पेक्टरचें काम पाहूं लागल्यावरून रा० रा० व्यंकटराव रंगराव देशपांडे हे इलिचपुरास पुन्हा सब रजिस्ट्रार झाले.

---

खान बहादूर शेख इमामुद्दीन माजी कांटानमेंट माजिस्ट्रेट, शिकंदराबाद हें वऱ्हाडांतील आपल्या स्नेही मंडळीस भेटण्यासाठीं अकोल्यास आले होते येथून ते पुढें बऱ्हाणपुरास गेले आहेत.

---

## जाहिरात

तारीख १ फेब्रुवारी सन १८९२ रोजीं मुनिसिपाल कमिटीनें केलेल्या ठरावा अन्वयें सर्व व्यापारी, गाडीवाले व इतर लोक यांस कळविण्यांत येतें कीं टौनहालावरून व मि. पांडुरंग गोविंद वकील यांचे घरापुढून व सरकारी तार आफिसापुढून जी सडक रेल्वे स्टेशनकडे जाते ती सडक, व तसेंच पोस्ट आफिसावरून रेल्वे स्टेशनकडे जाते ती सडक, हे दोन रस्ते मालाच्या गाड्या (ह्मणजे कपाशीचे बोजे अथवा गाठी, व धान्याचीं अथवा किराण्याचीं पोतीं वगैरेच्या गाड्या) जाण्या येण्यासाठीं यापुढें बंद करण्यांत आले आहेत. व यापुढें सदरहू दोन रस्त्यांनीं मालाच्या गाड्या कोणी नेऊं आणूं नयेत. कोणी आणल्या नेल्यास त्याजवर मुकदमा करण्यांत येईल. तारीख १२ माहे फेब्रुवारि सन १८९२ इसवी.

Vyankatesh R. Mudholkar.
सेक्रेटरी
म्युनिसिपल कमिटी, अकोलें.

---

जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटरहाऊसचा, स्टेशन धर्मशाळेचा, बाजार कर वसूल करण्याचा, कंदील लावण्याचा वगैरे मक्त्यांचा सन १८९२।९३ सालाकारितां हरास तारीख १७ माहे मार्च सन १८९२ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे ज्यास घेण्याची इच्छा असेल त्यांणीं सदरहू तारखेस हजर राहण्याचें करावें कळावें तारीख १२ माहे फेब्रुवारी १८९२ इसवी.

Vyankatesh R. Mudholkar.
Secretary.
A. M. C.

---

## वर्तमानसार.

धारवाड व बेळगांव या जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्तलोक गोंव्याच्या हद्दींत जात नसून मजुरी व भिक्षा यांच्यावर निर्वाह करीत आहेत. पुष्कळ गुरें ही तिकडे जाऊन अगदीं स्वस्त विकलीं जात आहेत.

निझाम व जेकब यांच्या दरम्यान हिऱ्याच्या खटल्यांत २३ लाख रुपये व हिरा असल्या प्रमाणें अमानतच राहावें असें कोर्टानें ठरविलें. निझाम व जेकब यांच्या दरम्यानचा हिऱ्याबद्दचा खटला कलकत्याच्या हायकोडतात चालू झाला. निकाल काय होतो पाहावें?

निझाम हैदराबादचे प्रसिद्ध सर अस्मानजाहे अजमेर येथील बड्या उरसास लव्याजम्यासह गेले आहेत ते ता. ९ रोजीं परत मुंबईस येऊन ता. १९ रोजीं परत हैदराबादेस जातील.

निझाम हे जेकब यास आणखीं १७ लाख रूपये देण्यास तयार आहेत अशाबद्दलची बातमी अगदीं खोटी आहे असें हैदराबादेची तार सांगत्ये.

हिंदुस्थानातल्या कौसलांत हिस्सेरशीप्रमाणें नेटिव मेम्बर असणें अवश्य आहे असें माजी गव्हरनर जनरल लार्ड रीपन यांचें ह्मणणे होतें पण तें हल्लींच्या हिंदुस्थान सरकारास कबूल नाहीं असें सांगतात!

अपरब्रम्ही देशांत दुष्काळ असून त्याकरतां कामें सुरू करण्याचें ठरलें व तूर्त १२ लाख रुपये मंजूर केले आहेत

लाहोरच्या जज्जाकडे एक चमत्कारीक फिर्याद झाली आहे. सौदागर मल नावाचा एक हिंदु श्रीमान गृहस्थ असून त्याणे एक मुसलमानीन ठेवली होती. थोड्या दिवसांवर तो मेला तेव्हां त्या राखेल मुसलमानीन बाईनें त्याचें प्रेत पुरून टाकलें व त्याची सर्व मिळकत बळकावून बसली. ही गोष्ट मरणाराच्या दोघां भावांस कळल्यावर त्यांणी जज्जाकडे अर्ज केला कीं, त्याचें पुरलेलें प्रेत काढून हिंदुरीती प्रमाणें दहन करण्याची आपणास परवाणगी द्यावी व त्याच्या मिळकतीचे वारस आह्मास ठरवावें. मरणापूर्वी नुकताच त्याणे मुसलमानी धर्म स्वीकारला होता व लागलीच माझ्याशीं लग्न लावलें होतें ह्मणून मीच त्याची वारस आहे अशी त्या बाईनें तकरार केली. तिची ही तकरार खोटी आहे ह्मणून तो मुसलमान होऊन मेला कीं काय याची परिक्षा करण्याकरितां मुडदा उकरून पाहण्याची परवानगी द्यावी अशी अर्जदारांची तकरार आहे. निकाल होणें आहे.

पड्यांत राहाणाऱ्या कर्नुळ प्रांतांतल्या स्त्रियांचे दुष्काळामुळें फार हाल होत आहेत, शिजावलेलें अन्न त्यांस खाण्यासारखें नसल्यामुळें त्यांची व्यवस्था करी लावावी या बद्दल तेंथील कलेक्टर विचार करीत असून बड्या व मुसलमान लोकांस विचारपूस करीत आहे.

सर लायलच्या मागून सर फिटझपाटिक हे पंजाबचे ले० गव्हरनर झाले व मार्चचे ६ वे तारखेपासून आपल्या नव्या जागीं होतील.

काबूलच्या अमिराचा प्रायवेट सेक्रेटरी सरदार अबदुलाखान यास कंदाहारचा गव्हरनर केला आहे.

उमराखानसीं लढाई करण्याकरतां अफगाण अमिराचा कमांडर इगबीफ हा फौजेची तयारी करीत आहे, व कांहीं फौजा रवानाही झाल्या असें कळतें.

अफगाणसरहद्दीकडिल प्रकरणाबद्दल विलायतचे इंडिया आफीस विचारांत अगदीं गढून गेलें आहे. त्या संबंधाच्या आलेकडील बातम्यांवरून त्या विषयाकडे त्यांचें विशेष लक्ष लागलें आहे. काश्मीरच्या हद्दींत रेलवेचे कित्येक रस्ते सुचविण्यांत आले आहेत व ते करण्यांस तें संस्थान जरी पैशाच्या संबधानें समर्थ नसून खर्चाचें उत्पन्न होण्याचा संभव नाहीं तरी राजकीय दृष्टीनें तिकडच्या आंगानें रेलवे वाढविणें फार अवश्य आहे असें सूचविण्यांत आलें आहे.

काबूलचा अमीर आपल्या राज्यांतील धान्य खरेदी करून काबूलास आणून ठेवीत आहे. कारण बरोबर समजत नाहीं.

काबूलच्या अमिराची प्रकृती चांगली झाली व हिंदुस्थानच्या सरकारच्या बलावण्याप्रमाणें येत्या उन्हाळ्यांत हिंदुस्थानांत येण्याची त्याची खुषी आहे कीं नाहीं हें तो आतां लवकरच सांगेल असें वाटतें.

चीन लुशाई प्रकरणाचा विचार करण्याकरतां जें कान्फरन्स भरलें होतें त्यांत चिन डोंगरांत व्हाईट ह्मका येथें २ लाख रुपये खर्चून बराखी बांधण्याचें ठरलें असें सांगतात.

पोलांडांतल्या एका गांवीं एक डाक्टर मेला व त्यास स्मशानांत पुरला. दूसऱ्या दिवशीं एक माणूस मेला व त्यास पुरण्याकरतां डाक्टराच्या खाचे जवळच दुसरी खाच खणण्याची सुरुवात केली असतां डाक्टराच्या खाचेच्या आंगून माणसाच्या श्वसोश्वासासारखें कांहीं आवाज येऊं लागले. त्यावरून पाद्रीच्या हुकुमानें डाक्टराची खाच उकरली तों त्यास पुरलें तेव्हां तो मेला नव्हता असें आढळलें. प्रेताचा तपास करतां तें कुशीस वळलें होतें व बाहेर निघण्याकरतां त्याणें धडपड केली होती असें आढळलें व परिक्षेंत तो गुदमरून मेला असेंही ठरलें!

बदापेस्ट येथील सेविंग ब्यांकेचा क्याशियर पिसिक हा ८००,००० रुपये गिळंकृत करून फरारी झाला व आत्महत्या करून मेला.

ठा० अ०

मुली विकणारांस शिक्षा.— लाहोर, वजिराबाद आणि दुसऱ्यां नजीकच्या भागांतून सात मनुष्यांनीं १४ मुली चोरून नेल्या होत्या त्या मुली विकण्याच्या इराद्यानें चोरून नेल्या म्हणून त्यांच्यावर खटलें झालें होतें. त्यांची चौकशी लाहोरच्या डेप्युटि कमिशनरा पुढें होऊन पुर्ण शाबिती झाल्यामुळें एकास दोन वर्षांची आणि बाकीच्यांस सहा सहा महिन्यांच्या शिक्षा झाल्या.

अत्यंत क्रूर व भयंकर शासन.—अमिराचा नातेवाईक एक सरदार यास मुलगा झाल्या मुळें त्यानें मोठा उत्सव केला. त्या उत्सवांत जनान्यांत नाच व गाणें करण्या करितां १० खोजे ( तृतीयप्रकृति मनुष्यें ) पाठविले. नाच व गाणे चालले असतां त्यां पैकीं एका खोजानें एका पाहुण्या सरदाराच्या तरुण, सुंदर आणि मोहक पत्नीशी वाईट वर्तन केलें. त्या मुळें एकच गोंगाट उडाला त्या बरोबर बाहेर असलेली पुरूष मंडळी आंत घुसली आणि त्यांणीं खोजांस पकडलें. शोधा अंतीं ते खोजे नसून पुरुषत्व असलेले पुरूष होते असें आढळलें, या सगळ्यांस नेऊन अमीरापुढें उमे केलें. तेव्हां त्यांचीं शरीरें सोलून त्यांस ठार मारण्याची अमिरानें शिक्षा दिली व ती तत्काळ अमलांत आली असें लाहोरच्या सिव्हल आणि मिलीटरी पत्रांत लिहिलें आहे.

शू० सु०

म्हैसूर येथे एक उद्योग शाळा स्थापन व्हावयाची आहे; त्यांत सर्व जातीचे व धर्माचे लोकांचीं मुलें घ्यावयाची, त्या शाळेंत सुतार, गवंडी, लोहार, कुंभार वगैरे धंद्याचें शिक्षण द्यावयाचें आहे. गरीब मुलांना दरमहा तीन रुपये प्रमाणें स्कालरशिप ठेवली आहे.

लार्ड डफरीन हे नायिकेचा भाग करणारे होते! प्यारिस येथें चाळीस वर्षापूर्वी एक खानगी नाटक झालें त्या नाटकांत तरुण नायिका असून तिचें नृत्य फारच सुंदर झालें ही तरुणी ठेंगणी ठुसकी गोंडस अभिनय कुशल होती. हा नायिकेचा भाग लार्ड डफरीन साहेबांनीं घेतला होता, व त्यावेळीं त्यांचें वय ११ वर्षांचें होतें, असें एक फ्रेंच बाई वरडे नामक पत्राच्या 'अटलास्' नामक बातमीदारा जवळ बोलली, व तें बोलणें खरें आहे असें लार्ड डफरीन यांणीं ही कबूल केलें.

उपयुक्त माहिती—स्त्रीराज्य—स्त्रीस्वातंत्र्य ह्याबद्दलची परमावधि जर कोणास पहावयाची असेल तर त्यानें जावा बेटांत जाऊन ती तेथील बंटम नामक एका लहानशा स्थानांत पहावी. ही त्याची इच्छा तेथें परिपूर्ण होईल कारण या संस्थानांत फक्त एक सिंहासनावरील राजा शिवाय करून बाकी सर्व दरबार मंडळींत रूपवान स्त्रिया आहेत. सेनापति व सैन्यातील शिपाई सुद्धां स्त्रियाच आहेत हे संस्थान हालंड देशाच्या ताब्यांत आहे हें अगदींच लहान आहे तथापि श्रीमंत आणि सुखीच आहे. येथील राजाचे शरीर संरक्षक ( बाडी गार्डस् ) सुर विक्रमी स्त्रिया आहेत त्यांचा एखादा राजा निसंतान होऊन मरण पावला असल्यास त्याचे मागें आपल्या स्वतःच्या पुत्रापैकीं एखादा पसंत करून राजगादीचा मालक करितात येथील हें स्त्री प्राबल्य फार प्राचीन काळा पासून आहे असें म्हणतात.

न्या० सिं०

बंगाल्यांत ढाका ह्मणून जिल्हा आहे. तेथील सेशन कोर्टांत एक खुनी मोकदमा चालला असतांना नेटिव जुरीनें " बिनशाबीत " असा अभिप्राय दिला, याचें कारण त्यांनीं लाच खाल्ली. अशी भूमका निघून हें प्रकरण धसास लागलें. जूरीचे हक्क सरकार सर्वत्र देण्याला कांकू करते, व लोक मागताहेत, तों हा प्रकार ह्मणतांच साहाजिकपणें सर्वांचें लक्ष या प्रकरणाच्या निकालाकडे लागलें होतें. इतक्यांत सुदैवानें लाचाचा प्रकार अजी बनावट अशी न्यायदेवतेची खात्री होऊन तसा अखेर ठराव झाला. हें प्रकरण उपस्थित होण्याला काय कारण झालें तें बाहेर पडलें आहे तें पाहून मात्र वाईट वाटतें. मुनसिपालिटींतल्या दुफळीचा हा परिणाम असें तिकडे सर्व म्हणतात. तेव्हां मुनिसिपालिटींतल्या मेंबरासारख्या प्रतिष्ठित मंडळीमुळें अशा नीच रितीनें सूड घेण्याचा प्रकार घडावा हें अत्यंत अनुदारपण होय.

लष्करी शिपायांस पेन्शन देण्याच्या बाबतींत कांहीं ठराव करण्याचें घाटत आहे. त्यांत ५५ वर्षांच्या बदला ६५ वर्षांचा नियम करून त्यापूर्वी तो माणूस मेल्यास त्याच्या बायकोस व मुलांस नियमित मुदतपर्यंत नियमित पेन्शन द्यावें व बायको मुलें नसल्यास कापून ठेवलेली रक्कम त्याच्याजवळच्या नातलगासही मिळण्याचा हक्क असावा असें करण्याचा विचार आहे.

क०त०

'ब्रम्हधर्मा' ची तत्वें 'ज्ञानदीप' पुस्तकावरून खालीं दिलीं आहेतः—

मान्य तत्वें. १ ईश्वराचें अस्तित्व. २ आत्म्याचें अमरत्व. ३ आत्म्याची अनंतोन्नति. ४ उपासनेची अवश्यकता. अमान्य तत्वें. १ कोणी सृष्ट वस्तु किंवा पुरुष प्रत्यक्ष ईश्वर मानणें किंवा ईश्वरप्राप्तीस्तव ईश्वराच्या व मनुष्याच्या मध्यें मध्यस्थाप्रमाणें कोणी असणें. २ कोणतीही व्यक्ति किंवा ग्रंथ पूर्णपणें सत्य किंवा मुक्तीचा तोच एक उपाय मानणें.

ज्ञा० दी०

आमचे हल्लीं शरीर स्थितिसंबंधानें ज्या प्रमाणानें अधोगमन चाललें आहे तें त्याच प्रमाणानें यापुढें होऊं दिलें व योग्यवेळीं कांहीं तरतूद केली नाहीं तर, " लिलिपट " वाल्यांची अवस्था प्राप्त होण्याचे अगोदरच पाश्चिमात्य लोकांशीं लाभलेल्या जीवनार्थ कलहांत आह्मी रसातळास जाऊ व हिंदुलोकांचा नामावशेष मात्र राहील. वास्तव हिंदु स्त्रिया सुखदुःख संवेदनास पुरुषाप्रमाणेंच पात्र आहेत व शारिरिक सुस्थिति पुरुषां इतकीच स्त्रियांना अवश्य व इष्ट आहे. या दृष्टीनें जरी आम्ही त्यांची योग्य काळजी घेतली नाहीं, तथापि हल्लींच्या स्त्रिया भाविसंततीच्या जननी आहेत व होणाऱ्या संततीची स्थिति सर्वांशीं त्यावर अवलंबून आहे या दृष्टीनें तरी स्त्रियांस एका प्रकारचें महत्व येतें. "खुर्चीचा उपयोग काय? पुरुषानीं बसावयाचा. घोड्याचा उपयोग काय? पुरुषासाठीं गाडीस जुंपावयाचा. त्याचप्रमाणें स्त्रीचा उपयोग काय? तर, पुरुष सुखवर्धनाचा व प्रजोत्पादनाचा." हा जो खुर्ची, घोडा व भार्या यांस एकाच दर्ज्याचे पाहिरीवर बसाविण्याची वहिवाट, व स्त्रियांची स्वतंत्र योग्यता न लेखतां, पुरुषवर्गसुखसाधन या मापानें त्यांची उपयुक्तता मोजण्याचा जो आमचा प्रघात हीं दोन्ही निर्दय हिंदुतत्वें कबूल केली तरी देखील भावि संततीच्या जननी या नात्यानें स्त्रियांस मोठेंच महत्व येतें.

ज्ञा० सं०

## अकोलें बाजारभाव.

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | ९९॥- |
| " १५ दिवसाच्या मुदतीची | | | ९९॥= |
| सुवर्ण २३॥ | रुपे १०८ | आळशी | ९४ |
| गहू काठे | ७२॥ | बनशी | ८० |
| जवारी ४५ | चणे ६५ | सर्की | ५८≡ |
| कापूस | ३६ | रुई | ४८ |
| मीठ ४८≡ | तूप ८॥ | तेल | ५।- |

सध्याचे भाव. ( मोगलाई )

| | | |
|---|---|---|
| जवारी | बसंत १९४८ | |
| गहू | वैशाख शुद्ध १९४८ | ६८ |
| आळशी | चैत्र शुद्ध १९४८ | ८६॥= |
| रुई | फाल्गून १९४८ | ५१ |
| सर्की | वैशाख नवे साळची १९४८ | ५ |

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांणीं छपून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत
वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही ,, ३ ,, ०।८
सालअखेर ,, ७ ,, १।८
किरकोळ अंकास ............ ०।४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......०।१

Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7. ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy...............................4as

Advertisements
Below 10 lines...2 as
per line over10...4Rs
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VO XXVI AKOLA MONDAY 22 FEBRUARY 1892 NO 8

वर्ष २६ अकोला सोमवार तारीख २२ माहे फेब्रुवारि सन १८९२ इ० अंक ८

जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटरहाऊसचा, स्टेशन धर्मशाळेचा, बाजार कर वसूल करण्याचा, कंदील लावण्याचा वगैरे मक्त्यांचा सन १८९२।९३ सालाकरितां हराश तारीख १७ माहे मार्च सन १८९२ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्याणीं सदरहू तारखेस हजर राहण्याचें करावें कळावें तारीख १२ माहे फेब्रुवारी १८९२ इसवी.

Vyankatesh R. Mudholkar.
Secretary.
A. M. C.

महाराणी सरकारावर जो पौत्रशोकाचा प्रसंग गुदरला त्या निमित्त हिंदुस्थानच्या राजनिष्ठ प्रजेनें कळकळपणें दुःखवद्याच्या तारा व पत्रें शांतवना साठीं धाडलीं त्या बद्दल प्रतापशाली व्हिक्टोरिआ यांनीं प्रजा समुहाचे मोठ्या आगत्यानें आभार मानले आहेत आणि आपलें कर्तव्य बजावण्या साठीं शक्ति व सामर्थ्य ईश्वरानें द्यावें ह्मणून प्रार्थना केली आहे.

सदर्हु पत्राचा मराठींत संपूर्ण उतारा मे. आफिशिएटींग डेपुटी कमिशनर जिल्हा अकोला यांच्या वतीनें रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर एक्स्ट्रा असि. कमिशनर यांनीं आमच्या कडेस सर्व लोकांच्या माहिती सार्टी मेहरबानीनें छापावा म्हणून धाडला आहे आणि खुद्द महाराणी सरकारचा हा हेतु तो छापविण्याचा आहे म्हणून आम्हीं तो आदरपूर्वक खालीं समग्र दाखल करितोंः—

मु० असबरन ता० २६—१—९२

राष्ट्रांतील प्रत्येक भागांतील प्रजाजनांनीं ह्या अति दुःखाच्या प्रसंगीं प्रेम पुरस्कर स्वामिभक्तीनें खेदाचे उद्गार प्रगट केलेले आहेत त्यांचा माझ्या मनावर कधीं न जाण्या सारखा ग्रह उत्पन्न झाला आहे. असा दुःखद प्रसंग मजवर, माझ्या कुटुंबांतील माणसांवर व एकंदर राष्ट्रांतील लोकांवर एक शिवाय करून आलेला नाहीं. माझा प्रिय, सुशील, होतकरू आणि सौम्य स्वभावाचा नातू अकस्मात मृत्यू मुखीं पडल्यामुळें त्याच्या आईबापास, प्रियतरुण नवरीस आणि ममताळू आजीस जें दुःख झालें आहे तें खरोखर सहन करण्यास फार कठीण आहे. परंतु ईश्वराची इच्छा असें ह्मणून आह्मी सर्व उगीच राहतों. लक्षावधी लोकांनीं आम्हां विषयीं जे दुःखोद्गार काढिले त्याबद्दल मी त्या सर्वांचे फार फार आभार मानिते. आमच्या संबंधानें प्रजाजनांनीं जो हा कळवळा प्रदर्शित केला व माझा नातू ज्याचें मजवर माझ्या मुला सारखेंच प्रेम होतें त्याच्या गुणांची खरी पारख करून दुःख प्रदर्शित केलें.— त्याच्या योगानें मला आणि माझ्या कुटुंबाच्या माणसांला जें हें दुःख झालें आहे त्याचा विसर पडण्याचा संभव आहे. गेल्या तीस वर्षांत मजवर मोठे मोठे दुःखद प्रसंग येऊन गेले आहेत. आणि माझे श्रम, माझ्या काळज्या आणि मजवरील जबाबदारी हीं जरी फार मोठीं आहेत तरी माझें ईश्वराजवळ असें मागणें आहे कीं त्यानें मला माझ्या हयातींत माझ्या प्रिय देशांतील आणि प्रिय राष्ट्रांतील प्रजा जनांचें हित करण्याची व त्यांस सौख्य देण्याची शक्ति देऊन मदत करावी.

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ११ शके १८१३

इनकमट्याक्स हा कर हिंदुस्थानांतल्या युरोपियन अधिकारी व व्यापारी लोकांस फार भारी वाटतो. सालिना ५०० रुपये उत्पन्ना खालचे बहुतेक सर्व लोक गरीब नेटीव असल्या मुळें त्यांच्यावर हा कराचा बोजा पडत नाहीं. शिवाय नेटीव लोकाचा स्वभाव ओरड करण्याचा नसून फार गरिबीचा आहे परंतु साहेब लोकांचा उपजत बाणा कुरकुर करून गाऱ्हाणें निकालाला नेऊन पोंचवावयाचें असा असतो. कलकत्यास सेंट आन्ड्र्यूस डिनरच्या प्रसंगा मि. माक्ये यांनीं इनकमट्याक्स बंद करण्या बद्दल सणसणीत भाषण केलें आणि त्यावर व्हाइसराय साहेबांनीं समर्पक उत्तर दिलें तेव्हां इनकमट्याक्सचा प्रश्न सध्यां निघणार नाहीं असें वाटलें होतें. परंतु युरोपियन लोकांनीं 'लंडन टाइम्स' पत्रांतून विलायतेस इनकमट्यास बंद करण्याचा प्रयत्न चालविला आहे.— 'इनकम ट्याक्स हें सरकार देणें कोणास आवडत नाहीं व इंडियांतल्या लोकांना अगदीं नवीन आहे. विलायतच्या लोकांनीं इंडियांत येणाऱ्या माला वरील कर उठविण्या बद्दल प्रचंड वाग्युद्ध केलें. अयात माला वरील जकातीचा बोजा श्रीमान व सधन लोकांवर पडत असे परंतु हिंदुस्थानच्या बाजारांत आपला माल स्वस्त विकण्याच्या सोयी साठीं म्यांचेस्टर कडील व्यापारी लोकांनीं या जकाती विरुद्ध कल्लोळ माजविला आणि अखेर ती उठविण्यांत आली. जकातीचें कमी झालेलें उत्पन्न भरून काढण्या साठीं व गरीब नेटीवांस भूतदया दाखविण्या साठीं हिंदुस्थान सरकारास इनकमट्याक्स बसविणें भाग झालें. आणि हा कर गोळा करितात तेव्हां फार त्रास पडून मोठें कठिण जाई तरी लार्ड डफरीन साहेबांनीं मोठ्या युक्ति प्रयुक्तीनें हा कर कायम करून तो गोळा करण्याचे मार्ग सुलभ व सोपे करविले. परंतु निराळा इषारा अखेरीस दिला आहे कीं इनकमट्याक्स हींदुस्थानच्या लोकांना नव्हे तर लहान परंतु फार प्रतिष्ठित अशा जन समुदायाला अत्यंत अप्रिय आहे.' या वरील लंडन टाईम्स मधील अखेरच्या अभिप्राया वरून इनकमट्याक्सचा इतिहास, तो बसविण्याचीं कारणें आणि त्याचें भावी स्वरूप हीं नीट कळून येतील. 'लहान परंतु प्रतिष्ठित' असा वर्ग निराळा केला आहे त्यांतील लोकच हिंदुस्थान सरकारास उत्पन्ना वरील कर बंद करण्या साठीं अर्जावर अर्ज पाठवीत असतात आणि जेव्हां जेव्हां संधि मिळेल तेव्हां तेव्हां या करा बद्दल ओरड करीतच असतात. या वर्गाचे पुरस्कर्ते आंग्लो इंडियन पत्रकार आपापल्या पत्रांतून या करा बद्दल वाईट वाईट कथानकें सांगून सदोदित उठाठेवी चालवितात तरी ते मुद्दाम होऊन हा मुद्दा अचानक गाळतात कीं हा कर कायम असणें न्याय्य आहे आणि तो एका लहान पण प्रतिष्ठित लोकांच्या वर्गाला अमान्य व नकोसा झाला आहे. हिंदुस्थान सरकारचें अभिवचन असें आहे कीं या देशच्या गरीब रयते वरील करांचे इतर बोजे कमी होई पर्यंत हा उत्पन्नावरील कर उठविला जाणार नाहीं आणि या अभिवचनाचा अर्थ नीटपणें समजाऊन दिला म्हणजे वरील लोकांच्या ओरडण्याला जुमानण्याचें काहीं कारण राहणार नाहीं. या अर्थाची फोड फार सरळ रितीनें खालील भाषांतरा वरून स्पष्ट होईल ह्मणून तें आह्मी दाखल करितोंः— 'उत्पन्नावर कर बसविण्याला पुष्कळ अपवाद आहेत पण या करा संबंधानें सर्वांनीं ही गोष्ट कबूल केली पाहिजे कीं या कराचा एक मोठा आणि चांगला परिणाम असा कीं हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकारचें राज्य चिरायु झाल्या मुळें कांहीं थोड्या लोकांचा एक वर्ग अस्तित्वांत येऊन भरभराटींत आहे. त्या वर्गांतील लोकांच्या ह्मणजे श्रीमान हुद्देवाले, व्यापारी, इतर व्यवसायांतले लोक यांच्या पुढें संपत्तीच्या राशी पडल्या आहेत आणि उत्तरोत्तर त्या धनराशीला मोठी भरती येत आहे आणि अशा धनाढ्य लोकांपर्यंत इनकमट्याक्सच काय तो व्यवस्थेशीरपणें पोंचतो. या अफाट राज्याच्या साम्पत्तिक वास्तविक स्थिती वरून एक शोकप्रद गोष्ट निर्विवाद कळून येते कीं लोकांना अन्नवस्त्राच्या पायीं उपासमारी आणि दुःखें भोगावीं लागतात तरी त्या बरोबरच वर निर्दिष्ट केलेल्या वर्गांतील लोकांच्या श्रीमंतीला ऊत येत आहे. त्यांच्या ऐषआरामाचे पदार्थ, सुखवस्तुपणाच्या व श्रीमंतीच्या संवयीं वगैरे पाहून संतोष वाटतो आणि राष्ट्राचें वैभव वृद्धिंगत होत आहे असेंही वाटतें तरी या संपत्तिविलासांशीं इंडयांतील प्रजाजनांचें अघोर दारिद्र्य ताडून पाहतां फारच खेद व चिंता वटते. तव्हां हा विचार मनांत वागविला ह्मणजे इनकमट्याक्स विरुद्ध जी दहशतीची ओरड करितात ती निरर्थक व मुद्देसूत नाही कांकीं या कराचें ओझें सधन लोकांवरच पडत असल्यामुळें फारशी फिकीर करावयाला नको.'

राष्ट्रीय सभेनें इनकमट्याक्सला अपवाद या वरील विचाराला धरून आणले आहेत. सरकारचा राज्यकारभार इनकमट्याक्सशिवाय भागत नाहीं त्याला नाईलाज आहे पण राष्ट्रीय सभेचें मागणें इतकेंच आहे कीं ५०० रुपये उत्पन्नापासून कराची आकारणी होत असते ती १००० रुपयापासून होत जावी ह्मणजे गरीब रयतेचा बचाव करण्याचा सरकारचा हेतु चांगला सिद्धीस जाईल.

सन १८९०–९१ सालीं ब्रिटिश इंडियांत शाळा खात्याची अभिवृद्धि होऊन विद्यादानाचे मार्ग कसकसे खुले होत चालले आहेत त्याची माहिती त्रोटक रूपानें गेल्या 'इंडिया ग्याझेटांत' प्रसिद्ध झाली आहे तिचा मराठींत सारांश आह्मी सर्व लोकांच्या साठीं माहिती खालीं देत आहोंः—

रिपोर्टाच्या वर्षी खासगी व सरकारी शाळा मिळून १३८०५४ होत्या ह्मणजे १८८९–९० सालपेक्षां ३३४४ शाळा नव्या स्थापल्या गेल्या. आणि ही वाढ सर्व सरकारी शाळांच्या संख्येंत आहे. इतकेंच नव्हे तर खासगी शाळा ४०५४७ होत्या त्या साल अखेर शिलकींत ३८२७९ राहिल्या ह्मणजे बाकी २२६८ शाळांची तूट ही सरकारी शाळांच्या वाढीनें भरून काढली. मुलां साठीं सरकारी शाळा आदले वर्षी ९४६९० पर्यंत वाढविल्या परंतु खासगी शाळा ३९४६५ होत्या त्यांतून २४९८ बंद झाल्या. मुली साठीं सरकारी व खासगी शाळा अनुक्रमें ४८४५ व १०८२ होत्या त्यांत रिपोर्टाच्या वर्षी एकंदर ४७० शाळांचा नवी भर पडली हें सुचिन्ह होय. स्त्रीशिक्षणाच्या सोयी सरकार व लोक हरतऱ्हेनें वाढवीत आहेत आणि तशांत ही सरकाराच्या बरोबरीनें मुलीस शिकविण्यासाठीं लोकांनी नव्या शाळा घातल्या आहेत हें विशेष समाधान कारक होय. सन १८८९—९० त शाळा व पाठशाळा या मधून ३३,३१,९३३ विद्यार्थी शिकत होते त्या ऐवजीं हल्लीं ३३,६८,९३० विद्यार्थी शिकत आहेत मुलींची ही संख्या २,९४,८५७ होती ती ३,१३७७७ पर्यंत वाढली आहे.

तेव्हां एकंदर मुलें आणि मुली मिळून ३६,८२,७०७ सरकारी व खासगी शाळांतून शिकत आहेत. इतक्या विद्यार्थ्यांची दर महिन्याची सरासरीनें हजिरी पहातां, ३०,२२,३०८ विद्यार्थी हजर असत असें निघतें. आर्टस शाखेकडील पाठशाळा मध्यें स्कालर्स १२१६५ असून डाक्टरी इंजिनिअरींग इतर आद्योगिक पाठशाळांतून स्कालर्स ३४२४ होते. मध्यम प्रतीचें शिक्षण मिळत असलेले विद्यार्थी ४,६८,५३६ अ-

सून प्राथमिक शिक्षणा साठीं २६,९४,६८६ आहेत. ट्रेनिंग शाळांतून ५०२२ जण शिकत आहेत परतु इतर विशेष तऱ्हेचें शिक्षण मिळत असलेले विद्यार्थी १५४५१ आहेत.

एकंदर ३६,८२,७०७ शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची जात आणि धर्म या संबंधानें निरनिराळे वर्ग पडतात त्या प्रत्येक वर्गाचें मूळ सर्व विद्यार्थ्यांच्या संख्येशी जें शेंकडा प्रमाण पडतें त्याची नोंद येणें प्रमाणें:— हिंदु ६८.२४; मुसलमान २१.७१; युरोपियन आणि युरेशियन. ६९; नेटिव ख्रिश्चन्स २.३४; आणि इतर बहुविध जातवाले ६.२ असे वेगवेगळे आंकडे शंभर विद्यार्थ्यां मागें पडतात.

ब्रिटिश इंडियांतील शाळा खात्या प्रीत्यर्थ सर्व खर्च २,८८,८१,९६३ रुपये झाला त्यांत ५९,८७,७७१ रुपये शाळांच्या तपासणी, स्कालरशिपा, इमारती, आणि इतर अशाच प्रकारचे खर्च मिळून खर्च झाले आहेत. सदरहू एकुणात खर्चाच्या रकमे पैकीं प्रांतिक उत्पन्नांतून ८१,६१३९१, लोकल फंडांतून ५०,५०,३१५, मुनसिपल फंडांतून १३,३६,३५०; फीचें उत्पन्न ८३,५५,६४४; आणि इतर प्रकारच्या मिळकती ५९,७८,२६३ रुपये असे निरनिराळे आकडे दाखविण्यांत आले आहेत. फीच्या उत्पन्नाहून ही कमी पैसा सरकारांतून खर्ची पडावा ही दुःखाची गोष्ट होय. इतर राष्ट्रांतील शिक्षणाच्या प्रमाणानें हिंदुस्थान देश महामूर्ख ठरतो याचें एक कारण तर सरकार शिक्षणा कडे फार थोडा पैसा खर्च करितें. आणि दुसरे परकाय राजे राज्य कर्ते असल्या कारणानें सर्व शिक्षण पद्धतीच कमजास्त मानानें चुकली असून लोकांस पाहिजे तशी हितकारक नाहीं. अखेरीस असा शेरा दिला आहे कीं विद्याखात्याची स्थीति समाधान कारक आहे तरी लोकल फंड आणि मुनसिपालिट्या यांच्या कडून शिक्षणा कडे फार थोडा पैसा खर्चला आहे हें नीट नव्हे.

---

कलकत्ता युनिव्हरसिटीचा पदवीदानाच समारंभ गेल्या पाऊण महिन्यापूर्वीं झाला त्या वेळीं त्या युनिव्हरसिटीचे व्हाइस–चान्सेलर नामदार गुरुदास बानरजी हे आपल्या भाषणांत सांपतच्या पदवीवाल्या सुशिक्षित लोकां संबंधानें ह्मणाले कीं अलिकडील युनिव्हरसिटीनें नियमित केलेल्या शिक्षणपद्धतीनें विद्वानांच्या कल्पना शक्तींत कांहीं अपूर्वता किंवा विलक्षण कल्पकपणा हीं नवीन न येतां त्यांचे विचार दुसऱ्याचे उसने घेतलेले असून त्यांत नैसर्गिक मार्मिकपणा अगदीं दिसून येत नाहीं. विद्येनें मनें संस्कृत होत असूनही कल्पनासामर्थ्य किंवा विचारस्मरणांच निराळा योजकपणा हीं नष्टप्राय होत असल्याचीं त्यांनीं दोन कारणें सांगितलीं. पहिलें कारण असें कीं, आपल्या लोकांस सर्व शिक्षण परकीयांच्या भाषेच्या द्वारें मिळतें आणि त्यापेक्षां सबळ व व्यापक दुसरें कारण ह्मणजे शारीरिक शिक्षणाविषयीं पराकाष्ठेची अनास्था होय पहिले कारणा बद्दल ते ह्मणाले कीं जन्म भाषेहून निराळी भाषा ज्ञानप्राप्तीचें मुख्य साधन आहे आणि या साधनीभूत भाषेचा भिन्नपणा आपण बोलतां लिहितों त्या भाषेच्या कार्टिक्रमाहून अगदीं वेगळा आहे. अशी परकी भाष शिकणें म्हणजे सर्वथैव दुसऱ्याचें अनुकरण करावें लागतें, व ही अनुकरणाची संवय इतकी अंगीं खिळून जात कीं त्या पासून आपल्या उपजत बुद्धीलाही निराळा ओघ लागतो. आणि आपले विचार परकीयांच्या वस्त्रालंकारांनीं प्रयासानें सुशोभित करण्याची आवश्यकता असल्यामुळें मानसिक शक्ति भलत्या व्यापारांत इतक्या गढतात कीं बुद्धीला पोषक द्रव्यें मिळत नाहींत व ती विकासही पावत नाहीं. शारिरिक शिक्षणाच्या अनास्थेविषयी बोलतांना बाबू गुरुदास बानरजी ह्मणाले कीं शारीरिक सामर्थ्याची अनास्था नुसती झाली असती तरी तरुण मंडळीच्या हातुन थोरपणीं मोठमोठ्या विचाराची व बहादुरीचीं कामें घडून आली असती परंतु युनिव्हरसिटीच्या बहुमान दर्शक पदव्यासाठीं आणि इतर विद्वत्तेच्या मोठेपणासाठीं बुद्धीवर व विचार शक्तीवर एवढा जबर आघात विद्यार्थीजन मारतात कीं त्यामुळें तरुणपणांतल्या वीरश्रीचा व उत्साहशक्तीचा समूळ ऱ्हास होतो. आणि जेव्हां मनोदीपक व प्रोत्साहक गोष्टी नाहींशा होतात तेव्हां सर्व प्रकारची कर्तृत्वशक्ति दुर्बळ व विगलित होतात. मनाची व्यावृत्ति सदासर्वकाळ जागृत राहिली आणि उपजत सामर्थ्य व तेजोबल हीं संकोचित होत गेलीं ह्मणजे अखेरीस मानसिक शक्तींची इमारत जमीनदोस्त होते यांत नवल नाहीं.

---

आम्हांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं सोलापुरास ‘ महाजन सभा ’ म्हणून एक व्यापारी सभा स्थापण्यांत आली आहे तिचें काम उत्तरोत्तर अधीक व्यवस्थेशीर व अधीक लोकोपयोगी होत आहे. व्यापारी सभा ह्मटलें आहे त्यावरून सभेचा उद्देश सहजीं कळेल. सदर्हू महाजन सभेच्या उद्देशाचे रचनेचें आणि नियमांचें एक पत्रक तिच्या सेक्रेटरी कडून आम्हाकडे आलें आहे त्यावरून सभेचे उद्देश आम्ही येथें उतरून घेतो:—

सभेचे उद्देश.—१ व्यापारी उदमी लोकांत फायद्याच्या गोष्टीसंबधानें एकोपा वाढविणें २. एकंदर जिल्ह्यातील व शहरच्या व्यापारी बाबतींत स्वहितदृष्टि उत्पन्न करून ती कायम राखणें. ३ उदीम व व्यापार यासंबंधीं मिळावयाजोगी असेल ती माहिती मिळवून व्यापारी लोकांस देणें. ४. शक्य व अवश्य दिसेल इतक्या मानानें व्यक्तिमात्र व सार्वजनिक व्यापारासंबंधीं अडचणी दूर करण्याचे इलाज योजणें. ५. व्यापारी वहिवाटी वगैरे बाबतींतले वादविवाद ऐकून सभेतल्या पंचांमार्फत निकाल करविणें, व तो कोणता कसा निकालास लागला वगैरे व्यापारी लोकांच्या माहितीसाठीं नोंदून ठेवणें. ६. सरकारी अधिकारी, अशा प्रकारच्या इतर व्यापारी सभा व या कामीं मदत देण्यास योग्य असे इतर थोर गृहस्थ यांच्यापाशीं व्यापारी बाबतींत पत्रव्यवहार ठेवणें. ७. आणि उभय पक्षकार कबूल असतील तर सभेच्या मार्फत दिवाणी वाद विवाद मिटविणें.

वऱ्हाडांतहि अशा सभेची अवश्यकता आहे किंवा नाहीं आणि असल्यास ती कितपत आहे हें ह्या उताऱ्यावरून ध्यानांत येईल. खरोखर हे उद्देश सभे करवीं फलद्रूप झाले तर मोठेंच कार्य होण्या सारखें आहे. वऱ्हाडांतील व्यापारी, सुखवस्तु, श्रीमान, सरकारी अधिकारी, वगैरे प्रमुख लोकांस वरील सभे सारख्या निराळ्या उद्योगाचें दिग्दर्शन करून सध्यां तूर्त एथेंच थांबतों.

---

# The Berar Samachar

MONDAY, FEBRUARY 22, 1892

---

The House of Lords is busy with two bills in regard to India. The first is the 'Indian officers' Leave Bill' and the other is the 'India Councils Bill' The former is intended to allow short leaves of absence out of India to those high officers in this country whose exalted position and corresponding responsibilities of office necessitate their continuous and unbroken stay in the 'land of exile'. The new facilities that the bill grants are proposed on the premise that such absence will not interfere with the general round of duties and thorough administrative work. The bill takes its origin in the special Act of Parliament which permitted the Duke of Connaught to attend Her Majests's jubilee in 1887 in England. It was an exceptional piece of legislation and it should not be allowed to stand as a precedence unless for similar and special emergencies of the occasion. It was Her Majesty's pleasure that all her sons should be present at the jubilee and so it was arranged by the Parliament to satisfy the most devout and earnest wishes of the Sovereign. It was all right and proper and no body objected to it. It will be a bad piece of legislation to favour a special class of officers with new uncalled-for privileges and rights. The high officers that come within the operations of the bill are in fact so many Rajas in all their pomp and dignity. They have not the least sort of pain and fatigue from which they would recoil in disgust and morbid humour. The new facilities will open a door of laxity and luxury to them and it is dangerous that they should leave the actual field of their operations in the midst of their limited periods of office. Lord Salisbury favours the bill because it will afford those officers opportunities to consult the Home Government on questions of administration. No doubt such direct conferences and meetings will be of great avail but the disadvantages that will result therefrom will be manifold and overwhelming. The English Mail and the telegraph are open all the year round and we don't see any special and imminent purposes for this sort of personal and direct communication with the Home Government. We shall therefore await with much anxiety and suspense the fate of the measure in the serial course of its readings in both the Houses of Parliament.

The other bill is well-known from its history of Lord Cross's half-hearted politics in regard to this country. The late lamented Charles Bradlaugh intended to move a bill on the same subject. Anticipating the drift of Indian affairs in Parliament and perhaps bent upon introducing an apple of discord Lord Cross brought his own India Councils Bill and managed to shelve it for the rest of the time. Before this bill could receive its turn of discussion on its being read twice in the House of Lords where it originated the unrivalled champion of the people's cause and the member for India was dead and gone. It was the worst misfortune that ever befell India.

The Bombay Gazette has the following short and suggestive para on the probable issue of the bill—

"The Indian Councils Bill has passed the second reading in the House of Lords, which was a matter of course. It is identical with the Bill which made the same infructuous progress on two previous occasions. Lord Kimberley, who leads what is left of the Liberal Opposition in the Upper House, expressed approval of the Bill as a tentative measure. Lord Northbrook spoke with approval of the "elasticity" which is its chief feature meaning thereby the powers given to the Viceroy in Council to adopt whatever methods of obtaining the services of representative men on the Council may seem desirable. Lord Salisbury, doubtless with reference to Lord Dufferin of Ava's recommendation that a limited right of election should be conferred on representative bodies in India, expressed disapproval of any idea of mainly confining the extra representation contemplated under the Bill to municipal bodies. There is no doubt that such a course might result in a very sectional and onesided representation of Indian opinion and interests on the Councils. But any such danger is some what remote, and we need not disturb our selves much about it. The Councils Bill has yet to take its chance in the House of Commons, which is by no means likely to introduce into it the municipal or any other elective element."

It is discreditable on the English nation that India should not be allowed the least rights that every well-governed nation in the world enjoys. 'No taxation without representation' is the guiding principle and the corner-stone of the constitution of a sound Government. We don't ask for the full and wide extent of the principle. We demand that we should be allowed some voice in the legislative Councils of the nation. We do so with the avowed and best intentions of consolidating the benign English Government on a firmer and surer basis of stability and permanency.

---

Sir Auckland Colvin has rightly observed in his administration report of N. W. Provinces for 1890-91 that the old aristocratic influences are weakened with the free play of the levelling influences of the British rule. The rich and influential land-holders were the leaders of the masses. They remained ignorant of the English language and the vast and slow changes that were coming upon the masses. The masses improved upon direct acquaintance with the rulers. They felt the superior sort of protection that extended equally over the purse and person of all men alike. Merit naturally became the test of man's worth. The people at large were free to move of themselves. They no longer needed the support of their old leaders. The Lieutenant-Governor thus notices the present state of the native society:—

"In rural, as in urban life, changes are taking place of which the result is to bring obscure men to the surface, and to relegate to comparative obscurity the classes on whom the public attention has been up to recent times concentrated. The structure of the old society is becoming unstable throughout. The changes may be for good or evil; this is not the place to discuss that aspect of the matter; but, there can be no doubt that, one by one, the forces which have hitherto held Native society together are being loosened; & that whole masses of the community are being melted as in a crucible and are gradually losing the form and colour which have hitherto distinguished them, to take what new shape or to re-appear in what combinations it is premature to conjecture."

The Hindu of Madras is generally inclined to welcome the change that works imperceptibly its way so

crumble into pieces the time-honoured but now inadequate ties and bonds in the society. The Editor of that native daily paper has carefully and cautiously philosophised on the above remarks in the most eloquent and well-chosen terms:—

It is not clear whether or not Sir Auckland includes in his sweeping remarks, the change that is coming over the country in other respects. For instance the inexorable law of progress, is in many places replacing the force of custom by that of competition. Views on social questions of even the masses are not always stationary. The walks of life which were once remunerative are bardly so now a days. The rich men to-day do not also patronise those arts and industries which their forefathers were encouraging. The system of education that obtains now has nothing in common with that in vogue in the days when the lambardar was the sole monarch of his village. The labour and industrial markets have been greatly disturbed. All these changes contribute their share to the new form and colour which Indian socity, in the eyes of Sir Auckland, is taking. And if the moral and material interests of the nation are properly consulted, and if a proportionate advancement is effected on these lines also, then nothing but good will flow to the rulers and the ruied.

Mr. Labouchere is very emphatic in *Truth* on the subject of woman suffarage. The report of the attempt to capture Mrs. Osborne leads him to a critical review of the Pearl mystery and the motives for the crime, and he thus concludes:— "Women are, in truth, incomprehensible creatures, and capable of anything: by turns angels and demons. And there are men whc would allow them to vote? I would sooner give children razors & revolvers to play with."

## वऱ्हाड.

मि० एच्. बी. नौलिस डेपुटी कमिशनर, वर्ग २, हे वाशिवाहून फर्लो रजेवर विलायतेस गेले होते त्यांना पेनशन देण्यांत आल्या विषयीं कळतें. साहेब मजकुरांच्या लांबलचक कारकिर्दीची ताळेबंदी काढली तर सत्कृत्याच्या सदर जमेला भोपळ्या एवढें शून्य घालावें लागतें. तेव्हां लोकांमध्यें आणि विशेषें करून वाशिमकरामध्यें त्यांची पत कितपत होती हें स्पष्ट दिसत आहे.

मि० नौलिस साहेब पेनशनदार झाल्यामुळें तारीख १ जुलै १८९१ पासून खालील बढतीच्या वर्गावर्गी वऱ्हाड कमिशनमध्यें कायम करण्यांत आली आहेः—

लेफटेनंट कर्नल एच. डी. पी. रेनिक, इंडियन स्टाफ कोर, डेपुटी कमिशनर वर्ग ३ क्यापटन डब्ल्यु हेस्तिंग इंडियन स्टाफ कोर, स्पेशल असि० कमिशनर; आणि मि० सी. ए० डब्ल्यू डेव्हिस कमिशनर वर्ग १ या तिघांस अनुक्रमें वर्ग २, वर्ग, ३ व वर्ग ३ असे कायमचे डेपुटी कमिशनर केलें आहे.

लेफटेनंट आर. पी. हार्सबर्ग इंडियन स्टाफ कोर, स्क्वाड्रन आफिसर आणि आडजुटंट पहिलो पलटण, मद्रास लानसर्स यांस मुलूख अमानी हैदराबादच्या अधिकाऱ्यांमध्यें असिस्टंट कमिशनर वर्ग ३ नेमलें आहे.

मि० इ० स्काफर ट्रेझरी आफिसर हैदराबाद यांस गेले पंधरावे तारखेपासून १९ दिवसांची हक्काची रजा देण्यांत आली आहे.

सिकंदराबाद कानटानमेंट साठीं देवीखान्याचे नवे नियम लागू केले आहेत. वऱ्हाडांत ही देवी सक्तीनें काढण्याचा कायदा अमलांत आणला जात आहे.

खामगांवचे बेंच— माजिस्ट्रेट मि० मार्केट्र यांनीं राजिनामा दिल्या वरून त्यांच्या जागीं मि० आर. स्टाफर्ड स्मिथ यांस नेमण्यांत आलें आहे.

खामगांव तालुका बोर्डानें सभासद रा० रा० रा० कृष्णाजी अम्बरसिंग यांचा राजनामा मंजूर करून त्यांच्या जागीं रा. रा. अजबसिंग महतबसिंग पिंपीकर यांस सभासद निवडले आहे.

उमरावती शहर मुनसिपालिटीचे दोन सभासद रा. रा. गोपाळ रामचंद्र नागपूरकर आणि सखाराम चिमणाजी गोळे यांचे राजिनामे मंजूर करण्यांत आलें.

वाशिम जिल्ह्यांतील तालुका बोर्डाचे कांहीं जुने सभासद जाऊन त्या जागीं नवीन गृहस्थ निवडण्यांत आले ते येणें प्रमाणें:—

वाशिम—तालुका

जुने—शिवलाल बदरीनारायण, नगरदास; गोपाळ हरी भागे, म्हसला; सखाराम खेमराज तारला; रामगीर गोसावी, मूर. नवे—उदाराम रामबक्ष, आडोली; तानालाल गिरधारी, काटा; नथुराय बळीराम, तारनाळा; व लाटाजी वल्लद लक्ष्मणजी, सुपखेड.

मंगरूळ

जुने—रघुनाथपताप कांडोळी; रामजी नागोजी, पोती; अमदामिया पटेल, पोघाट; व उकंड बापूजी. बिटोडा नवे— हरी भागवत तुळशीराम, भुळी; रामजी नागोजी, पोती; अमेदी पटेल, पोघाट, व आनंदराव दौलतराव देशमुख, कगार.

पुसद

जुने—रामप्रताप मारवाडी, गुंज; शिवराम यादव, मोराथ; पुरणमल मारवाडी, शेंबल पिंप्री; व केशव विठोबा, पुसद.

नवे—येकोबा वल्लद विठोबा, विठूळ; लक्ष्मण जयवंतराव, विठूळ; केशव मुरारी, विठूळ; व संभाजी वल्लद महादाजी, पारडी.

रा. रा. अंबादास संतो एक्स्ट्रा असि. कमिशनर आणि माजिस्ट्रेट वर्ग, १ वाशीम यांस क्रिमीनल प्रोसिजर कोडाचे २६०वे कलमा प्रमाणें खटले चालविण्याची परवानगी दिली आहे.

वऱ्हाड लोकल बोर्डाचे नियमांत फेरफार करण्यासाठीं एक निराळा मसूदा काढला आहे त्याचा विचार येत्या गुरुवारीं हैदराबादेस होणार आहे. रेसिडेन्सीमध्यें काय काय नवीन नियम होतात हें पुष्कळ लोकांस माहीत नसतें ही गोष्ट फार सुमार होय.

वऱ्हाडांतील लोकल फंडाची व्यवस्था जिल्हा बोर्ड आणि लोकल कमिट्या या मार्फत होत होती ती या पुढें सर्व लोकल कमिट्या जिल्हा बोर्डाच्या ताब्यांत येत्या एप्रिल पासून दिल्यामुळें जिल्हा बोर्डाकडेस सोंपविली जाईल असें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. तेव्हां लोकल फंडाकडील क्लार्क जिल्हा बोर्डाकडे बदलले जातील असें वाटतें. मि. क्रोडन साहेबांनी लोकल कमिट्या निराळ्या असूं नयेत ह्मणून गेल्या लोकल फंड रिपोर्टांत अभिप्राय दिला होता आणि त्यांच्या अभिप्राया प्रमाणें लोकल कमिट्या लवकर बंद झाल्यानें निराळे हिशोब ठेवावे न लागतां पूर्वी पेक्षा लोकल फंड उत्पन्नाची व्यवस्था अधीक चांगली होत जाईल.

रा. रा. उत्तमराव यशवंतराव राजुरकर यांस इलिचपूर येथें आक्टींग नायब तहशीलदार नेमलें असें समजतें. हे गृहस्थ तरुण असून जुन्या मोठ्या घराण्यांतले आहेत. हुशारीनें दरोबस्त कामें शिकून वरिष्ठ अधिकाऱ्यांची मर्जी सुप्रसन्न ठेवतील तर कायमच्या नायब तहशिलदारीवर नेमणूक आरंभी होईल असें आह्मांस वाटतें.

येथील वाशीमकर करुणेश्वर प्रासादिक संगित नाटक मंडळीनें गेल्या बुधवारी व शनवारी अनुक्रमें रंगी नायकीण व रामराज्य वियोग असे दोन खेळ करून दाखविले. खेळ चांगले होऊन प्रेक्षक जनांस फार आवडले.

वरील नाटक मंडळीच्या मागून दुसरी 'श्रीदत्त प्रसाद स्त्री संगीत मंडळी' येथें येऊन संमतिवयाचे कायद्याच्या परिणामदर्शन नाटकाचा एकच खेळ करून पुढें जाणार असल्या विषयीं बातमी कळते.

आफिशीएटींग जुडिशिअल कमिशनर मि. आर्बर्ड हे सहा महिन्यांच्या रजेवर जातील तेव्हां त्या रजेंत त्यांचें काम मि० क्राफर्ड फर्स्ट असि. रेसिडेंट यांजकडेस देणार आहेत असें ह्मणतात.

अकोला स्टेशन बाजूकडील दोन रस्ते मालाच्या गाड्यासाठीं बंद करण्यांत आले आहेत असें गेल्या अंकांतील मुनसिपालिटीच्या जाहिराती वरून कळलें असेलच. परंतु तो रस्ता बंद होऊ नये ह्मणून व्यापारी लोकांनीं तक्रार आणिली आणि तिच्या वरील वादविवादात मतभेद पडल्या वरून तें प्रकरण रेसिडेंट साहेबाकडे धाडून रस्ते पूर्वी प्रमाणें खुले केले आहेत. हे रस्ते मालाच्या गाड्यांना बंद करणें पयान्याय आहे तर आमच्या छापखान्याच्या बाजूच रस्ते माल गाड्या साठी कां बंद होऊं नयेत हें आम्हांस कळत नाहीं. रस्त्यावरील भरपूर भरलेल्या शेकडों मालगाड्यांच्या सतत वाहण्यानें रेलवे स्टेशन कडील रस्त्या प्रमाणेंच त्रास व दुःखें आमच्या आळींतल्या लोकांस होतात.

### नोटीस

भुरात्रेग वल्लद छमुत्रेग फुलारी रहाणार छावणी परतवाडा ता० इलिचपूर यांसः—

खालीं सह्या करणार यांचे कडून देण्यांत येतें कीं थोडे दिवसांपूर्वीं तुह्मी अकोलें येथें आल्या वेळीं अज्ञान सादुला बेग वल्लद मनुबेग याचें पालन करणार ह्मणोन जो दस्ताऐवज लिहून घेतला असेल त्याच प्रमाणें १ चांदबी २ चांदबी मर्द मनु बेग याचे बद्दल ही जे करार नामें झाले ते सर्व कागद पुरे न होता अपुरे राहिले. जो पर्यंत अज्ञान सादुला याचे पालन कर्ते १।२ चांदबी आहेत त्यापेक्षां तुम्हांस तो अधिकार घेऊन कोणतेही कामांत पडण्याची जरूरी नाहीं. शिवाय तुमचे अविश्वासनीय वर्तनावरून आह्मी तुह्मांस पालन कर्ते नेमूं इच्छित नाहीं. या बाबतींत व चांदबीचे संबंधानें आणि अज्ञान सादुला याचे जिनगीस बोका पेईल असें जितके कागद आणि वर लिहिलेले कागद तुह्माजवळ असतील ते रद्द आहेत व या नोटीशीनें रद्द केले या प्रमाणें तुह्मी समजून हवे लोकांनीं ही तुमचेशी या बाबतींत कोणताच संबंध न ठेवण्या विषयीं सूचना आहे. कळावें ता० १८-२-९२

(सह्या)

नि० चांदबी मर्द मनुबेग.

नि० चांदबी मर्द मनुबेग.

### नोटिस.

बनाई मर्द मारुती पाटील रहाणार आंबेटाकळी ता० बाळापूर हल्लीं रहाणार लोणी गवळ्याची ता० मेहेकर, व देवाजी बापाचें नांव माहीत नाहीं अडनांव चाणे राहणार लोणी ता० मेहेकर जिल्हा बुलडाणें यासः—

खालीं सही करणार इसम राहणार आंबेटाकळी ता० बाळापूर जिल्हे अकोलें. नोटीस देतो ऐसाजे तुं आमचे धाकटे भावाची बायको लग्नाची असून आमचा भाऊ हा मेत जाला सबब आमचे वडिलाची जिनगी पैकीं स्थावर जिनगी मौजे आंबे टाकळी एथील शेत सरवे नंबर ११२ पैकी एकर ६०३० गुंठे; ९०१ आकार, सरवे नंबर १०, एकर १२०१९ गुंठे, १००३०३ आकार; ह्या दोन्ही नंबरचे खातें वारसाचे संबधानें सरकारांनीं तुझें नांवें लावून दिलें आहे. हल्लीं आह्मी तुजला अन्नवस्त्र तुझे जिवांत जीव आहे तों पावेतों देण्यास कबूल असून कांहीं माल तुजला दिला ही आहे करितां आह्मास तुझा भरंवसा वाटत नाहीं. कारण तूं बायकोची जात असून कदाचित तूं एखादा घरठाव वगैरे केल्यास मग आमचे जिनगीची व्यवस्था कशी व्हावी? याजकरितां तुजला ह्या नोटीशीनें कळवितों कीं सदरहू नंबर हे आमचें नांवें लावून द्यावें. नंतर तुझे इच्छेस वाटेल तसें त्वा करावें. वरून ही नोटीस तुजला दिली आहे. त्यास आतां नोटीस पावल्या दिवसां पासून एक महिन्याचे आंत येऊन शेताचा राजीनामा देऊन आमचे दोघांपैकीं एकाचें नांवें खातें करून द्यावें व तुझे आंगावर आमचे घरचे डागीनें वगैरे सर्व माल असें तुझें स्वाधीन आहे त्यास जर करिता तुं आमचे समती वांचून डागडागीना व शेती वगैरे हीं कोणास विकलीस तर जो विकत घेणार त्याजवर व तुजवर योग्य कोर्टांत फिर्याद करूं हें तूं पक्के पणीं समजावें. त्यास आतां कोणती ही गोष्ट आह्मास विचारल्या वांचून त्वा न करावी याजबद्दल तुजला नोटीशीनें कळविलें आहे. त्यास आमचकडेस येऊन सर्व निकाल करावा तूं आपले ठिकाणीं सर्व गोष्टीची मुखत्यारी समजून काम करशील तर तुजला कोणताच अधिकार नाहीं. आमचे शिवाय बिलकुल जिनगीची आफरा तफरा करूं नये. कळावें. ता० १९ माहे फेब्रुवारी सन १८९२ इ०

(सह्या)

दत्तु व० लक्ष्मण पाटील नि०खुद्द वस्ती आंबेटाकळी

चंद्रभान व० कृष्णाजी पाटील वस्ती आंबेटाकळी

## वर्तमानसार.

दुष्काळ आला असें सरकारानें कबूल केलें गेल्या सरकारी ग्याझेटांत सरकारचा जो एक ठराव प्रसिद्ध झाला आहे त्यावरून दक्षण महाराष्ट्र प्रांतांत, ठरावांत सांगितलेल्या ठिकाणीं दुष्काळ सुरू झाला असें ठरवून, दुष्काळ कोडाप्रमाणें सरकारानें व्यवस्थाही करून टाकली. सगळा विजापूर जिल्हा; बेळगाव जिल्ह्यांतले अथणी, गोकाक व परसगड तालुके आणि धारवाड जिल्ह्यांतले गदग, रोण व नवलगुंद तालुके इतक्या भागांत दुष्काळकोडाप्रमाणें दुष्काळ आहे असें ठरवून सरकारानें सर्व व्यवस्था लाऊन टाकली आहे. त्या भागचे कमिशनर मि. फर्लाट यांच्या रपोटावरून सरकारची अशी खात्री झाली व त्याप्रमाणें या दुष्काळसंबंधीं कामाकरितां, सोलापूरचे असि. कलेक्टर मि. डाडरठ यांस आपले स्पेशल अंडर सेक्रेटरी नेमून दुष्काळाची सर्व जबाबदारी त्या भागच्या कमिशनराच्या आंगावर टाकली आहे आणि त्यांणींच सर्व व्यवस्था करावी असें फर्माविलें आहे. तसेंच त्या त्या जिल्ह्याचे कलेक्टर हे दुष्काळकाडाच्या २१ व्या कलमाप्रमाणें दुष्काळ कामाच्या व्यवस्थेचे जबाबदार असून वर सांगितलेल्या भागांत दुष्काळकोड लागू केला आहे असें सरकारानें फर्माविलें आहे. हा सर्व व्यवस्था चांगली झाली व सरकार स्तुतीस पात्र आहे आणि या सर्व चांगलेपणाचे उत्पादक जे मि. कलेक्टर व त्या भागचे कमिशनर ते शेवटपर्यंत स्तुतीस पात्र राहून शेवटी सर्व लोकांकडून वाहवा करून घेतील अशी आशा आहे. गेल्या आठवड्याच्या हवापाण्याच्या रपोटाकडे पाहिलें ह्मणजे सरकार अगदीं वेळेवर पुढें आलें असें होतें. नाशीक जिल्ह्यांत महागाई वाढत असून चारापाण्याकरतां लोक व गुरें निघून जात आहेत. पुणें जिल्ह्यांतलीं गुरें पाण्याकरतां दुसरीकडे जात आहेत. सोलापूर पैकीं सांगोलें व माळशिरस व धारवाडैपकीं नवलगुंद गदग व रोण यांतील गुरें मालडास गेलीं. सगळ्या विजापूर जिल्ह्यांत चारा व पाणी यांचा तोटा आहे व लोक निघून जात आहेत. दुष्काळकामांवर आज ९४३ माणसें व ३७७ मुलें पोसली जात आहेत व ही संख्या आतां मोठ्या झपाट्यानें वाढेल असें कमिशनरचें ह्मणणें आहे. ज्या भागांत दुष्काळ सुरू झाल्याचें सरकारानें कबूल केलें तो ९४८४ चौरस मैल असून त्यांत एकंदर १४, ६७,७८७ मनुष्यवस्ती आहे। ईश्वर आमच्या सरकारच्या हातून या सगळ्या माणसांचा चांगला बचाव करो ह्मणजे झालें.

गव्हरनरजनरल हे आपल्या पत्नीसह ३० मार्च रोजीं मुंबईस येतील व ता. ३१ रोजीं तान्साबाटर मुंबईशहरांत सोडण्याचा समारंभ त्यांच्या हातून होईल. नंतर बहुतकरून त्याच दिवशीं त्यांचा मुंबईच्या लोकांकडून आदरसत्कार होईल. ता. २ एप्रिल रोजीं त्यांची पत्नी आगबोटींत बसून विलायतेस चालती होईल आणि गव्हरनरजनरल हे सिमल्यास निघून जातील. मुंबईच्या लोकांकडून यांचा थाट कोणत्या झोकाचा होणार हें अजून ठरलें नाहीं, पण हा थाटाचा सन्मान गव्हरनरजनरलास देण्याच्या बदला त्याच्या आंगच्या गुणास देण्याचा प्रघात सुरू होईल तर देणारांत कांहीं शहाणपणा आहे असें ठरेल.

फौजदारी कायद्याच्या ४२३ कलमाप्रमाणें अपील कोर्टानें जेव्हां पुन्हा चवकशी करण्याचा अगर कमीट करण्याचा हुकूम केला असेल तेव्हां तो हुकूम पुर्वीची चवकशी करणाऱ्या कोर्टास कळवावा व त्याणें अपील कोर्टाच्या हुकूमाप्रमाणें करावें असें हायकोर्टानें ठरविलें आहे.

टिटाघर येथें कांचेचें ओतकाम करण्याचा एक कारखाना एका इंग्रज स्त्रीनें सुरू केला आहे असें सांगतात. युरोपांतल्या त्या धंद्यांतले माहितगार लोक आणून कामदार नेमले आहेत व कारखाना चांगल्या रीतीनें चालेल अशी अटकळ आहे असें सांगतात.

आम्ही इजिप्तांतून निघणार नाहीं व तो प्रांत दुसऱ्या कोणा राजाच्या ताब्यांत देणार नाहीं असें लार्ड सालिसबरी यांणीं पार्लमेन्टांत बोलून दाखविलें.

होप नांवाच्या इंग्रजी पत्रांत ही पुढील गोष्ट प्रसिद्ध झाली वे आमच्या लोकांकडून या गोष्टीचा पडताळा कां येऊं नये हें समजत नाहीं. भविष्य कथन करणारा गोविंद चेटी नांवाचा एक माणूस मद्रास इलाख्यांत कुंभकोनच्या शेजारी एका गांवीं राहात असून त्याजकडे अनुभव पाहण्याकरतां पीकाक नांवाचा एक साहेब बरोबर एका दुभाष्यास घेऊन गेला. चेटी याणें साहेबाची भेट घेण्याचें प्रथम नाकारलें कारण प्रश्न पाहून एका चोरीचा पत्ता लाऊन दिल्याबद्दल एका जज्जानें चेटी यास चोरांचा साथीदार मानून शिक्षा दिली. मी तसा नसून अनुभव पाहणारा आहे असें साहेबानें सांगितल्यावर चेटी स्थानापन्न झाला व त्याणें विचार करून एका कागदावर कांहीं लिहिलें व तो कागद बंद करून साहेबाच्या हातांत दिला आणि मग तुह्मी कां आलां असें चेटीनें साहेबास विचारलें व मी कां आलों हें तुह्मी समजावें असें साहेबानें उत्तर दिल्यावर तुमच्या प्रश्नांचीं उत्तरें तुमच्या जवळ दिलेल्या कागदांत आहेत, पण तुह्मी आपले प्रश्न प्रथम सांगा मग माझीं उत्तरें वाचा असें तो ह्मणाला. (१) माझें लग्न कोठें कसें होईल? (२) मुंबईस राजाबाई टावरवरून ज्या दोन पार्शिणी पडल्या त्याचें कारण काय? आणि (३) माझ्या खिशांतल्या लखोट्यांत काय लिहिलें आहे? असे साहेबानें आपले तीन प्रश्न सांगितले. मग कवितेचा एक चर्ण ह्मणा पाखराचें नांव घ्या असें तो ह्मणाल्यावरून साहेबानें तसेंहि केलें. नंतर त्याणें लिहून दिलेला कागद वाचला. त्यांत साहेबाचा जन्मकाळ बरोबर सांगून " तुमचे प्रश्न स्त्रीवाचक आहेत. लग्न अमुक नांवाच्या १९ वर्षांच्या सुरूपस्त्रीशीं तुमच्या २५ व्या वर्षीं होईल. तिची तुमची स्वीटझर्लंडांत गांठ पडली (२) पार्शिणी आपमत्यूनें मेल्या व (३) लखोटा सीलबंद असून पीयर्सनें लिहिलेला आहे. तुह्मी कवितेचा चर्ण अमुक ह्मणालें व अमल्या पाखराचें नांव सांगाल, " असें लिहिलें होतें व शिवाय साहेबाचें कुलशील, चाकरी, वाढतो, आयुष्य, व भाग्य हेंही लिहिलें होतें. चेटीचा हा जबाब बरोबर जमला हें पाहून तो साहेब अगदीं चकित झाला. जातेवेळीं तुमचें लग्न ठरल्या वेळापूर्वीं होईल असें त्याण सांगतलें व तें परिणामी खरें ठरलें असें ही त्या साहेबानें प्रसिद्ध केलें आहे.

अ० इ०

अहमदनगर येथील तेलाची गिरणी बंद झाली त्याची मुख्य कारणे अशीं दिसून आलीं कीं, प्रथम गिरणींत निघणाऱ्या तेलाचा खप बाजारांत होंत नाहीं. कारणें, तेल घाण्यांत काढलेलें तेल स्वस्त दरानें विकूं शकतात. तेल्यांस जरी तेलांत फायदा झाला नाहीं तरी घाण्यांत काढलेली पेंड लोक गुरांसाठीं घेतात. यंत्रांतली पेंड गुरें खात नाहींत कारण, तींत तेलाचा अंश फारच थोडा असतो. लहान कारखान्याचें उत्पन्न थोडें असून त्या मानानें त्याचा खर्च अधिक असतो.

गायकवाड सरकारच्या राज्यांतील खनिज पदार्थांचा शोध लावणारे मि० फूट यांनीं संखेडा महालांत संगमरवरी दगडाच्या व सुवर्णाच्या खाणीचा शोध लाविला आहे ह्मणून समजतें.

खानदेशच्या कलेक्टरांनी गिरण्याच्या मालकांस असें फर्माविलें आहे कीं, रात्रीं कोणतेही कारणानें बायकांस गिरणींत कामास लावूं नये.

तेलंग प्रांतात दुष्काळाचें रूप दिसूं लागलें आहे. धारण महाग झाली आहे. चाऱ्याचें नांव सुद्धां नाहीं. तळीं विहिरी कोरड्या पडल्या लोक आपलीं घरेंदारें सोडून परप्रांतांत जाऊं लागले आहेत.

क० त०

दाढ्या—जोहानमेयो नांवाचा एक जर्मन चितारी होता, त्याची दाढी तो ताठ उभा राहिला असतां जमिनीला लागत असे.

स्त्रीयांच्या दाढीविषयीं कांहीं विलक्षण माहिती मिळालेली आहे ती अशीः—डयूक् ऑफ सॅक्सनीनें एका स्विस बाईला फार झुबकेदार दाढी होती ह्मणून तिची तसबीर काढून घेतली होती.

स्वित्सर्लंडचा राजा बारावा चार्लस याच्या सैन्यांत एक स्त्री होती. तिला दीड याई लांब दाढी होती.

कामगार.

हल्ली अजमीर प्रांतांत देवीच्या साथीनें इतका कडाका पडला आहे कीं, तेथें गेल्या महिन्यांत तीन हजार मुलें व पंधराशें मोठी मनुष्यें देवीनीं मेलीं. सर्व अजमीर शहर दुःखानें होरपळलें आहे.

खगोलविषयक शोधः— सूर्यावर ठिपक्यांचा मजेदार जमाव पाहण्यांत येत आहे असा मद्रास येथील खगोलवेत्ते मि. स्मिथ साहेब ह्यांना शोध लागला आहे. ते ह्मणतात कीं, हे ठिपके एवढे मोठे आहेत कीं, काळ्या कांचीच्या तुकड्यांतून सूर्याकडे पाहिलें असतां ते सहज दृष्टीगोचर होतात ज्यांना खगोलविद्येची अभिरुचि आहे त्यांनीं प्रचीति घेऊन पहावी.

सु० प०

लटकी लढाई — गदग येथील मराठी इंग्रजी आणि हिंदुस्थानी शाळेतील मुलानीं आपसांत दोन फळ्या करून एका फळीनें इंग्लिशांचा आणि एकानें रशियाचा पक्ष स्वीकारला. ते गावा बाहेर नाल्यांत गेले आणि तेथें खोटीनाटीं हत्यारें घेऊन लढाई सुरू केली होती. इतक्यांत पोलिसानें येऊन त्यांना हकून लाविलें असें गदगचे रसिकरंजिनी पत्रावरून समजतें.

हिंदुस्थानचे स्टट सेक्रेटरी आपल्या ठरावांत ह्मणतात कीं, पुढील सालीं हिंदुस्थान व इंग्लंड यांच्या दरम्यान पैशाचा व्यवहार होईल त्या संबंधात रुपयांची किंमत १ शिलिंग, ४ पेन्स, ३ फार्दिंग इतकी धरली जाईल. हुंडणावळीच्या संबंधानें दरसाल हिंदुस्थानांस किती तुट सोसावी लागते याचा विचार केला तर हल्लीं हिंदुस्थानच्या डोक्यावर जो कर्जाचा बोजा वाढला आहे, तो सर्व हुंडणावळीबद्दलचा आहे व त्यामुळेंच हिंदु लोकांवर नवीन कर बसविण्याची पाळी येते असें विचारी सुज्ञ मनुष्यांस वाटल्याशिवाय राहणार नाहीं इंग्लंडचीच राज्यसत्ता हिंदुस्थानांवर आहे तर तिकडच्या आणि इकडच्या नाण्याच्या किंमतींत फरक कां बरें असावा ! ! !

म० मि०

मनुष्यांचें वय वीस वर्षांचें सुमार झालें, ह्मणजे त्याच्या डोक्याची वाढ पुरी होतें. सातव्या वर्षां नंतर डोक्याच्या कवटीची वाढ फार हळू हळू होत जातें. तरी दर वर्षी थोडी थोडी होता होता विसावे वर्षीं ती अगदी पुर्ण होते. सर रिचर्ड फिलिप्स् या नांवाच्या प्रख्यात डाक्टरांचें असें ह्मणणें आहे कीं जन्माच्या वेळी डोकें वजनानें शरीराचा षष्टांश असतें. दोन वर्षांच्या वयांत तें एक पंचरांश; तिसरे वर्षीं एक अठरांश; सातपासून दहा यांच्या दरम्यान त्याच्या वजनाची वाढ पुरी होते. विसाव्या वर्षीं तें एकंदर शरीराचा एक पसतिसांश असतें; व सत्तर वर्षांच्या वेळीं तें त्याहून कमी होतें ह्मणजे एक पंचेचाळिसांशापर्यंत जातें.

नद्यांचे ओघ साधारणतः किती वेगानें वहात असतात, हें पाहूं गेलें असतां असें दिसून येतें कीं, हा ओघवेग मुख्यतः तीन गोष्टीवर अवलंबून असतो. एक नदीचे वळण, एक ज्या जमिनीच्या भागातून ती वहाते त्याचा उतार व नदीचें पात्र. शिवाय पाण्याच्या परिमाणावर तर आहेच आहे. पाणी फार आणि पात्र जर अगदीं अरुंद असलें तर अ.घोला वेग फारच जबर येतो. एकंदरीनें पहातां नदीच्या उगमस्थानापासून ती प्रथम प्रथम ज्या भागांतुन वहाते त्या भागांत तिच्या ओघाला फारच वेग असतो; आणि उगमस्थानापासून जसजशी ती दूर होत जाते तसतसा ओघवेग कमी कमीच होत जातो. शेवटीं शेवटीं मुखाजवळ तर तो अगदींच कमी होतो. नदीच्या प्रवाहाच्या निरनिराळ्या भागीं निरनिराळा वेग असतो इतकेंच नव्हे, तर पात्रातल्या पात्रांत कोठेंहि पाहिलें तरीं निरानराळा वेग दृष्टीस पडतो. किनाऱ्याजवळ वेग मुळीच नाहीं किंवा फारच कमी असतो; परंतु मध्यंतरीं पाणी फार जोरानें वहात असतें. त्यासच धार असें ह्मणतात. कसलेंहि जोरानें वहाणारी नदी असो, तिच्या वेगाचें साधारण मान फार नसतें. तें फार झालें तर दर तासास दीड मैल असतें. अगदीं पूर येऊन नदी अत्यंत बेफामच झाली असली, तर मात्र केव्हां केव्हां कित्येक नद्यांचा वेग अठरापासून वीस मैलापर्यंत जातो. गंगा, ब्रह्मपुत्रा वगैरे नद्यांच्या वेगाचें मान कित्येक ठिकाणीं तासास चार पांच मैल तर इतर ठिकाणीं तासास बारा पंधरा मैल असतें असें वाटतें.

करम०

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांणीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ९ डांक हाशील ०।३
सहामाही ॥ ३ ॥ ०८
सालअखेर ॥ ७ ॥ १०८
किरकोळ अंकास .................... ०४

Rs.
annum in advance 5 Postage 13 as
annum in arrears 7 ,,1Rs 8 as
Six monthly............3 ,, 8 as
Single copy.............................1as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .......०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2 as
per line over10...4 as
Repetition per line3as

## THE BERAR SAMACHAR

VO XXVI | AKOLA MONDAY 29 FEBRUARY 1892 | NO 9

वर्ष २६ | अकोला सोमवार तारीख २९ माहे फेब्रुवारी सन १८९२ इ० | अंक ९


### विनंती.

वऱ्हाड–हायस्कूल–माजी– विद्यार्थीसमाजाचे सभासदांस विनंतीपूर्वक कळविण्यांत येतें कीं सदरहू समाजाचा यंदाचा समारंभ अकोलें येथें तारीख १३ व १४ मार्च सन १८९२ (रविवार व सोमवार) रोजी भरणार आहे तर समारंभास सर्वत्र मंडळींनीं वर्गणी पाठवून अगत्य अगत्य येण्याची कृपा करावी. आमचे कडून निमंत्रण धिठ्या गेल्या आहेत तथापि सर्वच मंडळीचे पत्ते माहित नसल्यामुळें ज्यांस चिठ्या पोंचल्या नसतील त्यांनीं देखील हेंच निमंत्रण समजून अवश्य येण्याची कृपा करावी व वर्गणी अगाऊ पाठवावी. कळावें तारीख २९ फेब्रुवारी सन १८९२ इ०

(सही) बाळकृष्ण मोरेश्वर साठे.
वामन नारायण काळे.
सेक्रेटरी–वऱ्हाड–हायस्कूल. माजी विद्यार्थी समाज.

---

जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटरहाऊसचा, स्टेशन धर्मशाळेचा, बाजार कर वसूल करण्याचा, कंदील लावण्याचा वगैरे मक्त्यांचा सन १८९२।९३ सालाकारितां हरास तारीख १७ माहे मार्च सन १८९२ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांणीं सदरहू तारखेस हजर राहण्याचें करावें कळावें तारीख १२ माहे फेब्रुवारी १८९२ इसवी.

Vyankatesh R. Mudholkar.
Secretary.
A. M. C.

---

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध १ शके १८१३

---

मुंबई येथील व्यापारी मंडळीची वार्षिक सभा ता. १० मिनहुरोजीं भरली होती त्या वेळेस मि. काटन् बोलतांना असें ह्मणालेः– हल्लीचा शिलिंगाचा भाव देशांतील कांहीं भागांतील दुष्काळ व वायव्येकडे राष्ट्र संरक्षणार्थ मोठमोठ्या रकमा खर्च करण्याची अवश्यकता या सर्वांकडे लक्ष दिलें असतां आदा व खर्च यांचा मेळ ठेवण्याची सरकारास मोठीच अडचण पडेल असें वाटतें. दुर्दैवानें जर असा प्रसंग आला व आद्यांत तुट पडली तर ती कशी भरून काढावी ह्याचा मार्ग दाखविणें व्यापारी मंडळीच्या कमिटीचें व प्रत्येक व्यापाऱ्याचें कर्तव्य आहे. जमीनीवरील सारा वाढविणें अगदीं अशक्य आहे. प्राप्ती वरील व मीठावरील कर हेच अजून पावेतो सरकारचे अशा प्रसंगीं आधार आहेत. ह्या देशा संबंधानें पाहूं गेलें असतां प्राप्तीवर कर बसविणेंच फार गर्ह्य आहे. व त्याचे ओझेंही फार अयोग्य रितीनें पडतें. मीठावरील कर वाढविल्यास गरीब लोकांवर फारच मोठें संकट पडेल. परंतु अशा प्रसंगी हिंदुस्थान सरकाराला करण्या सारखी एक गोष्ट आहे. ती ही कीं आयात मालावर पुन्हा जकात बसविणें (नाहीं, नाहीं. ह्मणून बेकर्ट साहेब ह्मणाले.) जो पर्यंत आयाता वरील जकात लॅंकेशायर येथील व्यापाराला प्रतिबंधक व इकडील व्यापाराला उत्तेजक होती, तो पर्यंत लॅंकशायरला 'नाहीं' ह्मणण्याला अधिकार पोंचला असतां परंतु ही जकात मुंबईंतील गिरण्यांस उत्तेजक नाहीं असें स्पष्ट दाखविलें गेलें आहे कारण ही सोडल्या पासून मुंबईंतील गिरण्या पांच सहा पट्टीनें वाढल्या आहेत व्यापाराला उत्तेजन देण्या साठींच जर ही जकात पुन्हा बसविणें असेल, तर ती ह्मणून पाडण्यास मी पहिला मनुष्य होईन. कोणत्याही धंद्याचें 'जोपन' करणें मला पसंत नाहीं परंतु केवळ उत्पन्ना करितां ती पुन्हा बसविणें अगदी न्याय्य आहे व मुख्यतः हिंदुस्थाना सारख्या देशांत–शिवाय हिंदुस्थानांत जीं एतद्देशीय अनेक संस्थानें आहेत त्यांजकडून राष्ट्र संरक्षणार्थ कांहीं तरी रकम काढण्याचाही एवढाच मार्ग आहे तरी आद्याला व खर्चाला मेळ घालण्या करितां नवीन कर बसविण्याचा सरकारास दुर्दैवानें प्रसंग आल्यास ही व्यापारी मंडळी सरकारास हा मार्ग दाखवील."

यावर अध्यक्ष नामदार फारेस्ट साहेब साहेब ह्मणाले कीं मि. काटन यांणीं आपलें पांडित्य येथील व्यापारी मंडळी पुढें खर्च न करतां, ते पुन्हां जेव्हां विलायतेस जातील तेव्हां म्यानचेस्टर, लिव्हरपुल, ओल्डहाम वगैरे ठिकाणच्या व्यापारी मंडळ्यांनीं आयात मालावरील जकाती संबंधी प्रश्नाबद्दल सेक्रेटरी आफ् स्टेटकडे दरबार करूं नये ह्मणून त्यांची मनें वळविल्यास ह्या विषयाला मोठी मदत होईल. हीं जीं मि० काटन व नामदार फारेस्ट साहेब यांची भाषणें दिलीं आहेत, ह्यावरून इंग्लिश व्यापारी लोक स्वहिताला किती जपतात, व स्वहितास कधीं निष्प्रतिबंध व्यापारतत्व, कधीं भूतदया, कधीं कांहीं, कधीं कांहीं अशी प्रसंग विशेषीं निरनराळीं नांवें कशीं देतात हें स्पष्ट होतें. इकडील गिरण्यांतील मजूर लोकांकडून गिरण्यांचे मालक काम फार घेतात, ह्मणून त्यांचे कामाचे तास कमी कराव व या हेतूनें म्यांचेस्टर येथाल व्यापाऱ्यांनीं जी नक्का खटपट केली ती सर्वांनां माहीत आहेच.

निष्प्रतिबंध व्यापाराचें तत्व सर्व देशास सर्व स्थितीस फायदेशीर आहे असें ह्मणणें मोठें धाडसाचें होईल, अमूक तत्व चांगलें अमूक वाईट, हें ज्या देशांस, ज्या कालास ज्या स्थितीस तें लागूं करावयाचें त्याजवर मुख्यतः अवलंबून असतें. हें तत्व इंग्लंडानें कधीं स्वीकारलें, का स्वीकारलें व त्यांपूर्वी तिकडच्या व्यापाराची स्थिती कशी होती ह्याचा विचार महत्वाचा आहे. प्राचीन कालापासून एकुणिसाव्या शतकांतील बरीच वर्षें पावेतों इंग्लंडांत निरनिराळ्या धंद्यास निरनिराळ्या तऱ्हेनें उत्तेजन देण्याचा प्रघात जारीनें सुरू होता. आयात व निर्यात मालावर जबरदस्त जकाती होत्या; कांहीं कांहीं धंद्यास पुष्कळ देणग्या होत्या व त्यांस 'बाउंटी' ह्मणत. आपला माल दुसऱ्या देशांत अधीक सवलतीनें जावा व आपल्याला त्या देशांचा माल तशाच सवलतीनें मिळावा ह्मणून त्या देशां बरोबर असे तह करण्याची चाल होती व इंग्लिश लोक निरनिराळ्या देशांत ज्या वसाहती करीत व जे कांहीं देश काबीज करीत त्यांजबरोबर व्यापार करण्याचा बहुतेक सर्व हक्क आपल्या कडेस च घेत असत. (ह्मणून इंग्लंडचे व्यापाराला मोठी गिराइकी मिळाली) अशी स्थिती कमी जास्ती प्रमाणानें सुमारें चाळीस पन्नास वर्षां पुर्वीं पर्यंत होती. इंग्लंडचा व्यापार वाढला, संपत्ती वाढली, यांत्रिककलेचा फैलाव झाला, धंद्याचा उत्कर्ष झाला, ज्ञानाचा प्रसार झाला व इतर देशा बरोबर व्यापारांत टक्कर मारण्या करितां वरील उपायांची मदत घेण्याची जरूर राहिली नाहीं. व तेथें लोकवस्तीच्या व व्यापार वृद्धीच्या मानानें जमिन फारच थोडी असल्या कारणानें त्यांस निर्वाहाचें धान्य व धंद्याकरितां कच्चा माल ह्या करितां इतर देशावर सर्वथैव अवलंबून रहावें लागतें. अशा स्थितींत व अशा कारणास्तव इंग्लंडानें हें तत्व स्वीकारिलें. नष्ट झालेले व खालावलेले धंदे व व्यापार यांचें पुनरुज्जीवन करण्याचे हेतूनें नव्हे तर अगोदरच वाढलेलें धंदे व व्यापार अधिक वाढविण्याच्या हेतूनें हें तत्व इंग्लंडानें स्वीकारलें. निर्धन्यास द्रव्य मिळविण्यास किती काल लागतो व किती श्रम करावे लागतात, व लक्षाधीशाच्या एक लाखाचे दोन लाख किती अल्प काळांत व स्वल्प आयासानें होतात व दोघांचे मार्ग कसे भिन्न असतात, हें सर्वांस माहीत आहेच. ह्या दोघां पैकीं हिंदुस्थान हें पहिल्या वर्गांत आहे असें ह्मटलें असतां चर्वित चर्वणाचा मात्र दोष येईल. पूर्वींचे बहुतेक सर्व धंदे लयास गेले, सुवर्णभूमि हें नाम मात्र राहिलें, प्राचीन ज्ञानाचा लोप झाला, नवीन यांत्रिक ज्ञानाचा नुकता उदय होत आहे, व पाश्चिमात्य ज्ञान व सुधारणा आपला अम्मल बसवीत आहे. अशा स्थितीच्या देशास निष्प्रतिबंध व्यापाराचें तत्व केवळ स्वहित बुद्धीनें लागूं करणें एकोणिसाव्या शतकांतील सुधारलेल्या भूतदयेस शोभतें काय? जे राजकीय हक्क इंग्लंड आज किती एक शतकें भोगीत आहे व जे त्यांचे केवळ नैसर्गिक बनून राहिले आहेत, ते अंशतः मिळण्या विषयीं हिंदुस्थानानें मोठ्या नम्रतेनें मागणें गेलें असतां तिकडे पाठ करणें, व जीं व्यापारतत्वें इंग्लंडांत सुरू केल्यास नुकीं पांच पन्नास वर्षें झालीं तीं इच्छे विरुद्ध हिंदुस्थानावर बळेंच लादणें युक्तीस किती अनुसरून आहे बरें!

---

मनुष्यमात्राचा स्वभाव कायमचा आहे आणि त्यांत फरक होणार नाहीं असें लोक मानतात. खरोखरीच वास्तविक गोष्ट तशी असती तर फार चमत्कारिक दुनियेची रचना झाली असती. मनुष्याचा स्वभाव ही अविच्छिन्न व सतत एकच प्रकारची मनःप्रवृत्ति असती तर जितके ह्मणून वाईट व समाजास निरुपयोगी व नकोसे लोक आहेत तितक्यांना एका मोठ्या येल्यांत घालून समुद्रांत अचानक बुडविणें भाग झालें असतें. तुरुंगखाने सरकारनें काढले आहेत त्यांत दोन प्रकारचे हेतु मनुष्य स्वभावाला उपरोधून योजिले आहेत. समाजाच्या अस्तित्वाला, शांततेला किंवा भरभराटीला विघ्नें येऊं नयेत ह्मणून कायदेकानू रचले आहेत. अमर्यादपणानें ते कायदे कानू जो मोडतो त्यांस तुरुंगखान्यांत बंदिवासांत टाकतात. त्या बंदिवानाच्या हालांत व यातनेंत शहाणपण शिकून तो सुधरण्या सारखा असल्यास पुन्हां समाजांत त्यास पूर्ववत् वागण्याची परवानगी द्यावी; आणि ज्या अपराधी मनुष्यांची सुधारणा होणें अशक्य दिसतें त्यास जन्मठेप, काळेंपाणी, किंवा फांशी इत्यादि शिक्षा देण्याचा परिपाठ आहे. अखेरच्या मजलेच्या शिक्षा फारच थोड्या अपराधांस लागूं करितात आणि बाकीच्या अपराधांस त्या त्या अपराधाच्या कमजास्त वाईट स्वरूपाप्रमाणें लहान मोठ्या शिक्षा देतात त्याचें धोरण असें कीं मनुष्य स्वभाव निरनिराळ्या संस्कारानें पालटतो आणि हे संस्कार सर्व निरर्थक होईपर्यंत मनुष्याच्या जितेपणाची मातबरी मानली आहे. आतां हे सरकारी कायदेकानू मनुष्य दुर्वर्तनाला प्रतिबंधक होतात तितके सद्वर्तनदर्शक होत नाहींत हा मनुष्याचा, समाजाच्या कायदे बाहुल्या वरील पंगुपणा होय.

खरोखर मनुष्यस्वभाव निश्चल व अगतिक मानला तर आपल्या आयुष्यांत मजा रहाणार नाहीं. आयुष्य बहुमोल आपण समजतो तें व्यर्थ होईल. मन सांगेल त्याप्रमाणें वागणें ह्मणजे मनाच्या प्रवृत्तींचा संवेग

ज्या दिशेला आपणास लोटील तिकडे वाहवत आपणास जावें लागेल. बरें वाईट, न्याय आणि अन्याय इत्यादि भाषणाचा प्रकार अन्वर्थ न होतां बाष्फळ ठरतील. मग मनुष्याचा वर्तनक्रम पशुतुल्य होईल. होणार असेल तें होईल अशा भरंवशानें मन नाहीं तसें वागावें, आणि मनोविकारांची लाट आपणास वाहवत नेईल तिकडे नशीबाची परीक्षा घेण्यास जावें लागेल.

परंतु वस्तुदृष्ट्या मनुष्य स्वभाव तसा नाहीं. त्यावर आपला अंमल चालतो. मग तो अंमल थोडा बहुत असला तरी फिकीर नाहीं आपल्याच शक्तीनें आपला स्वभाव आपण बदलूं शकतो इतकेंच नव्हे तर आपल्या वडिलांच्या हातीं ही थोडा बहुत अंमल नव तरुण पिढीच्या स्वभावावर पोंचतो. कित्येक दृष्टांत असा आपदा असे कीं, मुलाच्या अपरंपार बद्दल आईबापास शिक्षा द्यावयाची. याचें तत्व इतकें कीं मुलाच्या प्रकृतिस्वभावावर कांहीं इष्ट संस्कार घडवून त्यास अन्यायाच्या मार्गापासून परावृत्त करण्याची जबाबदारी वडिलधाऱ्या मंडळीकडेही पोंचते तेव्हां स्वतांच्या प्रयत्नानें स्वभाव बदलतो हें निराळें दाखविणें न लगे.

परंतु प्रकृति स्वभावावर आपला अंमल अल्प व माफक आहे. तो आपण योग्य व नीट रितीनें बजावून लक्ष्यांश होईल तितका सोडतां कामा नये आपण आपल्या आयुष्याची इमारत उभारणार आहों, आपल्या बऱ्या वाईटाची कर्तुमकर्तुम् शक्ति आपले हातीं, आहे, आपण करूं तें खरें इत्यादि गोष्टी मनांत बिंबल्या बरोबर आपलेपणा ह्मणून एका प्रकारचा भासूं लागतो आपली शर्यत कोणती आहे हें लक्षांत आणून मनुष्य त्या प्रमाण वर्तूं लागतो आणि आपल्या सर्व मनावृत्ति व शारीरिक बलसामर्थ्य एक निश्चयानें एका गोष्टीच्या प्राप्तीकडे लावतो.

आपला एक आशय ठाम झाला तरी त्याच्या फलद्रुपतेसाठीं आपल्या मार्गांत नानाविध अडथळे व विघ्नें येतात. या प्रतिरोधी कारण समुच्चयाला दूर करावें लागतें, हर प्रयत्नानें वेळ, साधन व ईश्वरदत्त गुण इत्यादिकांस आवर्जेसें करून करावें लागते. उद्योगाची कास धरली ह्मणजे सर्व चित्तवृत्ति साग्र व सावचित्त होतात. जगाच्या मैदानांत इतर लोकांबरोबर सामना होतो. प्रज्ञा व बुद्धिकौशल्य यांचे प्रतिस्पर्धीपणानें घर्षण होऊन आयुष्याची मनोरमता व कलकलाट सुखावह वाटतो. दैव किंवा नशीब मनुष्यांत फरक पाडीत नाहीं. तर दैवानें साधनसामुग्री व आयुष्यांतील उद्योगाची यंत्रें अनुकूळ होतात त्या प्रमाणान मनुष्य पूर्णत्वास व विकासास पोंचतो. मनुष्याचा स्वभाव ह्मणजे त्याचे विचार व अंतःकरण होय आणि त्यावर टाकीचे घाव बसतील तसें त्याला देवपण प्राप्त होईल. परंतु टाकीचा संस्कार होण्यापूर्वीं हे विचार व अंतःकरण अति गुप्त असतात. त्यांस उजेडत आणणें मनुष्याचें कर्तव्य होय.

साराश, मनुष्यानें प्रयत्नवादी होऊन चालले पाहिजे. दैव व नशीब या विसांव्याच्या गोष्टी आहेत. आयुष्याच्या कर्तव्यांत दैव कचकामाचें आहे. दैवावर हवाला सोंपवून प्रयत्नवादी राहणें सयुक्तिक वाटतें परंतु दैवाचा रिवाज आपल्या विचारांत झाला कीं, लागलीच आपल्या प्रयत्नांत शिथिलता येते. आणि गुलाबाच्या अमोल फुलाला किड लागावी तसें आयुष्याच्या कारागिराला अर्धांग वायुची विकृति जडते. ह्मणून प्रत्येकानें सावगिरीनें रहावें.

आतां हें खरें कीं आपल्या आयुष्यांतील बऱ्या वाईटाचा जिम्मा आपण सर्वथा घेऊं शकत नाहीं. मनुष्य स्वभाव पूर्णतेस पोंचणार नाहीं. ईश्वरा वाचून सर्वगुणसंपन्न कोणी नाहीं. परंतु आपली नैतिक संपन्नता कमी असली तरी त्याच्या चिरस्थायीपणानें ती मनुष्यास शोभाप्रद होते आणि तिला झुगारून देतां ही येत नाहीं. आपण ईश्वराच्या गुणसंपन्नतेच्या योग्यतेचे होणार नाहीं तरी आयुष्य सुधारणेच्या वेळां पुष्कळ येतात त्यापैकीं आपण फार थोड्या उपयोगीं करून घेतो. तेव्हां असे प्रसंग विरळा येतात ते वारंवार आणण्याची संधि दवडूं नये हाच मथितार्थ निघतो.

## गोरक्षण.

( स्वामी आलाराम यांचा उपदेश )

स्वामी अलाराम हे एक थोर सत्पुरुष आहेत. हे पंजाबा कडील मूळचे रहिवाशी. त्यांनीं संन्यासव्रताची दीक्षा घेतली आहे. आज त्यांच्या उमरीला साठ वर्षें झालीं आहेत. पण यांचा जोग कांहीं विलक्षण प्रकारचा आहे. हे बहुश्रुत असून चांगले पंडित आहेत. जोगी. बैरागी, सन्यासी वगैरे लोक व्रतवैकल्यांत, जपतपांत, हटयोगाच्या खटाटोपांत आयुष्य खर्चण्याचें ढोंग करितात आणि खरोखर कबीरांच्या दोहऱ्या प्रमाणें 'सिद्धनकी तो बात नें जाने' अशा वर्णनाचे असून वृत्तीवरून 'पेटनके उपदेशी' असतात कांहीं अपूर्व सिद्ध पुरुष महात्मे असतात परंतु ते फारच फार विरळा आहेत आणि तशांची गांठ ही पडणें अती दुर्मिळ होय. स्वामी आलाराम हे अगदीं निराळ्या कोटींतले आहेत. संसाराचा पसारा सोडून दिला आहे तरी 'वसुधैव कुटुम्बकम्' अशा व्रताचा यांचा बाणा आढळतो. यांनीं आपला देह देशसेवे प्रीत्यर्थ अर्पण केला आहे. गोरक्षण, राष्ट्रीय सभा, व हिंदूंचा सनातन धर्म इत्यादिकांवर हे गांवोगांव व्याख्यानें देतात. वाणी रसाळ असून बोली हिंदुस्थानी असल्यामुळें त्यांच्या भाषणांचा आस्वाद बहुत जनसमूहास मिळत असतो. हे सर्व हिंदुस्थानभर फिरले आहेत व फिरत आहेत. 'कृतान्त-कटका-मलध्वज-जरा दिसो लागली' अशा वृद्धापकाळीं ते लोकांस आपल्या ज्ञानाचा व गुणांचा लाभ देतात आणि आपल्या उपदेशानें लोकांस सुशिक्षा लावतात ही आनंदाची व अपूर्वतेची गोष्ट होय.

या आठवड्यांत स्वामी महाराजांचा तळवऱ्हाडांत असून ते उमरावतीहून गेल्या शिवरात्रीस येथें आले. यांचें पहिलें व्याख्यान 'अहिंसा परमोधर्मः' या विषयावर झालें. यांचें विचार प्रगल्भ असून विषयाचें विवेचन चांगलें झालें त्यांनीं ओढाताण करून धर्मशास्त्रांतील आज्ञांचि विसंगतता खोटी ह्मणून ठरविली, त्यांनीं स्वमतप्रकाशनार्थ दाखले, दोहरे, शास्त्राधार, निरनिराळ्या धर्मांतील सारभूत वाक्यें वगैरे मोठ्या शोधक बुद्धीनें गोळा केलीं, आणि गोरक्षण इंग्रजी राज्यांत कायदेकानूनीं व मंडळ्या स्थापल्यानें फार सुलभ जाईल जाईल असें सांगून गोरक्षणाचा महिमा त्याची उपयुक्तता व सांप्रतची अनास्था हीं स्पष्ट पणें व्यक्त केलीं आणि श्रोतृसमूहास आपल्या गंभीर वृत्तीनें उच्चस्वरानें, व गोड गोड विचारानें तल्लीन करून सोडलें. श्रोतृसमाज फार मोठा व व्याख्यानाची जागा लहान ह्मणून त्यांचें दुसरें व्याख्यान शनिवारीं बाहिरजी धर्मशाळेंत झालें. दुसरे भाषणाचा विषय गोरक्षण असा होता.

आह्मी स्वामी आलाराम यांचें अभिनंदन करितों कीं, त्यांनीं अकोल्यास 'गोरक्षण' संबधानें लोकांस सर्वोत्कृष्ट प्रकारें जागृत केलें आहे आणि प्रस्तुतच्या चळवळीवरून त्यांच्या मंगल कार्यास वऱ्हाडांतही पुन्हां चांगलें स्वरूप येऊन तें यथावकाश फलद्रुप होईल असें आह्मांस वाटतें. नागपुरास गोरक्षणाचा उद्योग मोठा चालला आहे आणि तेथील गोरक्षणीं मूर्त्पोठांतूनच प्रांतोप्रांत नव्या शाळा निघत आहेत. रा. रा. गोपाळराव हरी भिडे वकील ( नागपूर ) यांनीं गोशाळा स्थापण्याविषयीं भगिरथ प्रयत्न चालविला आहे आणि त्यांचा सल्ला घेऊन स्वामी महाराज वऱ्हाडांत आले आहेत. स्वामी महाराजांच्या विचारांशीं आमचे विचार पूर्णपणें जुळतात तरी गोरक्षणासंबंधानें चालूं उद्योगाविषयीं आमचें मत निराळे पडतें. हा मतभेद गोरक्षणासाठीं कोणकोणते उपाय योजावे या संबंधानें आहे तो असाः—

सांप्रत आपली शेतकीची स्थिति निकृष्टतेची आहे आणि शेतकीला अंगभूत साधनें लागतात त्यांत गाय बैल म्हैसरेडा वगैरे गुरांची फार जरूरी आहे. हीं जनावरें ह्या अलिकडे दुर्भिक्ष व विरळ विरळ होत चाललीं आहेत प्रथमत्याची निगा नीट होण्यास गवतचाऱ्याची दुर्भिक्षता कारण आहे. मांसाहारी मनुष्यांच्या गरजा फार वाढल्या मुळें व गाई बैलांच्या मांसाची निरनिराळी उपयुक्तता व जरूरी अधिकाधिक होत चालल्या मुळें गुरांचा वध जारीनें चालला आहे आणि खाटिकांचे धंदे वाढले आहेत व कसाईखाने पुरे न होऊन गोवधांचीं यंत्रालयें निघालीं आहेत. गोवध हा शब्द अधिक अर्थव्यापकतेनें योजिला आहे. तेव्हां बौद्धधर्मानें जशीं हिंदुस्थानावर अहिंसात्मक धर्ममतें स्थापून आपल्या देशाचा अत्युत्तम फायदा केला आहे तसेंच या प्रचंड व प्रचूर गोवधाच्या लोकमत प्रतिकूळ करण्यास गोरक्षणा वरील स्वामी आलाराम सारख्यांचीं व्याख्यानें फार उपयोगी पडतील.

गाई म्हशी वगैरे गुरांच्या दुधदुभत्याचा किती मोठा उपयोग आहे आणि शाकाहारी मनुष्यांस मांसाहाराच्या तोडीनें किंबहुना अधिक बलवर्धक दुधदुभतें कसें उपयोगी पडतें हें लक्ष्यांत धरलें ह्मणजे गोवधानें आपल्या हिंदुस्थानच्या प्रजेचें फार अकल्याण होत आहे असें दिसेल. लोक दुबळे अशक्त, द्रव्यहीन होत चालले आहेत; दुष्काळ, महर्गता, दुर्भिक्ष हीं जास्त जास्त आपली राष्ट्रीय शरीरसंपत्ति क्षीण करीत आहेत आणि अपकर्षा बरोबर आपल्या देशच्या गुरांचा ऱ्हास होत चालला आहे. अशा दुर्घट व विकट अवस्थेंत पंडीत आलाराम सारख्यांचा उपदेश फार हितावह आहे.

१ असा जरी प्रकार आहे तरी सांप्रतचा गोरक्षणाचा उद्योग धर्मादायाच्या तत्वाला धरून चालला आहे. ह्मणजे राष्ट्रीय सभेला जशी काल्पनिक, अप्रत्यक्ष भविष्यकालीन, अनिश्चित राजकीय सुखसमृद्धीसाठीं लोकांनीं हस्तेंप्रहस्तें मदत करावी आणि ती मदत ते धर्मादाय ह्मणून समजतात तद्वत गोरक्षणाकडे पैसा खर्च करणें ह्मणजे निव्वळ धर्मादाय करणें असें लोक मानतात. आणि खरोखर व्यवहारिक दृष्टीनें त्यांनीं तसें कां मानं नये हें आह्मास समजत नाहीं. तात्विक विचार दृष्टीनें राष्ट्रीय सभेला किंवा गोरक्षणाला द्रव्यद्वारा किंवा शरीरद्वारा मदत करणें धर्मार्थ नसून आपल्याच नुसतें नाहीं तर आपल्या मुलाबाळांच्या साठीं आपण झटत आहों असें वाटेल परंतु तशा प्रकारचें शिक्षण फार लोकांस नसतें आणि तें शिक्षण मिळून ही तदनुसारी वर्तन ठेवणें ह्मणजे साक्षात्वर्णें व्यवहारांत आपण आपल्याच बुडवितों असें पदोपदीं वाटत असतें. विषय सुखाच्या क्षणिक ब्रह्मानंदा साठीं शहाणा मनुष्य ही नानाविध लंचाडत सांपडतो त्या प्रमाणेंच साधारण मनुष्य प्रत्यक्ष व निकट स्वार्थावरच नजर देऊन आपमतलबानें वागत असतो. सर्व व्यवहाराच्या दृष्टि धरून पाहतां असें वर्तन कांहीं सर्वथैव दोषार्ह नाहीं. तेव्हां गोरक्षणाला धर्मादायाची मदत नको असें आह्मांस वाटतें.

२ धर्मादायाची मदत मिळाली आणि पंडित आलाराम सारख्यांच्या उद्योगानें भूतदया, देशहित हीं जागृत होऊन गोरक्षणाकडे ती मदत मिळाली तरी चिरस्थाईपणा संबधानें ती गोरक्षणाची व्यवस्था अपूर्ण होऊन आपल्या इष्ट कार्यभाग सिद्धीस जाणार नाहीं व सतत आपल्या गुरांची संगोपनाची काळजी दूर होणार नाहीं. व धर्मादायाच्या मदतीनें हत्तवधि गुरें जगतील तरी गोरक्षणाचा विचार सर्व राष्ट्रा संबंधानें होत नाहीं. तेव्हां धर्मादायाच्या तत्वाहून निराळें तत्वाला धरलें पाहिजे.

३ गोरक्षणा संबंधानें आपले विचार आपल्याच तात्कालिक कल्याणाला अनुलक्षून आहेत. मनुष्य धनसंपादक प्राणी आहे अशी अर्थशास्त्रांत मनुष्याची व्याख्या आहे. येथें धन शब्द ज्याला कांहीं किंमत आहे आणि ज्याचा मोबदला करितां येतो अशा अर्थी व्यापक मानला पाहिजे. गोरक्षणापासून होणारें कल्याण ही धनोत्पादक आहे. तेव्हां मनुष्य गोरक्षणाकडे कां धांव घेत नाहीं? अर्थात् आपण मानतो इतकी गोरक्षणाची किंमत नाहीं किंवा असल्यास लोकांस ती किंमत कळून येत नाहीं अगर कोणत्या बाजारांत व कशा हुन्नरानें ती किंमत येईल हें ठाऊक नाहीं. त्या अर्थी आमच्या मतें पंडित आलाराम यांस आमची अशी सूचना आहे कीं त्यांनीं गोरक्षणाची वास्तविक किंमत न सांगतां तिचा योग्य मोबदला कसा आणावा हें शिकवावें. राष्ट्रीय सभेप्रमाणें गोरक्षणाचें कार्य दीर्घकालावर दृष्टी देऊन केलें पाहिजे असें आह्मांस वाटत नाहीं ह्मणून ही अर्थशास्त्राची फोड मुद्दाम केली पाहिजे.

४ तेव्हां गोरक्षण व्यापारी दृष्टीनें झालें पाहिजे असें आह्मी समजतों. मनुष्याच्या बु-

द्विवैचित्र्या प्रमाणें ही व्यापारी दृष्टी अनेक प्रकारें व्यवहारांत दाखवितां येईल. सध्यां आह्मास गोरक्षणा संबधानें थोडे विचार सूचले आहेत ते आह्मी थोडक्यांत दर्शवितों.

५ आह्मी गोरक्षणाचें उपयोग पुष्कळ सांगतो तर ते करून घेण्यासाठीं प्रांतीप्रांतीं गोरक्षणी व्यापार मंडळ्या निघाल्या पाहिजेत. व्यापारी मंडळ्या निघाल्या ह्मणजे भांडवल उभारलें पाहिजे हें भांडवल लहान लहान पाच पांच पांच दहा दहा रुपयांचे शेअर्स काढून सहस्त्रावधि रुपये गोळा केले पाहिजे. भांडवलांत सामान्य लोकांना थोडा बहुत पैसा घालतां येईल अशी सवलत दिल्यानें गोरक्षणाचा उद्योगाला साह्य भारी मिळेल. ज्यांस गाई म्हशी बैल रेडे पाळवत नसल्या मुळें विकावयाचे असतील त्यांच्या कडून हीं जनावरें विकत घ्यावीं आणि तीं पाळावीं. निरुपयोगी जनावर अर्थात् खाटिकां कडे जातील तीं न जाऊं देण्या साठीं मात्र लोकांनीं धर्मार्थ गोखानें काढले पाहिजेत. दुधदुभत्याचे कारखाने गवळी वगैरे नोकर ठेऊन काढावे. आणि इंजिनियरींग व लोकल फंड कडील कंत्राटें घेऊन व शेतें नांगरून देण्याचीं कंत्राटें घेऊन त्या त्या कामाकडे बैलरेडे वगैरेचा उपयोग केला पाहिजे. दुधदुभत्याचे कारखाने निघाले तर देशोदेशी आपला मेवा मिठाई व इतर पदार्थ रवाना करण्यास सांपडेल. असला उद्योग काढावा म्हणून तोंडानें सांगणें किंवा लेखणीनें लिहिणें सोपें आहे तरी तो उद्योग फार अवघड व कष्टानें साध्य आहे तेव्हां तशा उद्योगा कडे लोकांचें मन लावावें एवढेंच आम्ही सूचवितों.

कसाईखाने व गोवध यंत्रालयें बंद पाडण्याचा आपला संकल्प आहे तर सरकारा पाशीं कायदे कानूनें मदत मिळेल किंवा नाहीं हें सांगवत नाहीं. पण खाटिकांस जनावरें विकलीं जाऊं नयेत ह्मणून वरील व्यापारी मंडळी हें मोठें गिऱ्हाईक होय. शिवाय धर्माप्रीत्यर्थ विक्री होऊं नये अशा साठीं सामाजिक बंधनें दृढतर केलीं पाहिजेत. स्वामी आलाराम यांनीं सुचविल्या प्रमाणें बहिष्कारादि सामाजिक शिक्षा प्रचलित केल्या पाहिजेत. खाटिक्यांस गुरे विकणार नाहीं म्हणून आणाशपथा घेतलेल्या लोकांचे समाज निघाले पाहिजेत हे समाज शाकाहारी लोकांचे असून मांसाहाराची बंदी होईल तितकी जास्त जास्त होत गेली पाहिजे.

७ गुरांचीं प्रदर्शनें वगैरे सरकार भरवून आपल्या गोरक्षणाला मदत देत असतें. त्यांच्या कडून जगलखा त्यांतील वनचराई संबधानें अधीक सोयी करून घेण्याचा निराळा प्रयत्न चालविला पाहिजे आणि तसा प्रयत्न वर दर्शवलेल्या गोरक्षणार्थ व्यापारी मंडळ्या निघाल्यानें सहजीं होण्या सारखा आहे, आमची पूर्ण खातरी आहे कीं सरकार ही आपल्या उद्योगास चांगलें साह्य देईल.

## The Berar Samachar

**MONDAY, FEBRUARY 29, 1892**

All loud talk of peace, reform and economy are unmeaning in India when we see that the tax-payers are antagonistic to taxeaters. The official clique that reigns supreme does not love economic reduction of salaries and possesses uncontrolled power. One of the main evils of the British rule is a great spending administrative department of India. We find besides a grinding taxation and extreme poverty of the people. The levelling influences of the British Rajya have totally abolished the old aristocracy and all stand more or less on the brink of poverty and extinction. The ruling people of this nation speak of India as a trust given by Providence to their wise care and use. Victory has no donbt given them the right of a lion's share but in administering the trust they ought strictly to consult the good and welfare of the masses at large. People have no voice in the Government and nor do the rulers seek consultation with them about their wants and grievances. Agriculture is the prime source of revenue as well as the mainstay of the livelihood of the millions of the subject races. Somehow or other it is deteriorating gradually—manifold and complex are the causes at work. We are not able to distinguish them separately. Service, trade, navy and army are practically monopolised by the English people because they are too afraid of our misuse or abuse of them to allow the least and the lowest liberties of a free people. If the Natives for example are loyal, devout and faithful to the English throne and not even can an inveterate foe dare to talk otherwise of them still the people are not fit for being permitted to enroll themselves in Volunteer corps. It reflects a standing stigma on the English Government. The export trade has advanced in rapid strides with respect to raw materials in India. The principle of free-trade has more than enough ruined the nation at large. The vast and abundant supply of food-grains is consumed in England and those who till the land and sow corn are permitted gracefully to starve themselves even in ordinary times of plenty of rain and plenty of produce. It is stated on personal experience of the actual facts that more than forty millions of people go through life without satisfying their hunger. They all live so terribly on the verge of subsistence that one bad year and one failure of periodical rains brings whole sale famine over great provinces. The year 1891-92 is a year of famine over nearly the whole of southern India. The north is not also free from it. What a sad picture it is to represent of the struggling and starving millions in the field of famine relief-works and distressing travels away from homes in search of food and water. A further saddening report reaches us that the rate of work expected to be turned out from famine labour is one and a half times greater than the ordinary rates of Public Works and local funds. The 'Hindu' of Madras has drawn a moral of the present famine. In most expressive and eloquent terms that paper has demonstrated the duties of the Government which they have not yet taken a note of. The learned article opens thus:—

"One of the most difficult problems that the Government will have to consider sooner or later is whether the state of the people is satisfactory, whether the system of administration does not require radical improvement, whether in times of scarcity it is possible for the Government to protect the people as well as they need to be, and what staying power, if any, they yet possess; and how far the intentions of Government, excellent as they may read on paper, have been given effect to in practice. The Forest, the Salt and other laws have aggravated the evils of a costly foreign administration. The laws that regulate the demand and collection of kists and settlement are very defective in some essential particulars. The creation of departments after departments has imposed on the people heavy and fresh burdens which they are not able to bear. When we talk of the poverty of the people, their present distress and the gloomy future, we refer to the accumulated results of the past half a century and more of a defective system of administration. The despondency of the people and the want of staying power in them are not due to the administration of a year or two. That the agricultural population should be so hopelessly helpless at the very appearance of an adverse season is a sad chapter of the dark side of British rule in India. That this rule has, on the whole, and with certain well recognised exceptions conferred invaluable blessings on the people who are proud of owing allegiance to its sway has been repeatedly acknowledged. But the agriculturists are steadily on the decline; and the growing poverty of the people and the inability of the Government to meet their increasing wants are the most distressing features of the present situation.........

...Our rulers will therefore be wise if without contenting themselves with attending to the every day routine of affairs they bestow some earnest thought on effecting a permanent improvement in the position of the agriculturists, which alone can enable them to successfully tide over bad seasons without throwing the whole of the pauper population on the generosity of an impecunious Government."

## वऱ्हाड.

आम्ही असें ऐकतों कीं मि. टी. सी क्रौडन अफि० रेसिडेंट यांची हैदराबादेस कायमची नेमणूक न होता दुसराच कोणी रेसिडेंट येणार आहे.

परंतु आमचे लोकप्रिय आफि० कमिशनर कर्नल मेकंझी साहेब हे मात्र वऱ्हाडांत कायमचे कमिशनर होणार आहेत अशी आनंदाची बातमी समजतें.

मि अ. हि साहेब आफि० जुडिशिअल कमिशनर हे सह महिन्यांच्या रजेवर विलायतेस जात असल्या कारणानें त्यांच्या रजेंत कर्नल स्पार्क्स डेपुटी कमिशनर बुलढाणा यांस जुडिशियल कमिशनर नेमणार असल्या विषयीं कळतें.

कर्नल रेनिक डेपुटी कमिशनर इलिचपूर हे लवकरच विलायतेस पेनशन घेऊन जाणार आहेत. त्यांच्या जागीं कोणाची बढती होतो पाहावें?

रा. रा. विष्णु रंगनाथ शेंवेकर डेपुटी क्लार्क बुलढाणा यांची उमरावतीस कमिशनरच्या आफिसांत ८० रुपये पगारावर बदली झाली.

मि. अनवर अली तहशीलदार, अकोला, हे यंदा वऱ्हाडांतील वकिलीच्या परीक्षेस बसणार आहेत असें म्हणतात. सरकारी रुपेरी बिडी पासून सुटका करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य आहे.

राजूरचे रा. रा उत्तमराव यशवंतराव इलिचपुरास नायब तहशीलदार होऊन तेथील नायब तहशीलदार रा. रा. रामराव हे उमरावतीस व उमरावती चे रा. रा. शाहू दाजी पाठक हे केळापुरास बदलेले असल्याचें कळलें.

रा. रा. रामचंद्र भास्कर जयवंत नायब तहशीलदार, मलकापूर, यांस खामगांव कोर्टावर बदललें असून मलकापुरास कोणी नवीन गृहस्थ येणार आहेत म्हणून ऐकतों.

प्रमोदसिंधु कर्ते लिहितात कीं बुलढाण्यास डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार स्वतंत्र नेमून रा. रा. दत्तात्रय शामराव यांस पृथक सब रजिष्ट्रार नेमलें. आणि कळम तालुके यवतमाळ येथें सबरजिष्ट्रारची नवी कचेरी स्थापून मि. मिरजा हुसेन अलीबेग यांस सबरजिस्ट्रार नेमलें आहे.

नागपूराहून स्वामी आलाराम यांजबरोबर रा. रा. बळवंतराव द्रविड नांवाचे गृहस्थ आले आहेत. त्यांनीं ही गोरक्षणावर सुरस व्याख्यान दिलें.

रा. रा. बळंवंत राजाराम कावळे जुडिशिअल कमिशनरचे शिरस्तेदार यांस तीन माहिन्यांची रजा मिळून त्या रजेंत रा. रा. मारुती हरी लोहार यांस त्या कामीं नेमून त्यांच्या सेशन कोर्टातील कामावर मि. सय्यद मीर अलम यांस नेमणार असें कळतें. या नेमणुकीच्या वेळीं रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. यांचे हक्क लक्ष्यांत आणून त्यांची नेमणूक व्हावयाला पाहिजे होती. पण या भलत्याच व्यवस्थेनें त्यांचे हक्क मारले गेले असे आह्मांस वाटतें.

'शुद्धवऱ्हाडी' वरून समजतें कीं रा. रा. गोविंदराव यशवंतराव राजूरकर तहशीलदार वर्ग १ हे रजा संपल्यावर जळगांवाच्या नव्या जागेवर रुजूं न होतां पेनशन घेणार आहेत.

पाटणा कडील शामलाल नांवाचे एक स्वामी येथें धर्मा संबधानें बोध करण्यास या आठवड्यांत आले होते. स्वामी वृद्ध असून दीर्घ प्रयासी आहेत. पाद्री लोक ख्रीश्चियन धर्माचा उपदेश करीत असतात तेव्हां एखादा नेटीव पाद्री निघाल्यास हिंदुधर्माला पाहिजे आहे. परंतु कोणी बाटून हिंदु मात्र होत नाहीं.

### नोटीस

नोटीस बेशमी. सिवराम वल्लद दावक कृष्णपक्षी राहणार रिधपुर मानभावाचे तालुके मोरशी जिल्हा उमरावती यासी—नोटीस देणार भिमी मर्द सिवराम राहाणार सुरजी अंजणगांव तालुके दर्यापूर जिल्हा इलचिपूर नोटीसिनें असें कळवितें कीं तमचे बरोबर माझे मोहतोर लागुन आज अदमासें सात वर्षे जाहाली. ह्या वेळांत मजला तीन वेळा सासर माहेर जाहालें परंतु तुम्ही व तुमची आई उभयतांनीं मिळुन ह्या वेळात मजला बहुत माराहाण केली व अलीकडे तीन वर्षे जाहाली तुम्ही माझे अन्नवस्त्रा बदल काहींच तजवीज केली नाहीं तुम्हांस मेहाचा बगैरे दुसरे बरेच विकार आहेत. ते असे की मी तुमचे पाशी राहुन घर संवसार करावा अशी कोणची हीं तुमचे तबेतीची स्थिती नाही व मजला या मुळें तुम्हापाशी राहाणें नाहीं व माझा जन्म व संवसाराचे दिवस फुकट चालले आहेत याज करीतां तुम्हास नोटीशिनें कळविते की तुम्ही नवर पणा बदल नोटीस पावल्या पासून आठ ८ दिवसात फारकत द्यावी. नाहीतर हीच फारकती समजुन दुसरा घरठाव करीन मग तुझा कोणचे ही प्रकारचा हक्क मजवर नाहीं म्हणून दिली नोटीस सही ता० २७ माहे फेब्रवारी सन १८९२ इसवी.

सही.

सहीचा निशाणी बागडी भिमी मर्द सिवराम ईच्या हातची असे.

### वर्तमानसार.

आह्मांस लिहिण्यास फार संतोष वाटतो कीं, निर्णयसागर छापखान्याचे प्रसिद्ध मालक रा० रा० जावजी दादाजी यांस सरकारनें जस्टिस आफ् धी पीस हा मान दिला. कामगार.

मुलानीं केलेला खून! शिरापूर तालुका हिरेमागणी एथील शाळेंतील दोघां विद्यार्थ्यांनीं तिसऱ्या एका विद्यार्थ्यांचा खून केल्याचें रसिक रंजिनीवरून कळतें. खुनाचें कारण हा मुलगा नेहमीं वर्गांत पहिला रहात असे हें त्या दोघां मुलानां सहन न होऊन त्यांनीं या मुलाचा खून केला ह्मणतात.

गेल्या दोन महिन्यांत मोठे मोठे पुष्कळ लोक स्वर्गवासी झाले. हें पाहून एका पत्रकारानें त्याबद्दल एक रूपक केलें आहे. तो ह्मणतो कीं, यमाच्या राज्यांत एक राजसभा स्थापन करावयाची होती. त्या सभेंत नेमण्या करितां योग्य गृहस्थ तेथें मिळेनात, ह्मणून यमानें मृत्यु लोकांतील गृहस्थांची त्या सभेंत नेमणूक केली. राजस्थानीं प्रिन्स आलबर्ट यांस नेमिलें, पंडित आयोध्यानाथ, शांताराम नारायण, किर्लोस्कर, व पांडुरंग बळीभद्र यांस वकील नेमिलें, रा. ब. बर्वे व कितने यांस दिवाण केलें, स्वामी गौरीशंकर उदेशंकर, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर व डाक्टर राजेंद्रलाल मित्र ह्यास सभासद केलें आणि जनरल मोल्टके यांस सेनापती केलें. ह्या सर्वांचे मनरंजन करण्या करितां इंदूरचे मृदंगवादन पटु नाना सा० पानसे यांस नेलें. आणखी कियेक जागा रिकाम्या आहेत त्यांवर योग्य गृहस्थ मिळतांच त्यांची नेमणूक करण्यांत येईल. धा. वृ०

कोळ्यानें तार बंद केली— न्यूयार्क आणि बाल्टिमोर यांच्या मधली तार चालेनाशीं झाली ह्मणून तार कोठें तुटली कीं काय असा तपास सुरू झाला. तार कोठें तुटल्याचें तपासांत आढळलें नाहीं, ह्मणून जास्त तपास करितां यंत्रांतील पाझीटिव आणि निगेटिव तारा एका कोळ्यानें आपल्या तंतूनें जोडल्या होत्या, त्यामुळें विजेचा वेग कोळ्याच्या शरिरांत शिरून तो मेला एवढेंच नव्हे, तर तो भाजून गेला होता असें अढळलें. ह्मणजे पाझेटिव आणि निगेटिव तारा जोडल्या मुळें बातमी जाण्याची बंद झाली होती. शु० सू०

गार्नर या नांवाचा एक अमेरिकन शास्त्रवेत्ता हा वानरजातीमध्यें कांहीं भाषा आहे कीं नाहीं याच्या शोधास लागला आहे. दहा शब्द ते वापरतात असा त्याचा स्वतःच्या अनुभवावरून अदमासें आहे तो ध्वनिवाहक व इतर यंत्र बरोबर घेऊन आफ्रिकेंतील वानरांच्या वस्तींत एका लोखंडाच्या पिंजऱ्यांत जाऊन बसणार व तेथें आपले प्रयोग करून पहाणार आहे. काय विलक्षण शोध ! उपाय आहे हा.

सांपत स्थितीचें वर्णन 'सुबोधपत्रिका' कार करितात कीं, पूर्वी लढायांनीं लोक मरत होते हल्लीं परदेशीं अनावर धान्य जात असल्यामुळें वारंवार पडणाऱ्या दुष्काळांनीं त्यांचा नाश होत आहे. युरोपिय लोकांच्या यांत्रिक शक्तीपुढें आमच्या कारागिरांचें हस्तकौशल्याचें कांहीं न चालून ते साफ बुडून गेले आहेत अथवा जात चालले आहेत. लोक विद्यालंकृत झाले आहेत परंतु त्यांच्यांतील पूर्वीचें शौर्य व हिंमत लढाईचे प्रसंग नसल्यामुळें व शस्त्रें वापरण्याच्या बंदीच्या कायद्यामुळें नाहींशीं होऊन ते नामर्द, कमकुवत्त व पढतमूर्ख बनले गेले आहेत. बहुतेक सर्व देशभर जमीनमहसूल कायमचा न ठरल्यामुळें शेतकी सुधारण्यास हुरूप राहिली नाहीं व जे कोणी सुधारतात त्यांच्या जमिनीवरचा सारा बहुधा प्रत्येक तीस वर्षांनीं वाढून ते पळून काढल्यासारखे होत आहेत. सामाजिक सुधारणा व धर्मसंबंधी सुधारणा ह्याचि पाऊल मात्र बरेंच पुढ सरसावत चाललें आहे तरी वरील कारणामुळें एकंदरींत लोकांची स्थिति पूर्वीपेक्षां ज्यास्त सुधारलेली आहे असें आमच्यानें ह्मणवत नाहीं. सु० प०

सगळ्यांत दुर्मिळः—(१) गांवांत कांहीं रोगाची सांथ आलेली ऐकून अगदीं उदास झालला डाक्टर आणि (२) भांडण कोर्टापर्यंत नेऊं नये ह्मणून उपदेश करणारा वकील.

एका संस्कृत पंडिताचें ह्मणणें असें आहे कीं, जीं अष्टादश उपपुराणें आहे त्यापैकीं एका श्लोकांत पुढील भविष्य लिहिलें आहः— "पांचव्या जार्जच्या कारकिर्दींत अग्रहायन (दिसंबर–जानेवारी) महिन्यांत एका नेमलेल्या दिवशीं नेमलल्या वेळीं हिंदुस्थानचा कारभार ग्रेटब्रिटनपासून निराळा झाल्याविषयींचा जाहिरनामा प्रसिद्ध होईल, ह्मणजे हिंदुस्थनाला होमरूल (स्वतंत्र रीतीनें कारभार करण्याची परवानगी) मिळेल." परवां नुकताच जो राजवराण्यावर अति दुःखद प्रसंग गुजरला, त्यामुळें इंग्लंडच्या गादीवर पांचवा जॉर्ज राजा होण्याचा संभव आहे. भविष्य खरें ठरल्यास चांगलेंच आहे पण आमच्या कितव्या पिढीला त्या सुखाचा अनुभव मिळेल तें इश्वरास ठाऊक!

हिसारांत एक्या खेड्यांत एक विहिर आहे. ती त्या खेड्यापेक्षांही जुनी आहे. तिचें पाणी गोड आहे व तें प्यालें असतां सर्व रोग नाहिसे होतात अशी समजूत आहे. ही विहिर ह्मणजे एक चमत्कारच आहे. एक झाडाचें खोड दुभंग होऊन त्यांच्यामध्यें ह्या विहीरीचें तोंड आहे. त्या विहिरीचे दगड त्या झाडाच्या मुळांनीं चुन्यापेक्षांही घट्ट बांधून ठेवले आहेत. विहिरीच्या आंतल्या दगडावर कांहीं जुने लेख आहेत. हिचें पाणी पवित्र आहे अशी समजूत आहे. करमणूक०

पुणे १८९२ सालच्या वक्तृत्वाचे विषय— सन १८९२ च्या वक्तृत्वसभेचे विषयीं पुढें लिहिल्याप्रमाणें ठरले असल्याचें समजतें:—

विषय १ ला—मेहेरवान ह्यूमसाहेब ७ वर्षे पर्यंत राष्ट्रीय सभेचें काम केल्यानंतर स्वदेशी जात आहेत; तेव्हां त्यांनीं केलेलें काम लक्षांत घेऊन कृतज्ञतादर्शक भाषण करणें हें भाषण करिताना कांग्रेसपासून कोणते उपयोग होण्यासारखे आहेत, व ते होण्यासाठीं आपण काय केलें पाहिजे ह्याविषयीं विषयीं विचार व्हावा.

विषय २ रा—हल्लीं व्यापार, विद्याभ्यास वगैरे कारणानिमित्त गलबतांत बसून परदेशी जाणें जरूर झालें आहे; तेव्हां प्राचीन आर्यांचे ह्या संबंधानें आचार व शास्त्र बंधनें कशीं होतीं आणि हल्लींचीं कशीं आहेत, ह्याचा विचार करून सांप्रतच्या अडचणी दुर करण्यासाठीं काय उपाय योजावे.

विषय ३ रा— ह्या देशांत बौद्धधर्माचा प्रसार कसा झाला आणि ऱ्हास कसा झाला ह्या विषयींचें विवेचन करणें. प्र. सिं.

एक इंग्रजी पत्रकर्ता म्हणतोः— आपल्या महाराणी साहेबांची अशी इच्छा आहे कीं, आपल्या पश्चात आपले चिरंजीव प्रिन्स आफवेल्स राज्य पदावर आले असतां त्यांनीं सातवा एडवर्ड अशी पद्वी धारण न करितां पहिला आलबर्ट हें नांव घ्यावें. आलबर्ट हें नाव महाराणी साहेबांच्या भ्रताराचें असून तें प्रिन्स यांच्या दोन नावा पैकीं एक आहे.

हिंदुस्थान सरकारनें असा एक ठराव केला आहे कीं, पूर्वी ज्याचा आजमास करितां येत नाहीं असा अकस्माक प्रसंग असेल तर मात्र हक्काच्या रजेस जोडून दुसरी कोणत्याप्रकारची रजा घ्यावी. तसें नसेल तर हक्काच्या रजेस दुसरी रजा जोडू नये. म० मि.

हिंदुस्थानचा पुढील सालचा जमा खर्चाचा खर्डा ता० १८ मार्च रोजीं निघणारे हिंदुस्थान सरकारचे ग्याझीटांत प्रसिद्ध होणार आहे व तो त्या सरकारचे कायदे कौन्सिल पुढें ही येणार आहे. दि० बं०

दक्षिण महाराष्ट्र प्रांतीं शास्त्रार्थाचा एक घेडगुजरी प्रकार दृष्टोत्पतीस आला आहे. दोन वर्षापूर्वी साताऱ्यास ब्राह्मणांत एक लग्न झालें. वधू जकातवाडेकर कान्हेर यांची कन्या व वर सांगली येथील लग्न लागल्यावर दिसून आलें कीं वधूवर सगोत्र व सप्रवर आहेत. तेव्हां शंकराचार्यांनीं लग्न अशास्त्र ठरवून वधुवरांनीं परस्परांशीं बहुभगिनी प्रमाणें आजन्म वर्तावें असें ठरविलें. व असें ठरल्यावर आतां वराचे दुसरें लग्न करण्याचें ठरलें आहे. पण वधूचे काय! पहिलें लग्न रद्द ठरविलें तरी तिला दुसरें लग्न करण्याची परवानगी नाहीं! खरोखरी जुन्या विचाराचे लोकांना हा आह्मी विचारतो कीं शास्त्रकारांचा असा उद्देश असणें शक्य तरी आहे का? पण आमचे धर्मगुरू कशाला विचार करितात! हे असे जुलूम आमचे धर्माध्यक्ष करित आहेत हे त्याचे देव्हार लवकर संपुष्टात येण्याचीं चिन्हें होत? वैदर्भ

गेल्या डिसेंबरच्या अखेरीस भरणाऱ्या नऊ महिन्यांत हिंदुस्थानची आयात सुमारें एक कोटीनें कमी झाली असून तिचें कारण कापड आहे आणि निर्गत सुमारें सहा कोटीनीं जास्त झाली असुन तिचें कारण गहू आहे असें सांगतात. म्हणजे परदेशचें कापड हिंदुस्थानांत एक कोट रुपयाचें कमी आलें व हिंदुस्थास्थानांतला गहू हिंदुस्थानाबाहेर साहा कोट रुपयांचा जास्त गेला हिंदुस्थानांतल्या लोकांनीं हे आकडे ध्यानांत ठेवून शेतकी सुधारण्याच्या मार्गे लागणें जरूर आहे.

दिल्लीच्या जुन्या राजवराण्याचा वंशज मिरजा सुलेमान बक्त हा आजपर्यंत बनारस येथें राजकीय कैदेंत होता तो मागच्या मंगळवारीं तेथें मरण पावला असें समजतें. हिंदुस्थानांतल्या जुन्या व नामांकित राजकुळांचे किती वंशज अजून मरावयाचे आहेत कोण जाणे! बिचारे एकदाच मरून जातील तर एकेकाच्या मरणाने वेगळाल्या वेळीं लोकांच्या मनांस जें वाईट वाटतें तें तरी संपेल!!

इंग्रजी राज्यांत एक सगळें खंड असून १०० द्वीपकल्पें, ५०० भूशिरें, १००० सरोवरें, २००० नद्या व १०,००० बेटें आहेत! केवढें अफाट राज्य हें !!

हल्लीं सूर्यावर जे डाग दिसत आहेत त्यांचा हिंदुस्थानच्या दुष्काळाशीं संबंध आहे असें कित्येकांचें ह्मणणें आहे व १८७७ च्या भयंकर दुष्काळाच्या वेळींही असेच डाग दिसत होते असें त्यांचें ह्मणणें आहे. असेंच कांहीं असेल तर चंद्रावरील खळें, चंद्र सूर्यांचीं ग्रहणें वगैरेंशीं जुन्या हिंदु लोकानीं जे कांहीं संबंध जोडले आहेत त्यांतही कांहीं अर्थ असावा असें मनांत येतें.

ज्या जातीच्या लोकांस व्हालेंटीयर होण्याची परवानगी देण्यास सरकार तयार आहे त्या जातीच्या सर्व लोकांनीं व्हालंटीयर व्हावें हें इष्ट असल्यामुळें, त्यांस पुढील सवलती दिल्यास ते सर्व लोक व्हालेंटीयर होतील अशी एक सूचना आतां बाहेर आली आहे. त्या सवलती अशा कीं, त्यांच्यावर इन्कमटाक्स बसवूं नये, इंग्लंडांस जाण्यास व परत येण्यास त्यांस फुकट पास मिळावा, हिंदुस्थानांतल्या हव्या त्या रेल्वेनें प्रवास करण्यास त्यांस फ्री पास असावा, पेन्शन मिळण्यास जितकीं वर्षे सरकारी नोकरी करावी लागते त्याहून यांस कमी वर्षांची पत्रा असावी, हरएक प्रकारच्या विद्यालयांत व्हालेंटीयर लोकांच्या मुलांस फुकट शिक्षण देण्याचा ठराव करावा, इत्यादि. ही सूचना फार उत्तम आहे. सरकार अगदीं वेडें बनलें आहे असें, ही सूचना पुढें आणणाऱ्यांस वाटत असावें असें या सूचनेच्या झोकावरून दिसतें. या वरील सूचना अंमलांत आणण्यासारख्या आहेत असें जर वाटत असेल तर त्यांच्याच बरोबर पुढें सांगितलेल्या सवलतीही त्यांस दिल्याच पाहिजे असें होईल, व या वरील सवलती देण्यांत आल्यास या खालील सवलती मागण्याविषयीं त्यांचें मागणें ही लवकरच पुढें येईल असें वाटतें. व्हालंटीयरच्या याद्यांत आपलें नांव दाखल करून घेणाऱ्या कोणा माणसास खर्चाची अडचण पडली तर त्यास सरकारी खजिन्यांतून लागेल ती रकम घेण्याची मुभा असावी, कपड्या लत्याची गरज लागल्यास हव्या त्या ठिकाणच्या मोठ्याशा दुकानांत जाऊन लागतील तसले व लागतील तितके कपडे उचलून आणण्याची त्यास मुभा असावी, पाहिजे त्या शिंप्यानें व्हालेंटीयराचे कपडे फुकट शिवून दिले पाहिजेत व धोब्यानें फुकट धुवून दिले पाहिजेत, मोच्यानें बट फुकट पुरवावे आणि हमालांनी व्हालेंटयिरांचा मेणा फुकट ने आण केला पाहिजे. तसेंच त्यास दारूची इच्छा झाल्यास त्यास हव्या त्या पिठ्यांत जाऊन यथेच्छ मद्यपान करण्याची मोकळीक असावी. आणि त्यांच्या शमनार्थ लागेल त्यांचेंही कोंबडी आंडीं खाण्याचाही सवलत असावी. अशा तऱ्हेनें सवलती ठेवल्यास तशा प्रकारचे हिंदुस्थानांत असणारे सर्व लोक मोठ्या आनंदानें व्हालेंटीयर होतील आणि त्या दुष्ट नेटिवांनीं १८५७ सारखा एखादा प्रकार उपस्थित केल्यास सरकारास भिण्याचें कारण मुळीच राहणार नाहीं. टा० अ०

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांणीं छापून प्रसिद्ध केलें.